विणकला

भाग पहिला.

लक्ष्मीबाई प्रधान.

मुंबई इलाखा, मध्यप्रांत व वऱ्हाड येथील सरकारी विद्याखात्यांनीं
बक्षिसाकरितां व लायब्ररींकरितां
मंजूर केलेलें पुस्तक

विणकला

भाग पहिला

(विणकामासंबंधी उपयुक्त माहिती आणि निटिंग व क्रोशेचे
स्कार्फ, स्वेटर्स, व निरनिराळ्या वस्तूंचे नमुने,
आर्टपेपरवरील सुंदर आकृतींसह.)

लेखिका,
लक्ष्मीबाई प्रधान
(लहानीबाई)

आवृत्ति पहिली
१९२४

किंमत सव्वा रुपया

प्रकाशिका—लक्ष्मीबाई प्रधान,
२७० सदाशिव पेठ, पुणें शहर.

मुद्रक—गणेश काशिनाथ गोखले; सेक्रेटरी,
श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स; ४९५ शनवार पेठ, पुणें शहर.

हें

पुस्तक

विणकलाकुशल

श्रीमंत सरकार

रमाबाईसाहेब पटवर्धन

संस्थान जमखंडी

यांस

कर्त्रीनें

सादर व सप्रेम अर्पण केलें असे.

पुस्तकपरिचय.

हल्लीं घरोघर तरुण मुली व बहुतेक प्रौढ स्त्रियाहि विणकाम करीत असलेल्या दृष्टीस पडतात. या कामाचीं दोन तीन पुस्तकेंहि पूर्वीं झालेलीं होतीं. असें असतां आतां या पुस्तकाची काय गरज आहे असा साहजिकच प्रश्न येतो. व तो पुष्कळ अंशीं बरोबर आहे. महाराष्ट्रीय स्त्रियांना आज कलाकौशल्याचीं कामें अपरिचित नाहींत, ही गोष्ट ठिकठिकाणीं भरणाऱ्या प्रदर्शनांतील वस्तूंवरून नेहमीं स्पष्ट अनुभवास येत असते. परंतु या कलेंतील प्राविण्य मात्र फारच थोड्या स्त्रियांत दिसून येतें. कांहीं निवडक स्त्रियांचीं कुशलतेचीं कामें सोडून दिलीं तर बहुतेक कामें कशीं तरी केलेलीं असतात, हें तेव्हांच लक्षांत येतें. याचें कारण आमच्या स्त्रियांना या कलेचें पद्धतशीर शिक्षण मिळालेलें नसतें. त्यांना या कामाची फक्त वरवर माहिती असते. या कलेच्या मुळाशीं जाण्याचें साधन त्यांना उपलब्ध नसतें. तरीहि स्वतःच्या बुद्धीनेंच कांहीं स्त्रिया या कामांत प्रावीण्य संपादितात; पण सर्वांनाच इतकें बुद्धिसामर्थ्य असणें शक्य नाहीं. त्यांना पुस्तकासारखें मार्गदर्शक साधनच पाहिजे, तरच त्यांची या कलेंत प्रगति होईल. चार दोन, पायमोजे, किंवा एखादें झबलें, टोपी, विणतां आलें कीं ह्या कलेचें ज्ञान संपलें. अशी बहुतेक स्त्रियांची समजूत असते. त्यामुळें त्या पद्धतशीर माहिती मिळविण्याचा प्रयत्नहि करीत नाहींत, ही गोष्ट बऱ्याच वर्षांपासून माझ्या अनुभवास येत आहे. मला या कलेची जी थोडीशी माहिती आहे, ती देऊन पुष्कळशा क्षुल्लक वाटणाऱ्याहि गोष्टी किती महत्त्वाच्या असतात हें विणकाम शिकणाऱ्या स्त्रियांना समजून द्यावें असें मला नेहमीं वाटत असे. व हें पुस्तक लिहिण्याचा मुख्य उद्देशहि हाच आहे. निरनिराळ्या वस्तूंची नुस्ती माहितीच देण्याचा केवळ हेतु नाहीं. पूर्वींचीं दुसऱ्या कर्त्यांची जीं दोन पुस्तकें आहेत. त्यांत अशा प्रकारची माहिती दिलेली नाहीं. एकदां विणकामांत प्रवेश होऊन त्यांतल्या मुख्य गोष्टी व पद्धत लक्षांत आली कीं मग कोणताहि नमुना पाहून तशी वस्तु सहज बनवितां येते. या माहितीच्या अभावीं पुष्कळ स्त्रियांचीं कामें सफाईदार होत नाहींत. विणण्यांत एखादी चूक झाली असल्यास ती सुधारतां येणें शक्य आहे किंवा नाहीं, व ती कशी सुधारावी याची माहिती असणें जरूर आहे अशा प्रकारच्या सूचना आरंभीं दिल्या आहेत; त्या प्रत्येक विणकाम करणारणीनें प्रथम वाचाव्या.

क्रोशेच्या टांक्यांचीं नवीन नांवें दिलीं आहेत. तीं प्रचारांतील नाहींत. त्या टांक्यांत जे अनेक प्रकार आहेत ते स्पष्ट समजून त्यांचा बोध होईल अशीं नांवें योजिलीं

आहेत. तीं एकदा वाचून टांके लक्षांत घ्यावे म्हणजे विणतेवेळीं घोटाळा होणार नाहीं.

पुस्तकांत दिलेल्या बहुतेक नमुन्यांच्या आकृती दिल्या आहेत. स्कार्फ, पायमोजे यासारख्या ज्या वस्तूची एक आकृति पाहून तशा दुसऱ्या वस्तूच्या आकाराची लगेच कल्पना येते, अशा कांहीं थोड्याच वस्तूंच्या आकृती दिलेल्या नाहींत. त्याचप्रमाणें जी वस्तु एकदां विणली असतां कोणतीहि विण धरून तशी दुसऱ्या तऱ्हेची विणतां येणें शक्य आहे अशा पायमोजासारख्या वस्तूंचे निवडक नमुने पांचच दिलेले आहेत. स्वेटर व टोप्या यांत पुष्कळ प्रकार असल्यामुळें त्यांचे जास्त नमुने दिले आहेत. लांबी बरोबर समजावी म्हणून इंचाच्या पट्टीची आकृति दिली आहे. त्यावरून लांबीचा हिशेब बसवावा.

माझ्या भगिनींना या पहिल्या भागाचा अंशतः तरी उपयोग झाल्याचें दिसून आल्यास पुढले भाग लवकरच प्रसिद्ध होतील. त्यांत ट्याटिंग (Tatting), सुतळीचें काम (Macrame work), वगैरे फारशीं परिचित नसलेलीं कुशलतेचीं कामें व्यवस्थित रीतीनें कशीं करावीं यांचें विवेचन करून आकृतींसह त्या कामांचे नमुने देण्यांत येतील. परंतु हे पुढील भाग क्रमानें प्रसिद्ध होणें महाराष्ट्रीय भगिनी वर्गाच्या आश्रयावर अवलंबून आहे. हीं पुस्तकें लिहिण्यापेक्षां व छापण्यापेक्षां त्यांतील नमुन्यांच्या आकृती तयार करणेंच फार श्रमाचें व खर्चाचें काम आहे. प्रत्येक वस्तूचा नमुना विणून, त्याचा फोटो घेऊन, मग आकृति तयार करावी लागते. पुस्तक लिहून झाल्यावर नमुने विणून देण्यांत मला दोन महिने घालवावे लागले. वेळ, मेहनत व खर्च या तिहींच्या मानानें पुस्तकाची किंमत शक्य तितकी कमी ठेविली आहे. हें पुस्तक संपन्न स्थितींतील स्त्रियांना करमणूकीचें साधन म्हणून उपयोगीं पडेलच. पण त्याबरोबरच मध्यम व गरीब स्थितींतील स्त्रियांना देखील त्याचा उपयोग व्हावा या दृष्टीनें ऐपत नसलेल्या स्त्रियांच्या अडचणी लक्षांत घेऊन त्यांना घर बसल्या या कलेचें पद्धतशीर ज्ञान संपादन करतां यावें अशी या पुस्तकाची रचना करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचा कांहीं भगिनींना जरी उपयोग झाला तरी माझ्या श्रमांचें सार्थक झालें असें मी समजेन.

मी हें पुस्तक छापण्याचा विचार व्यक्त करतांच पूज्य मातुश्री **वहिनीबाई(रमाबाईसाहेब रानडे)** यांनीं मला या कामीं विशेष प्रोत्साहन दिलें. पुस्तकाची प्रस्तावना लिहिण्याचें त्यांनीं स्वतः पत्करून विणकलेंत प्रवीण असलेल्या **जमखंडीच्या श्रीमंत राणीसाहेब** यांस पुस्तक अर्पण करण्याची मला सल्ला दिली. त्याप्रमाणें मी श्री. **राणीसाहेबांस** तशा अर्थाचें विनंतिपत्र व पुस्तकाची लेखी प्रत पाठविली. थोड्याच अवधींत

त्यांच्याकडून उत्तर आलें. त्यांत ' पुस्तकाची रचना पद्धतशीर झाली असून विण-कामाची आवड असलेल्या स्त्रियांना त्यापासून पुष्कळ ज्ञान प्राप्त होईल. ' अशा उत्तेजन-पर वाक्यांनीं त्यांनीं पुस्तक अर्पण करण्याची मला परवानगी दिली. प्रस्तुत कलेंतील त्यांचें प्रावीण्य सुप्रसिद्ध आहे. म्हणून या पुस्तकांत त्यांचा फोटो देण्याचाहि विचार होता. पण दुर्दैवानें त्यांच्यावर अकस्मात व अकालीं जो दारूण प्रसंग ओढवला त्याची नुस्ती आठवणहि करवत नाहीं. या अकल्पित प्रसंगामुळें त्यांचा फोटो देण्याचा विचार मोठ्या दुःखानें बदलणें भाग पडलें.

श्रीमंत **राणीसाहेबांचा** फोटो या पुस्तकांत प्रसिद्ध होण्याचा जसा योग नव्हता, तसेंच पू. मा. **वहिनीबाईंना** याच वेळेस प्रकृतिस्वास्थ्य नसल्यामुळें त्यांच्या शब्दांत प्रस्तावना लिहिली जावी असेंहि **विणकलेचें** भाग्य नव्हतें. त्यांच्या प्रकृतीला आराम पडेपर्यंत प्रस्तावनेसाठीं आणखी जास्त न थांबतां मीं पुस्तक प्रसिद्ध करावें, मागाहून त्या आपल्या अभिप्रायानें ही उणीव भरून काढतील. असें त्यांनींच मला सुच-विल्यावरून ईश्वरकृपेनें त्यांना लवकरच आरोग्य प्राप्त होऊन त्यांचा अभिप्राय वाचक भगिनींच्या दृष्टीस पडेल अशी आशा बाळगून आज मींच हा पुस्तकपरिचय करून देण्याचें हातीं घेतलें.

हें पुस्तक ज्यांच्यामुळें प्रसिद्ध होण्याचा योग आला त्यांचा येथें उल्लेख करणें अस्थानीं होणार नाहीं. माझ्या प्रिय आत्या सौ० **हिराबाई गोरक्षकर** यांना शिक-विण्यास सुमारें २०, २२ वर्षांपूर्वीं एक अमेरिकन बाई येत असे. तिच्यापाशीं त्या जीं कांहीं नवीन प्रकारचीं कामें शिकत, त्या सर्वांचीं माहिती मी जेव्हां जेव्हां त्यांच्याकडे जाई तेव्हां तेव्हां त्या मला करून देत. पुढें त्यांनीं मला इंग्रजी पुस्तकावरून अनेक प्रका-रच्या वस्तु कशा तयार करावयाच्या हें समजावून दिलें. अशा तऱ्हेनें मला या कलेची पद्धतशीर माहिती मिळवितां आली. आजहि सर्वथा त्यांच्याच मदतीमुळें मी हें पुस्तक प्रसिद्ध करण्यास समर्थ झालें.

ही कृति पुस्तक रूपानें बाहेर पडण्यास लेडी श्री. **प्रेमलीलाबाई ठाकरसी** याहि एकप्रकारें निमित्त झाल्या. गेल्यावर्षीं त्या जेव्हां प्रथम पर्णकुटींत रहावयास आल्या तेव्हां करमणुकीसाठीं स्वेटर विणण्याचें त्यांच्या मनांत आलें. लगेच त्यांनीं मुंबईहून एव्हन्स फ्रेझर कडून लोंकर व नमुन्याचीं इंग्रजी पुस्तकें मागविलीं. त्यावेळीं असलीं पुस्तकें आपल्या देशी भाषेंत होतील तर इंग्रजी न येणाऱ्या स्त्रियांना त्यांचा किती तरी उपयोग होईल. असे विचार मनांत आले. मीं या दिशेनें प्रयत्न करून पहावा-असेंहि त्यांनीं मला एकदां सुचविलें. त्यांत आणखी माझ्या कित्येक मैत्रिणींनीं जास्त

उत्तेजन दिलें. तेव्हां कांहीं इंग्रजी पुस्तकांच्या आधारानें व माझ्या स्वानुभवानें मीं ही विणकला लिहावयास घेतली. मला ज्या इंग्रजी पुस्तकांची अंशतः मदत झाली, त्यांच्या कर्त्यांची मी आभारी आहें.

माझ्या परिचित सौ. **कमलाबाई गांधी** यांनीं त्यांच्या अनुभवाची मला वेळोवेळीं जी उपयुक्त माहिती दिली, तिचा हें पुस्तक तयार करण्यांत मला बराच उपयोग झाला.

पुस्तकांत देण्याच्या निरनिराळ्या वस्तूंची निवड करून, ते नमुने विणून पाहिले, पुस्तक लिहून झालें. मीं हीं दोन्ही कामें घरांत बसून केलीं. पण पुढलें छापविण्याचें अत्यंत दगदगीचें काम घरीं बसून होण्यासारखें नव्हतें, ही गोष्ट लक्षांत घेऊन गुरुवर्य वे. शा. सं. **वि. वा. वापटशास्त्री** यांनीं मला छापण्याच्या कामीं जें साह्य केलें त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणें हें माझें कर्तव्य होय.

रा. **गणेश काशिनाथ गोखले** सेक्रेटरी, श्री. **गणेश प्रिंटिंग वर्क्स** यांनीं छपाईचें आणि **नेरॉय** कंपनीचे मालक यांनीं आकृतींच्या ब्लॉक्सचें काम आस्थेनें व काळजीपूर्वक करून दिलें याबद्दल त्यांची व या कामीं ज्या इतरांची मला थोडीफार मदत झाली त्या सर्वांची मी अभारी आहें.

शेवटीं ज्या सर्वांतर्यामी परमात्म्याच्या कृपेनें हें काम पार पडलें त्याला वंदन करून ही विणकला माझ्या भगिनींच्या हातीं देतें.

पर्णकुटी येरवडा हिल. पुणें.
ता. १३ एप्रिल. सन १९२४
चैत्र शु. ९ शके १८४६

ग्रंथकर्त्री.

विषयानुक्रमणिका.

आकृतींची सूची.

ॐ तत्सत् .

—सर्व पुस्तकांचा टाईप, कागद, छपाई, बाईंडिंग उत्तम आहे.—

सुबोध संपूर्ण वेदान्तप्रस्थानत्रय.

(स्त्रीवाचकांच्याहि उपयोगी)

१. **शांकरभाष्यानुसार सुबोधगीता**–[अवतरण, मूळ श्लोक, अन्वय, सरळ व सुबोध अर्थ, स्पष्टीकरण व सिंहावलोकन,] शरीररथ व चतुर्भुज श्रीकृष्ण यांचीं चित्रें. पृष्ठें ३९० किंमत रु. २

२. **शांकरभाष्यानुसार सुबोध उपनिषत्संग्रह**—[मूळ श्रुति, अन्वयार्थ, स्पष्टीकरण, प्रत्येक उपनिषदाचें सिंहावलोकन यांसह] ईश केन-कठ-प्रश्न-मुंडक-मांडूक्य-तित्तिरि-ऐतरेय-छांदोग्य-बृहदारण्यक-कौषीतकि श्वेताश्वतर-जाबाल-अर्थात् ब्रह्मसूत्रांत ज्यांचा विचार केला आहे, अशीं महत्त्वाचीं तेरा उपनिषदें, प्रस्तावना, सविस्तर अनुक्रमणिका. किं. रु. ५॥.

३. **शांकरभाष्यानुसार सुबोध ब्रह्मसूत्र**—[वैयासिकन्यायमालेसह] प्रत्येक अधिकरणाचें नांव–सूत्रें–सूत्रार्थ–विषय–संशय–पूर्वपक्ष–संगति–सिद्धान्त वैयासिकन्यायमालेचे श्लोक–अन्वयार्थ–प्रस्तावना सविस्तर अनुक्रमणिका यांसह पृ. ५३० किं. ३ रु.

४. **सुबोध पंचदशी**—[मूळ–अन्वयार्थ–स्पष्टीकरण प्रत्येक प्रकरणाचा मथितार्थ–प्रस्तावना–सविस्तर अनुक्रमणिका. सर विठ्ठलदास ठाकरसी-यांचें चरित्र यांसह] पृ. ७५० किंमत पातळ प्रत ३॥ रु. जाड प्रत ४ रु.

पत्ताः—

विष्णुशास्त्री बापट,

२७० सदाशिव पेठ, पुणें.

विणकला.

महत्त्वाच्या सूचना.

लोंकरीचें, रेशमाचें, सुताचें किंवा दुसरें कसलेंहि विणकाम व भरतकाम करते वेळीं मुख्य व पहिली गोष्ट ह्मटली म्हणजे त्या वस्तूची स्वच्छता राखणें ही होय. विणण्याचा धागा व विणलेली वस्तु स्वच्छ ठेवण्याविषयीं अत्यंत जपलें पाहिजे. आमच्या बहुतेक स्त्रिया या गोष्टीकडे फारसें लक्ष पुरवीत नाहींत. त्यामुळें पुष्कळ वेळां त्यांनीं अतिशय मेहनतीनें व कौशल्यानें बनविलेल्याहि वस्तूचें सौंदर्य खुलून दिसत नाहीं. उलटपक्षीं स्वच्छ ठेवलेल्या वस्तूमधली एखादी चूकहि लपून जाते. पहाणाराच्या मनाला स्वच्छ वस्तूमुळें जी प्रसन्नता येते, ती एखाद्या कितीहि मूल्यवान् असलेल्या मळकट वस्तूनें येत नाहीं. करितां पुढील गोष्टी अवश्य लक्षांत घ्याव्या. विणकामाचें साहित्य हातीं घेण्याच्या आधीं साबणानें हात स्वच्छ धुवावे. हल्लीं घरोघर साबण बहुतकरून असतोच. पण कदाचित् एखाद्या खेडेगांवीं तो मिळत नसला, किंवा वेळेवर घरांत नसला तर रिठ्यानें हात धुवावे. रिठ्याचें टरफल भिजवून चोळतांच जो फेंस येतो त्यानें साबणाप्रमाणें हात स्वच्छ होतात.

त्याचप्रमाणें नखें देखील स्वच्छ ठेवावींत. पुष्कळ स्त्रियांचीं नखें खूप वाढलेलीं असतात. तीं कामाकाजांत चिरतात. त्यांत मळ भरलेला असतो. त्यामुळें लोंकरीचें किंवा रेशमाचें काम हातीं घेतल्यास नखांच्या चिरलेल्या टोकांत धाग्याचे तंतु अडकून धागा वाईट होतो व विणणारणीसहि त्रास होतो. करितां नखें वाढूं न देतां तीं नेहमीं कातरणें चांगलें. 'नेल सिझर्स' नांवाची नखें काढण्याची एक कातरी मिळत असते. तिला कानस असते, तिच्यावर नखें घांसलीं असतां नखांचा खडबडीतपणा निघून जातो. परंतु

ही कातरी प्रत्येकीच्या संग्रहीं असणें शक्य नाहीं. म्हणून साध्या कातरीनें नखें कातरून दगडावर थोडीं घांसल्यानेंहि तीं गुळगुळीत होतात.

लोंकर, सूत, किंवा रेशीम जें कांहीं विणावयास घ्यावयाचें असेल त्याच्या शेवटाचा दोन हात धागा बाहेर काढून तें बंडल एका स्वच्छ, धुवट कपड्यांत गुंडाळून ठेवावें. लहानशा हात रुमालांत ठेवून त्यास झोळी-प्रमाणें गांठ दिली असतां धागा सैल राहून बंडल मळत नाहीं. कापडाची लहानशी पिशवी जास्त चांगली.

सुया—विणण्यास हस्तीदंती सुया चांगल्या; परंतु बारीक विण हवी असल्यास पोलादी सुया अधिक बऱ्या. अलीकडे पुष्कळ नवीन प्रकारच्या सुया मिळतात. 'सेलुलॉइड'च्या सुया लवचिक असतात. त्यामुळें लांकडी, हस्तीदंती किंवा हाडांच्या सुयांपेक्षां त्या जास्त टिकाऊ असतात. त्या मोडण्याचा फारसा संभव नसतो. 'ॲल्युमिनियम'च्या सुया वजनांत अतिशय हलक्या असतात. त्यामुळें विणतेवेळीं हात दुखत नाहींत. त्या गंजण्याचीहि भीति नसते. परंतु त्यांची किंमत इतर सुयांहून जास्त असल्यामुळें त्या सर्वांनाच वापरतां येणें शक्य नाहीं. ज्यांना अनुकूलता असेल त्यांनी त्या अवश्य वापराव्या. पण साधारण सर्व ठिकाणीं मिळणाऱ्या व सर्वांना साध्य अशा पितळी व पोलादी सुयाच होत. या सुया कांहीं दिवस वापरांत नसल्या म्हणजे गंजतात. कांहीं स्त्रिया अशा गंजलेल्या सुया नुस्त्या पुसून किंवा फार तर राखुंडीनें घांसून घेतात. पण तेवढयानें गंज साफ निघत नाहीं. विणतेवेळीं तो लोंकरीला लागून धाग्यावर घाणेरडा रंग चढतो. ही गोष्ट आरंभीं पुष्कळांच्या लक्षांत येत नाहीं. गंजलेल्या सुया स्यान्डपेपरवर घांसून स्वच्छ होतात. पण त्याहूनहि सुलभ व सोपी वस्तु म्हणजे रांगोळी होय. ती आमच्या स्त्रियांना केव्हांहि व कोठेंहि सहज मिळण्यासारखी असून तिनें सुया घांसल्या असतां अगदीं स्वच्छ निघतात.

याप्रमाणें हात, नखें, सुया व लोंकर यांची प्रथम स्वच्छता ठेवून मग विणकामास आरंभ करावा. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आपण संक्रांतीचा हलवा स्वच्छ राखण्यासाठीं जशा जपतों व तो शुभ्र व्हावा म्हणून जशी चढाओढीनें काळजी बाळगितों, तशाच व तितक्याच काळजीनें विणकाम केलें पाहिजे. तरच तें सुबक होईल. कांहीं स्त्रिया विणलेलें काम अपुरेंच सुयांवर ठेवून देतात व सवडीप्रमाणें पुष्कळ दिवसांनंतर पुरें करितात. त्यामुळें तें

मळकट दिसूं लागतें. त्यावर गंजलेल्या सुयांचा रंग चढून धाग्याचा मूळचा रंगहि केव्हां केव्हां ओळखूं येईनासा होतो. म्हणून सुयांवर व विशेषतः लोखंडी व पोलादी सुयांवर केव्हांहि टांके घालून ठेवूं नयेत. अर्धेंच काम ठेवण्याचा प्रसंग आल्यास तें सुयांवरून काढून ठेवावें व विणावयाच्या वेळीं टांके उचलून घ्यावे. एखादा टांका सुटून जाईल अशी भीति वाटत असल्यास टांके बुजवून ठेवावे व विणतेवेळीं पुनः तेवढेच उलगडून घ्यावे.

लोंकरीचें बंडल करणें—कांहीं लोंकरीचीं बंडलें तयार असतात व कांहीं लडी मिळतात. आपण जी नेहमीं बर्लिन वूल वापरतों तिच्या लडी उलगडून बंडल करावें लागतें. लडी उलगडते वेळीं लोंकर न गुंतण्याची काळजी घ्यावी. लोंकर नेहमीं अगदीं सैल गुंडाळावी. कागदाची लहानशी घडी करून त्यावर लोंकर गुंडाळतात. लोंकरीचा शेवट बाहेर धरून हाताच्या आंगठ्यावर हलक्या हातानें ती ढिली गुंडाळीत जावी. म्हणजे पोकळ बंडल होतें व आंतून धागा घेतां येतो. लोंकर व रेशीम हीं फुलासारखींच नाजुक-पणानें वापरलीं पाहिजेत. फुलाचा कोमलपणा टिकणें तें फूल ठेवण्यावर अवलंबून आहे, त्याचप्रमाणें लोंकर पोकळ व ढिली न ठेवल्यास तिचा मऊपणा व चकाकी जाऊन ती सुतळीसारखी वळीव दिसूं लागते. फुललेली रहात नाहीं.

लोंकर फोडणें—लोंकरीचें बंडल करण्याइतकेंच ती फोडण्याचें काम-हि महत्त्वाचें आहे. चौपेडी लोंकर बहुधा फोडून घ्यावी लागते. लोंकर फोडतेवेळीं पहिल्यानें तिचा शेवट घेऊन पीळ सोडवावा. म्हणजे तिचे जे विभाग आपल्या लक्षांत येतात तेथून ती फोडावी. बंडल खालीं सोडून द्यावें म्हणजे पीळ आपोआप सुटत जाऊन लोंकर सहज दुभागली जाते. बंडल मात्र अगदीं पोकळ असावें. आंतल्या धाग्याचें बंडल करणें जास्त सोयी-स्कर पडतें. त्यानें हवा तेवढाच धागा बाहेर येतो. लोंकर फोडते वेळींहि बंडल पिशवींत किंवा रुमालांत ठेवणें जास्त चांगलें. विशेषतः पांढऱ्या लोंकरीला अशा तऱ्हेनें जपलें तरच तिचा शुभ्रपणा कायम राहतो. लोंकर फोडतेवेळीं तिचे तंतु जमून जें बिरडें बनतें तें लगेच काढून टाकावें म्हणजे लोंकर तुटत नाहीं. तें खालीं सरकवीत नेल्यानें गांठीप्रमाणें घट्ट बसतें व मग काढतां येत नाहीं त्यामुळें नेहमीं धागा तोडावा लागतो. कारितां त्याचें वर्तुळ जमा होतांच तें काढून टाकणें चांगलें,

रंगाची निवड—रंग जुळविणें जरी अत्यंत महत्वाचें आहे तरी तें दुसऱ्यास समजावून देणें फार कठिण आहे. आपल्या देशांत जात्याच भडक रंगाची आवड जास्त. मंद रंग कोणाला फारसे आवडत नाहींत, विशेषतः जुन्या पिढीला तर ते मुळींच रुचत नाहींत. वस्तूची शोभा रंगावरहि पुष्कळ अंशीं अवलंबून आहे. पण हा रुचिभिन्नतेचा प्रश्न असल्यामुळें त्यासंबंधीं इतकेंच सांगावयाचें कीं, एकापेक्षां जास्त रंगांत जेव्हां वस्तु तयार करावयाची असते तेव्हां एकांत एक मिसळले जातील असे रंग घ्यावे. एक घेरा व एक फिक्का हे रंग जेवढे खुलून दिसतात तेवढे हिरवा व तांबडा अशांसारखे दोन्ही भडक रंग एकत्र घेतल्यानें वस्तु शोभिवंत दिसत नाहीं.

लोंकरीचें विणकाम शिकणारणीनें प्रथम सुया धरण्यास शिकलें पाहिजे. आमच्या स्त्रिया या गोष्टीकडे मुळींच लक्ष पुरवीत नाहींत. कशा तरी सुया धरून कसें तरी विणतां आलें कीं झालें, अशी त्यांची समजूत असते. परंतु सुयाच जर सारख्या धरल्या नाहींत तर चांगलें विणतां येत नाहीं. कांहीं टांके सैल पडतात व कांहीं घट्ट येतात. त्यामुळें टांके सारखे न बसून विण सुबक दिसत नाहीं. शिवाय सुया पद्धतशीर धरल्यावांचून जलद विणतां येत नाहीं. (आकृति नं. १ पृ. ९ पहा.)

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे कोणतीहि वस्तु विणावयास घेण्यापूर्वी प्रथम तिचा लहानसा नमुना विणावा. जी विण घ्यावयाची असेल; तिला अवश्यक असलेले १०–१२ टांके घालून बोटभर लांब तुकडा विणून पहावा. विण लक्षांत आल्यानंतर वस्तू विणावयास घ्यावी. असें केल्यानें चुका होत नाहींत व पुनः पुनः उसवण्यांत होणारी लोंकरीची खराबी होत नाहीं. त्याचप्रमाणें सर्वांचा हात सारखा नसतो, कोणी सैल विणतात, तर कोणाचे टांके घट्ट येतात. त्यामुळेंहि लांबी-रुंदींत फरक पडतो. यासाठीं लहानसा नमुना विणलेला असला म्हणजे पुस्तकांत दिले असतील त्यांहून कमीजास्त टांके घेणें सोयीस्कर पडतें व नमुन्याचा इंचावर हिशेब बसवितां येतो. उदाहरणार्थ—एका पायमोजाला ६० टांके सांगितले आहेत, व आपल्याला जी विण घ्यावयाची आहे तो ४ टांक्यांचा नमुना आहे. तेव्हां आपल्याला आकार जसा लहान मोठा हवा असेल त्या मानानें ४ च्या पाढ्यानें टांके कमी जास्त करावे. ५ टांके=१ इंच रुंद; १० ओळी=१ इंच लांब, असा साधारण अंदाज आहे.

या पुस्तकांत बहुतेक ठिकाणीं इंचावरच हिशेब दिलेला आहे. कांहीं ठिकाणीं टांके व ओळी सांगितल्या आहेत. पण त्यांवरच अवलंबून न रहातां वस्तु जेवढ्या आकाराची पाहिजे असेल त्या बेतानें टांके घालावे. स्वेटर सारख्या वस्तु विणतेवेळीं प्रथम ज्या मापाचा कपडा बनवावयाचा असेल त्या मापाचे कागदाचे तुकडे कापून घ्यावेत व त्यांवर विणलेले भाग धरून, लांबी-रुंदी ठरवावी. म्हणजे हव्या त्या आकाराचा कपडा सहज विणतां येईल.

लोंकर व सुया— लोंकर अनेक प्रकारची आहे. बाजारांत जी चौपेडी लोंकर मिळते ती सर्व साधारण होय. तिला बर्लिन वूल म्हणतात. ही लोंकर फोडून पायमोजे, टोप्या, झबलीं वगैरे विणण्याचा प्रचार आहे. आसनासारख्या जाड वस्तूला लोंकर न फोडतांच वापरतात. ही लोंकर कमी दराची व सर्व ठिकाणीं मिळणारी आहे. दुपेडी, चौपेडी, पिळदार, रेशमीदोऱ्यानें विणलेली वगैरे अनेक तऱ्हेची लोंकर मिळते. परंतु ती किंमतीनें महाग व मोठ्या शहरांतून इंग्रजी दुकानांतच मिळते. सर्व ठिकाणीं मिळत नाहीं. या लोंकरीनें विणलेले कोट, स्वेटर, स्कार्फ, पायमोजे वगैरे वस्तु जास्त ऊबदार, टिकाऊ व सुबक होतात. ज्यांना साध्य असेल त्यांनीं या पुस्तकांत दिलेल्या त्या त्या जातीच्या लोंकरीनेंच व त्या त्या नंबरच्या सुयांनींच विणावें. सुया व लोंकर यांच्या सारखेपणावर विणण्याचा सुबकपणा अवलंबून असतो. ज्या सुयांनीं विणण्यास आरंभ केला असेल त्याच सुया शेवटपर्यंत ठेवाव्या. मध्येंच बदलूं नयेत. सुयांत फरक झाल्यास विण जाड-बारिक येईल व वस्तूचा आकार बदलून एक भाग सैल तर एक भाग घट्ट होईल. या करितां लोंकरीच्या मानानें सुया घेणें व मध्येंच न बदलणें अत्यंत महत्त्वाचें होय.

लोंकरीचें दोन सुयांवरलें काम नेहमीं सैल टांक्यानेंच विणावें म्हणजे लोंकरीची शोभा व विणीचा सुबकपणा कायम रहातो.

रेशमाचें कामहि फार घट्ट असतां उपयोगी नाहीं. पण सुताचें काम व तेंहि विशेषतः क्रोशे म्ह० आंकड्याच्या सुईनें विणलेलें, नेहमीं घट्ट असावें. सांखळी व टांके घट्ट विणण्यांतच त्या कामांतील कौशल्य दिसून येतें.

बाजारांत लोंकरीचीं जीं बंडलें मिळतात तीं १ औंसाचीं असतात व

लडी २ औंसाच्या असतात. १ औंस=अडीच तोळे. हें कोष्टक लक्षांत ठेविलें असतां औंसासंबंधीं घोटाळा होणार नाहीं.

सुयांचा नंबर --उतरत्या नंबराच्या सुया जाड असतात हें नेहमीं लक्षांत ठेवावें. नं. ४ च्या सुया साधारणपणें दगडी पेन्सली एवढ्या जाड असतात. अर्थात् ३ नंबरच्या त्याहून अधिक जाड व ६ नंबरच्या बारीक.

लोंकरीचा कपडा धुणें—कपडा विणण्याइतकेंच त्याच्या धुण्याचें महत्त्व आहे. तो जर काळजीपूर्वक धुतला नाहीं तर त्याचा पूर्वीचा आकार बदलून तो अगदीं बेढब बनतो. लोंकरीची वस्तु धुण्यास सर्वांत लक्स (Lux) उत्तम. या साबणाच्या पातळ खपल्या केलेल्या असतात, त्या ऊन पाण्यांत टाकतांच विरघळतात व भांडें फेंसानें भरतें. हा साबणाचा डबा बाजारांत आठ आण्याला मिळतो. परंतु ज्यांस हा साबण मिळणें शक्य नसेल त्यांनीं सनलाईट सोप (कपडे धुण्याचा साबण) एका पातेल्यांत टाकून कढत पाण्यांत वितळवावा. आधणाच्या पाण्यांत लहान लहान तुकडे टाकल्यास ते जलद वितळतात. त्या कढत पाण्यांत लोंकरीचा कपडा भिजत टाकावा व पाणी थोडें ढवळावें म्हणजे फेंस येतो. अर्ध्या तासानें तो कपडा त्याच पाण्यांत चांगला खळबळून बाहेर काढावा. म्हणजे सर्व मळ निघून लोंकर स्वच्छ होते. नंतर दोन-तीन वेळां तो थंड पाण्यांत बुडवून, धुवून काढावा, आपटूं नये. कोठें डाग पडले असल्यास हलक्या हातानें चोळून ते काढावे. कपड्याची घडी घालून ती दोन तळहातांमध्यें दाबून पाणी काढून टाकावें, पिळा करून पिळूं नये. हातांत रहाण्यासारखी लहान घडी नसल्यास ती एका पाटावर ठेवून, पाय स्वच्छ धुवून पायांनीं दाबल्यासहि पाणी साफ निघून जातें. नंतर घडी उलगडून पूर्वीचा जसा आकार असेल त्याप्रमाणें देऊन तो कपडा दोरीवर टाकावा व ओला असेपर्यंत बाही वगैरे सारखी ओढून तिला जशाचा तसा आकार आणावा. वाळल्यावर इस्त्री फिरविणें जास्त चांगलें. ज्यांच्यापाशीं हें साधन नसेल त्यांनीं एका स्वच्छ घांसलेल्या लोटींत किंवा तपेलींत विस्तव टाकून ती तापवावी. टेबल नसल्यास पाटावर एक स्वच्छ चौघडी ठेवून त्यावर लोंकरीचा कपडा सारखा पसरावा. त्यावरून ओल्या कपड्याचा पदर टाकावा व ती तापविलेली लोटी त्यावरून फिरवावी, म्हणजे धुण्यांत विस्खळीत झालेली विण सारखी बसते. केव्हांहि इस्त्री करतेवेळीं वरून ओल्या कपड्याचा पदर घालण्यास

विसरूं नये. त्यामुळें लोंकर फुलत नाहीं व कदाचित इस्त्री जास्त तापलेली असली तरी आंतला कपडा जळण्याची भीति रहात नाहीं.

टांक्यांची माहिती.

ज्यांना विणकामांत प्रावीण्य संपादावयाचें असेल, त्यांनीं फक्त पुस्तकावरून विणतां येऊं लागलें म्हणजे झालें असें समजूं नये, तर त्यांनीं निरनिराळे टांके व विणी कशा बनतात हें समजून घेतलें पाहिजे. क्रोशे—आंकड्याच्या सुईनें विणलेली वस्तु पाहून ती कशी विणली असावी हें जसें टांक्यांवरून आपल्याला समजून घेतां येतें, तशीं निटिंग म्हणजे २ किंवा ४ सुयांवरील वस्तूची विण सहज लक्षांत येत नाहीं. परंतु थोड्याशा श्रमानें तोहि नमुना वस्तू पाहून बनवितां येणें शक्य आहे. एवढ्यासाठीं प्रथम टांक्यांची माहिती असणें अवश्य होय.

टांके वाढविण्याचे दोन प्रकार आहेत. १ आटीं घेणें व २ एका टांक्यांत दुसरा टांका विणणें. आटी घेण्यानें जाळी पडते.

टांके कमी करण्याचे तीन प्रकार. १ दोहोंतून एकदम, २ पुढल्या टांक्यावरून मागला टांका उलटून टाकणें. ३ टांके बुजाविणें.

एक ओळ साधी व एक ओळ उलटी विणली असतां ज्या बाजूला उभ्या वेण्या पडतात ती सुलट होय व आडवे सर येतात ती उलट बाजू होय.

यावरून विणतेवेळीं हें लक्षांत ठेवावें कीं जेथें जाळी पडायला हवी तेथें आटी घेतली पाहिजे. वेणी असल्यास साधे टांके व आडवे असल्यास उलट टांके विणले पाहिजेत. आटीं घेऊन दोहोंतून एकदम विणलें असतां टांके कमी न होतां जाळी पडते. टांक्यासंबंधीं इतकी माहिती असली म्हणजे एखादी विण जर चुकत असली तर ती आपल्यालाच दुसऱ्या कोणाच्या मदतीवांचून सुधारतां येणें शक्य आहे. इतकेंच नव्हे तर कदाचित् पुस्तकांतहि कोठें छापण्यांत चुकीचे आंकडे पडले असले तर तेहि आपल्याला थोड्याशा विचारानें सुधारतां येतात.

टांके घालणें—डाव्या हातांतल्या सुईला धाग्याची सुरगांठ द्यावी. त्या गांठींत उजव्या हातांतली सुई घालून धाग्याचा एक वेढा द्यावा व त्या वेढ्यासह सुई बाहेर काढावी. हा टांका डाव्या सुईवर घालून असाच दुसरा टांका विणावा. याप्रमाणें सर्व टांके घालावे.

साधा टांका—टांके घातलेली सुई डाव्या हातांत धरून दुसरी सुई उजव्या हातांत घ्यावी. धागा उजव्या हातांत ठेवावा. पहिल्या टांक्यांत सुई घालून धाग्याचा वेढा द्यावा व त्या वेढ्यासह सुई बाहेर काढून डाव्या हातांतल्या सुईवरील टांका सोडून द्यावा. पुनः दुसऱ्या टांक्यांत सुई घालून नवीन टांका विणावा व जुना टांका सोडून द्यावा. याप्रमाणें नवीन सर्व टांके उजव्या सुईवर येतात व डाव्या सुईवरले संपतात. पुनः ती रिकामी सुई उजव्या हातांत घेऊन दुसरी ओळ विणावी.

उलट टांके— उजव्या हातांतली सुई टांक्यांत वरून न घालतां खालून घालावी. धाग्याचा वेढा वरून द्यावा व सुई खालून बाहेर काढावी, म्हणजे उलट विण येते.


नुस्ता टांका—टांका न विणतांच डाव्या सुईवरून काढून घ्यावा. प्रत्येक ओळीच्या आरंभीं १ टांका नुस्ता घेतला असतां कडेचे टांके सारखे येतात.

टांका वाढविणें—नवीन टांका विणल्यानंतर डाव्या सुईवरील टांका सोडून न देतां त्या टांक्यांत मागल्या बाजूनें दुसरा टांका विणून मग सोडावा, म्हणजे एकाचे दोन टांके होतात.


आटी घेणें—एक साधा टांका विणून धागा सुईवरून घ्यावा व दुसरा टांका विणावा म्हणजे सुईला धाग्याचा जो वेढा पडतो ती आटी होय.

एकाचे तीन टांके—साधा टांका विणून डाव्या सुईवरील टांका सोडून न देतां उजव्या सुईवर एक आटी घेऊन त्याच टांक्यांत दुसरा साधा टांका विणावा. मग डाव्या सुईवरला टांका सोडून द्यावा. म्हणजे ३ टांके होतात.


जादा टांका—नवीन टांके घालणे. याचा उपयोग बहुधा गुंडीचें घर करण्याकडे होतो. मागल्या ओळींत जेथें टांके बुजविलेले असतात, तेथेंच तितकेच नवीन टांके घालावे. गुंडीच्या मानानें ३ किंवा ४ टांके घालावे.




न. १




नं. २




नं.३







नं. ४



नं. ५



नं. ६



नं. ७

दोहोंतून एकदम--टांके कमी करणें. सुई दोन टांक्यांतून घालून एक साधा टांका विणणें. हे टांके उलट किंवा सुलट दोन्ही बाजूंनीं विणतां येतात.

तिहींतून एकदम--आपण उलटा टांका विणतों त्याप्रमाणें वरून तीन टांक्यांत सुई घालावी, तिला धाग्याचा वेढा देऊन तिन्ही टांक्यांतून काढावी. व एक टांका करावा. हा टांका नेहमीं उलटाच विणावा.

टांका उलटणें—दोन टांके विणून मागला टांका पुढल्या टांक्या-वरून उलटून टाकावा.

टांके बुजविणें—दोन टांके विणून मागला टांका पुढल्या टांक्यां-वरून उलटावा. पुनः आणखी एक टांका विणून पूर्वींचा टांका त्यावरून उलटून टाकावा. याप्रमाणें सर्व टांके बुजवावे.

टांके उचलून घेणें—विणलेल्या भागाच्या कडेनें जी वेण्यांची उभी ओळ असते, त्या प्रत्येक वेणींत सुई घालून नवीन टांका विणावा. या प्रमाणें सर्व टांके उचलून घ्यावे.

दोन सुयांनीं कोणतीहि वस्तु विणतेवेळीं नेहमीं पहिला टांका नुस्ता काढून घ्यावा, म्हणजे कडेनें सारखी विण पडते.

विणलेले भाग जोडणें—सर्व भाग विणून झाल्यावर ते जसे जोडा-वयाचे असतील त्याप्रमाणें जुळवून टांचणीनें जोडून ठेवावे. नंतर क्यान-व्हसच्या सुईंत धागा ओंवून शेवटीं गांठ न देतां जेथून शिवावयाचें असेल त्याच्या उलट दिशेनें सुमारें इंचभर अंतरापासूनच्या टांक्यांतून सुई घालून ती आरंभाच्या पहिल्या टांक्यांतून काढावी. धाग्याचा शेवट वरच्या टांक्यांत राहूं द्यावा व टांके शिवण्यास आरंभ करावा. म्हणजे धाग्याचा शेवट शिवला जाऊन तो मजबूत होतो. गांठ दिली असतां ती केव्हां केव्हां सुटते किंवा टांक्यांतून निघून शिवण उसवते. मोठी गांठ दिसायला वाईट दिसून ती बोचतेहि. शेवटीं किंवा मध्येंच धागा संपला असतां गांठ देऊन धागा तोडूं नये. बाजूच्या ३,४ टांक्यांतून धागा गुंतवून अर्ध्या इंचावर तोडावा. म्हणजे गांठ सुटत नाहीं.

लोंकर जोडणें—धागा मध्येंच संपला म्हणजे त्याला गांठ देऊन विणण्याची किंवा शिवण्याची सर्व साधारण पद्धत आहे. पण त्यामुळें विणलेली वस्तु बोजड दिसूं लागते. गांठ सैल असल्यास ती सुटून सर्व

विण उसवली जाते. करितां गांठ न देतां भागण्यासारखें असेल तेथें गांठ देऊं नये. धाग्याचे दोन शेवट एक इंचभर उलट दिशेनें एकावर एक ठेवून थोडा पिळ द्यावा व दोन्ही धाग्यांनीं विणावें. तेवढे २,३ टांके थोडे जाड दिसतात, पण बारकाईनें पाहिल्या खेरीज ते लक्षांत येत नाहींत. विणकामांत गांठी, धाग्याचे शेवट व सांधे जेवढे कमी दिसतील तेवढें विणणारणीचें अधिक कौशल्य व्यक्त होतें.

तुटलेले टांके जोडणें—लोकरीची वस्तु विणून ठेवलेली असली व ती कांहा दिवस तशीच पडून राहिली म्हणजे तिला कसर लागण्याची भीति असते. किंवा मधलाच टांका सुटून तो उसवतो. तेव्हां ते टांके लगेच जोडून न घेतले तर सर्व विण उसवत जाते. असे तुटलेले टांके पुढील प्रमाणें जोडावे. खालचे व वरचे टांके सारखे एका ओळींत धरावे. ज्या लोंकरीची वस्तु विणलेली असेल त्याच जातीचा व तेवढ्याच जाडीचा धागा क्यानव्हसच्या सुईमध्यें ओंवावा. वरल्या तीन चार टांक्यांतून सुई काढून तुटलेल्या टांक्यांत धाग्याचा शेवट गुंतवावा व त्या तुटलेल्या टांक्याच्या शेजारच्या टांक्यांतून आंतल्या बाजूनें धागा घेऊन तो बाहेरून काढावी. खालच्या टांक्यांत बाहेरून सुई घालून शेजारच्या टांक्यांतून ती काढावी. पुनः वरून ज्या टांक्यांतून धागा काढला त्याच टांक्यांत घालून त्याच्या शेजारच्या टांक्यांतून काढावी. नंतर खालच्या ज्या टांक्यांतून सुई घेतली, त्यांत ती घालून त्याच्या शेजारच्या टांक्यांतून काढावी. याप्रमाणें सर्व टांके जोडावे. धाग्याची वेणी सारखी पडली म्हणजे सांधा दिसत नाहीं. (आकृति २ पहा.)

साधी विण असल्यास त्याच्या वेण्या पडत नाहीं. तेव्हां साधे टांके पुढील प्रमाणें जोडावे. धाग्याची वेणी आंतून धरावी व शेजारच्या टांक्यांत धागा बाहेरून घालावा. म्हणजे साधी विण पडते. (आकृति ३ पहा).

सांखळी—आंकड्याच्या सुईला एक सुरगांठ द्यावी. धागा हातांत घट्ट धरून आंकड्यानें एक वेढा घ्यावा व त्या वेढ्यासह सुरगांठींतून आंकडा बाहेर काढावा. पुनः दुसरा वेढा देऊन सुईवरल्या टांक्यांतून आंकडा काढावा. याप्रमाणें सांखळी विणत जावी.

पाव टांका—सांखळींत आंकडा घालून एक वेढा द्यावा व त्या वेढ्यासह आंकडा सांखळींतून व सुईवरल्या टांक्यांतून एकदम काढावा. (आकृति ४ पहा.)

अर्धा टांका—सांखळींत आंकडा घालून एक टांका विणावा व सुईला वेढा देऊन तो सुईवरल्या दोन्ही टांक्यांतून काढावा. (आ० ५ पहा.)

पूर्ण टांका—सुईवर एक टांका नेहमीं असतोच. त्याच्या पुढें धाग्याचा एक वेढा घेऊन खालच्या सांखळींत एक टांका विणावा म्हणजे सुईवर तीन टांके होतात. सुईला वेढा देऊन तो दोन टांक्यांतून काढावा. पुनः वेढा देऊन राहिलेल्या दोन टांक्यांतून काढावा. (आकृति ६ पहा.

मोठा टांका—सुईला दोन वेढे देऊन टांका विणावा. प्रत्येक वेळेला दोन टांक्यांतून सुई काढावी, याप्रमाणें तीन वेळा विणावें.

लांब टांका—सुईला तीन वेढे घेऊन बाकी सर्व मोठ्या टांक्याप्रमाणें विणावें.

जाळीचा टांका—एक पूर्ण टांका विणावा व एक सांखळी घ्यावी. खालचा एक टांका सोडून पुढल्या टांक्यांत पूर्ण टांका विणावा म्हणजे जाळी पडते.

फुलीचा टांका—पुढल्या टांक्यांत आंकडा घालून व वेढ्यासह सुई-बाहेर काढून १ सांखळी विणावी. नंतर त्या दोन्ही टांक्यांतून धाग्यासह सुई काढून त्यांचा १ टांका करावा.

दुहेरी टांका—१ अर्धा टांका विणून त्या विणलेल्या टांक्यांत दुसरा अर्धा टांका विणावा.

वर्तुळ—हव्या तेवढ्या लांब सांखळी विणून पहिल्या सांखळींत १ पाव टांका विणावा.

खांब—२ किंवा ३ पूर्ण टांके ओळीनें घेतले असतां त्याला खांब म्हणतात.

या पुस्तकांत खुणेचीं अक्षरें वापरलीं आहेत. त्यांचा पुढीलप्रमाणें अर्थ समजावा.

* अशी फुली असेल त्याच्या पुढलेच टांके पुनः विणावयाचे. मागल्या टांक्यांची पुनरावृत्ति होऊं नये म्हणून त्यांच्या पुढें ही फुली दिलेली असते.

निटिंग म्ह० सळ्यांवरील विणकाम.


ओ=ओळ.

ओ. प्र=ओळीप्रमाणें.


आ=आटी घेणें.
उ=उलटा टांका.
सा=साधा टांका.
नु=नुस्ता काढून घेणें.
नु. उ=नुस्ता काढलेला टांका पुढल्या टांक्यावरून उलटून टाकणें.
जा=जास्त नवीन टांका घालणें.
२ ए=दोहोंतून एकदम.
३ ए=तिहींतून एकदम.
वा=एका टांक्यांतच दुसरा टांका विणून वाढविणें
न. प्र=नमुन्याप्रमाणें.
टां बु=टांके बुजविणें.

क्रोशे म्ह० आंकड्याच्या सुईचे टांके.


सां=सांखळी
पा. टां=पाव टांका.
अ. टां=अर्धा टांका.
पू टां=पूर्ण टांका.
मो. टां=मोठा टांका.
जा. टां=जाळीचा टांका.
लां. टां=लांब टांका.
फु. टां=फुलीचा टांका.
दु. टां=दुहेरी टांका
व=वर्तुळ.
फे=फेरा.
खां=खांब.




नं. ८




नं. ९



नं. १०



नं. १८



नं. १९



नं. २०

विणी.

साधी परडीची विण. नं. ७.

८ च्या पाळ्यानें टांके घाला.

ओळ पहिली—४ सा; ४ उ.

ओळ दुसरी—४ उ; ४ सा.

ओळ तिसरी—४ सा; ४ उ.

ओळ चवथी --सर्व उलटी. हा एक नमुना झाला. पुनः पहिल्या ओळीपासून आरंभ.

फुलांच्या परडीची विण नं. ८,

१२च्या पाळ्यानें टांके घाला.

ओळ पहिली–सर्व साधी.

ओळ दुसरी ४ उ; ८ सा.

ओळ तिसरी--सर्व साधी.

ओळ चवथी--४ उ; ८सा.

ओळ पांचवी--सर्व साधी.

ओळ सहावी--६ सा; * ४ उ. ८ सा; * पासून आरंभ. शेवटीं २ सा.

ओळ सातवी--सर्व साधी.

ओळ आठवी--सहाव्या ओळीप्रमाणें. हा एक नमुना झाला.

वेताच्या परडीची विण नं. ९.

८ च्या पाळ्यानें टांके घाला.

ओळ पहिली--६ उ; २ सा.

ओळ दुसरी—२ उ; ६ सा. या दोन ओळी आणखी दोन वेळां विणा.

ओळ सातवी—२ उ; * २ सा, ६ उ; *पासून आरंभ.शेवटीं४उ.

ओळ आठवी--४ सा; * २ उ. ६ सा; * पासून आरंभ. शेवटीं २साध.या दोन ओळी आणखी२वेळां विणा.बारा ओळींचा१नमुना झाला.

चौकटीची विण. नं. १०.

ही विण दोन रंगांत खुलून दिसते. रंगीत लोंकरीनें ५ च्या पाढ्यानें टांके घाला.

ओळ पहिली–सर्व साधी.

ओळ दुसरी–पांढऱ्या लोंकरीनें त्रिणा. १ नु. ४ सा.

ओळ तिसरी–४ उ, १ नु; (प्रत्येक ओळींत रंगीत टांका नुस्ता घ्यावयाचा)या दोन ओळीप्रमाण आणखी एकदां विणा.

ओळ सहावी-रंगीत लोंकरीनें सर्व साधी.

ओळ सातवी–रंगीत. सर्व उलटी. हा एक नमुना झाला पुनः पांढऱ्या धाग्यानें दुसऱ्या ओळीपासून आरंभ करा.

विषम हिरकणीची विण नं. ११.

३ च्या पाढ्यानें टांके घाला.

ओळ पहिली– १ नु; *१ उ, १ सा;*पासून आरंभ.

ओळ दुसरी–१ सा, १ उ.

या दोन ओळींचा नमुना झाला. पहिल्या ओळींत जेथें साधा टांका असेल, तेथें पुढल्या ओळींत उलटा टा. त्रिणा. म्हणजे हिरकण्या तिरप्या रेषेंत येतील. या विणीच्या दोन्ही बाजू सारख्या असल्यामुळें याचा स्कार्फ सुंदर दिसतो.

साधी चटयीची विण नं. १२.

१२ च्या पाढ्यानें टांके घाला. ६ सा, टां, ६ उ, टां, अशा ६ ओळी.पुढें ६ उ, टां. ६ सा. टां अशा ६ ओळी. याप्रमाणें प्रत्येक ७व्या ओळीपासून टांक्यांचा क्रम बदलून साधे असतील तेथें उलट त्रिणा. ही विण दोन्ही बाजूंनीं सारखी येते,

---

जपानी चटयीची विण नं. १३.

६ च्या पाढ्यानें टांके घाला.

ओळ पहिली–२ सा. उ.

ओळ दुसरी--२ उ. २ सा. या २ ओळी आणखी ४ वेळां विणा.

ओळ अकरावी--सर्व साधी.
ओळ बारावी--सर्व उलट.
ओळ तेरावी--२ उ. २ सा.
ओळ चौदावी--२ सा. २ उ; या २ ओळी आणखीं ४ वेळां विणा
ओळ तेवीसावी--सर्व साधी.
ओळ चोवीसावी--सर्व उलट. पुनः १ ल्या ओळीपासून आरंभ.

साधी जाळीची विण.

२ च्या पाढयानें टांका घाला.
ओळ पहिली-- आ. २ ए.
ओळ दुसरी--सर्व उलट. या विणीचा उपयोग फित घालण्याची जाळी पाडण्यासाठीं करतात. करितां या विणीची आकृति दिली नाहीं.

खांबाची विण नं. १४.

८ च्या पाढ्यानें टांके घेऊन शेवटीं १ टांका जास्त घ्या.
ओळ पहिली--१सा, २ उ, ३ सा, २ उ. असें शेवटपर्यंत; शेवटीं १ सा.
ओळ दुसरी--१ तु * २ सा, ३ उ,२ सा, १ उ;* पासून पुनः आरंभ. या २ ओळींचा १ नमुना झाला.

दुहेरी गोणपाटाची विण नं. १५.

२ च्या पाढ्यानें टांके घाला. आ. २ ए. अशा सर्व ओळी विणा. ही विण दोन्ही बाजूंनीं सारखी असल्यामुळें गळपट्टा व आसन यांस सुरेख दिसते.

मोराच्या पिसाची विण नं. १६

१८ च्या पाढ्यानें टांके घाला.
पहिली ओळ—२ ए, ३ वेळां; आ १ सा, ६ वेळां; २ ए. ३ वेळां.
दुसरी ओळ—सर्व उलटी.
तिसरी ओळ—सर्व साधी.

चवथी ओळ—सर्व उ. पुनः १ ल्या ओळींपासून आरंभ.

जाळीदार पानांची विण. १७.

६ च्या पाढ्यानें टांके घाला.

पहिली ओळ—३ सा;*आ.१नु. २ ए; नुस्ता टांका पुढल्या टांक्या-वरून उलटा. आ. ३ सा; * पासून आरंभ.

दुसरी ओळ—सर्व उलट. (या ओळींत १ टांका कमी झाल्यास नवीन घाला.)

तिसरी ओळ--आ १ नु. २ ए; नु. उ; आ ३ सा.

चवथी ओळ--सर्व उलट. पुनः १ ल्या ओळीपासून आरंभ.

कमानीची जाळीदार विण नं. १८

१३ च्या पाढ्यानें टांके घाला.

पहिली ओळ--२ ए. ४ सा; आ. १सा; आ. ४ सा; २ ए.

दुसरी ओळ-सर्व उलट. या २ ओळी आणखी ५ वेळां विणा.

ओळी १३ व १५-सर्व उलट.

ओळी १४ व १६—सर्व साध्या. पुनः १ ल्या ओळींपासून आरंभ.

वाकड्या जाळीची विण नं. १९

१३ च्या पाढ्यानें टांके घाला.

पहिली ओळ-१ सा; *आ १ नु. १ सा; नु. उ. ३ सा; *पासून आरंभ.

दुसरी ओळ-सर्व उलट.


तिसरी ओळ-२ सा; पुढले सर्व टांके १ ल्या ओळी प्रमाणें.

ओळ ४, ६, ८, १०, सर्व उलट.


पांचवी ओळ-३ सा; पुढले सर्व १ ल्या ओळी प्रमाणें

सातवी ओळ-४ सा; बाकी सर्व १ ल्या ओळी प्रमाणें.


नववी ओळ-आ, १नु; १ सा; नु, उ; ३ सा. हा १ नमुना झाला पुनः १ ल्या ओळींपासून आरंभ.




नं. ११




नं. १३




नं. १२




नं. १४



नं. १५



नं. १६



नं. १७

जाळीच्या परडीची विण नं. २०

१८ च्या पाढ्यानें टांके घाला.

पहिली ओळ–३ सा, ३ उ, ३ सा;आ २ ए .१ सा, १ उ, १ सा, १उ, १ सा, आ २ ए.

दुसरी ओळ–२ सा१ उ, १ सा, १ उ, १ सा, १ उ, २ सा, ३उ, ३ सा, ३ उ.

तिसरी ओळ—३ सा, ३ उ, ३ सा, आ २ ए. १ उ, १ सा, १उ, आ २ ए.

चवथी ओळ—३ सा, १ उ, १ सा,१ उ, ३ सा, ३ उ, ३ सा,३उ.

पांचवी ओळ—३ उ, ३ सा, ३ उ, आ २ ए, १ सा, १ उ, १ सा, १ उ १ सा, आ २ ए.

सहावी ओळ--२ सा, १ उ, १ सा, १ उ, १ सा, १उ, ५ सा, ३ उ, ३ सा.

सातवी ओळ–३ उ, ३ सा, ३ उ, आ २ ए,१ उ, १ सा, १ उ, १ सा, १ उ, आ २ ए.

आठवी ओळ–३ सा, १ उ, १ सा, १ उ, ६ सा, ३ उ, ३ सा. येथें १ नमुना झाला. पुनः १ ल्या ओळीपासून आरंभ करा.

गोळ्याची विण नं. २१

१६ च्या पाढ्यानें टांके घाला. १ ओळ सर्व सा, दुसरी सर्व उ, अशा क्रमानें ८ ओळी विणा.

नववी ओळ—सर्व उ, पुढली सा, अशा क्रमानें ८ ओळी.

सतरावी ओळ--सर्व साधी. पुढली उ, अशा क्रमानें आणखी ८ ओळींचा साधा पट्टा व ८ ओळींचा उलट पट्टा. असें जेवढें लांब विणावयाचे असेल तेवढे पट्टे ध्या.

शेवटली ओळ—४ टांके साधे. १टांका सुईवरून सोडून द्या. पुनः ४ सा. याप्रमाणें प्रत्येक पांचवा टांका सुईवरून सोडून पुढले ४ टांके साधे विणा व टांके बुजवा नंतर सोडलेले टांके खालपर्यंत उसवा म्हणजे ओळीनें जाळी पडेल.

मधाच्या पोळ्याची विण नं. २२

तिहीच्या पाढयानें टांके घालून शेवटीं एक टांका जास्त घ्या.

पहिली ओळ—आ, १ नु, २ ए. शेवटीं १ टां, साधा विणा.

दुसरी ओळ—३ सा; १ नु; *२ सा, १ नु; *पासून आरंभ (मागल्या ओळींत जो आटी घेतलेला टांका तो नुस्ता काढावयाचा.)

तिसरी ओळ—२ ए. *आ, १ नु, २ ए; * पासून आरंभ. शेवटीं आ १ सा.

चवथी ओळ—२ सा, १ नु; शेवटीं १ साधा.

या चार ओळींचा एक नमुना झाला. पुनः पहिल्या ओळीपासून आरंभ.

वाटाण्याची विण नं. २३

४ च्या पाढयानें टांके घाला, शेवटीं १ टांका जास्त घ्या, प्रत्येक ओळीच्या आरंभीं १ टांका, नेहमीं नुस्ता काढून घ्यावा,

पहिली ओळ–३ए,(उलट टांक्याप्रमाणें). १ टांक्याचे ३ टांके, म्ह० (१ सा, आटी घेऊन त्याच टांक्यांत पुनः साधा,) या दोन टांक्यांची सर्व ओळ विणा.

दुसरी ओळ--सर्व उलटी.

तिसरी ओळ—१ टांक्याचे ३ टांके; ३ ए.

चवथी ओळ–सर्व उलटी, पुनः पहिल्या ओळीपासून आरंभ.

नक्षत्राच्या खांबाची विण नं. २४

२ च्या पाढ्यानें टांके घाला.

पहिली ओळ–१ सा; १ उ.

दुसरी ओळ—साधी; हा १ नमुना झाला. पुनः पहिल्या ओळीपासून आरंभ करा.

जासवंदीच्या पानाची विण नं. २५

१३ च्या पाढ्यानें टांके घ्या.

पहिली ओळ—१ नु. १ सा. नुस्ता टांका पुढल्या टांक्यावरून उलटावा ४ सा. आ. १ सा. आ. ४ सा, २ ए.

दुसरी, चवथी, सहावी, आठवी, व दहावी या सर्व ओळी उलट विणा.

तिसरी ओळ—१ नु, १ सा; नु. उलटून टाका; ३ सा; आ ३ सा. आ ३ सा. २ ए.

पांचवी ओळ—१ नु. १ सा; नु. उलटून टाकावा. २ सा. आ. ५ सा. आ, २ सा. २ ए.

सातवी ओळ—१ नु. १ सा. नु. उलटून टाकावा. १ सा, आ ७सा आ १ सा; २ ए.

नववी ओळ—१ नु १ सा, नु उलटून टाकावा. आ ९ सा. आ.२ ए. हा १ नमुना झाला पुनः १ ल्या ओळीपासून विणा.

जाळीच्या लेरयाची विण. नं. २६.

एका नमुन्याला २८ टांके घाला.

पहिली ओळ—१ नु. १ सा; आ २ ए. १ सा. आ २ ए. ३ सा. आ २ ए. आ २ ए. ३ सा; आ २ ए. ५ वेळां; शेवटीं १ सा.

दुसरी ओळ—१ नु. १ सा, आ २ ए, ७ सा, ३ उ, ४ सा, ३ उ, ४ सा, आ २ ए. १ सा.

तिसरी ओळ—नु. १ सा; आ. २ ए. ३ वेळां; ३ सा; आ २ ए. २ वेळां; ३ सा, आ. २ ए. ३ वेळां, १ सा, आ. २ ए; १ सा.

चवथी ओळ—नु. १ सा, आ २ ए. ६ सा, ३ उ, ४ सा, ३ उ, ५ सा, आ २ ए; १ सा.

पांचवी ओळ—नु. १ सा, आ २ ए. १ सा; आ २ ए. २ वेळां;३ सा, आ २ ए. २ वेळां; ३ सा, आ २ ए. ४ वेळां, १ सा.

सहावी ओळ—नु. १ सा, आ २ ए, ५ सा, ३ उ, ४ सा, ३ उ, ६ सा, आ २ ए, १ सा.

सातवी ओळ—नु. १ सा; आ. २ ए. ४ वेळां; ३ सा; आ २ ए. २ वेळां; ३ सा; आ २ ए. २ वेळां; १ सा, आ २ ए; १ सा.

आठवी ओळ—नु. १ सा; आ २ ए. ४ सा. ३ उ, ४ सा. ३ उ. ७ सा; आ २ ए. १ सा.

नववी ओळ—नु, १ सा, आ २ ए; १ सा. आ २ ए. ३ वेळां; ३ सा, आ २ ए. २ वेळां; ३ सा, आ २ ए. ३ वेळां; १ सा.

दहावी ओळ—नु. १ सा, आ २ ए. ३ सा. ३ उ, ४ सा, ३ उ. ८ सा. आ २ ए; १ सा.

अकरावी ओळ--नु. १ सा. आ २ ए. ५ वेळां; ३ सा, आ २ ए; २ वेळां; ३ सा, आ २ ए; १ सा. आ २ ए. १ सा.

बारावी ओळ—नु, सा, आ २ ए, २ सा, ३ उ, ४ सा, ३ उ, ९ सा, आ २ ए; १ सा.

तेरावी ओळ—नु. १ सा; आ २ ए; १ सा. आ २ ए. ४वेळां; ३सा, आ २ ए. २ वेळां; ३ सा. आ २ ए. २ वेळां; १ सा.

चवदावी ओळ—नु. १ सा, आ २ ए; १ सा, ३ उ, ४ सा, ३ उ, १० सा. आ २ ए; १ सा.

पंधरावी ओळ--नु. १ सा, आ २ ए. ५ वेळां; ३ सा, आ २ ए. २ वेळां; ३ सा, आ २ ए. १ सा, आ २ ए. १ सा.

सोळावी ओळ--१२ व्या ओळी प्रमाणें.

सतरावी ओळ--९ व्या ओळी प्रमाणें;

अठरावी ओळ--१० व्या ओळी प्रमाणें;

एकोणीसावी ओळ--७ व्या ओळी प्रमाणें;

विसावी ओळ--८ व्या ओळी प्रमाणें;

एकवीसावी ओळ--५ व्या ओळी प्रमाणें;

बावीसावी ओळ---६ व्या ओळी प्रमाणें;

तेवीसावी ओळ--३ ऱ्या ओळी प्रमाणें;

चोवीसावी ओळ—४ थ्या ओळी प्रमाणें;

पंचवीसावी ओळ--१ ल्या ओळी प्रमाणें;


सव्वीसावी ओळ-- २ ऱ्या ओळी प्रमाणें;

पुनः पहिल्या ओळी पासून आरंभ करा. येथें १ नमुना पुरा झाला.

दोन सुयांवरील गोणपाटाची विण.

१२ टांके घ्या. २ च्या पाढ्यानें हवे तेवढें जास्त टांके घाला.


पहिली ओळ—१ टांका साधा विणून डाव्या सूईवरला टांका सोडून न देतां, नवा विणलेला टांका सुईवरून हलकेंच काढा व तो डाव्या सुई-वरला टांका उजव्या सुईवर घ्या. नंतर नवा विणलेला टांका डाव्या सुईवर




नं. २१




नं. २२




नं. २३




नं. २४



नं. २५



नं. २६



नं. २७

घ्या. या नव्या टाक्यांत १ सा. टां. विणा. हा विणलेला टांका डाव्या सुईवर घेऊन त्याच्या मागला १ टांका या टांक्यांवरून उलटून द्या. नंतर तो टांका उजव्या सुईवर घ्या. म्हणजे उजव्या सुईवर दोन टांके होतील. त्या टांक्यांच्या आंतून सांखळी विणली जाऊन ती आडवी ओळ गोण-पाटासारखी दिसेल. असे पुढले सर्व टांके विणा.

दुसरी ओळ—सर्व उलट.

एका सुईवरील गोणपाटाची विण. नं. २७.

जितकी लांब वस्तु विणावयाची असेल तेवढ्या सांखळ्या घ्या. सुईपासून २ ऱ्या सांखळींत आंकडा घालून १ टांका घ्या. पुढल्या सांखळींत तसाच १ टांका, याप्रमाणें प्रत्येक सांखळींत एकेक टांका विणा. जितक्या सांखळ्या असतील तेवढे टांके सुईवर येतील. नंतर आंकड्याला वेढा देऊन २ टांक्यांतून सुई काढा. पुनः आटी घेऊन २ टांक्यांतून घ्या. याप्रमाणें सर्व टांके संपेपर्यंत विणा. पुनः पहिल्या पासून आरंभ.

आंकड्याच्या सुईवरील विणी.

सूर्यफुलाची विण. नं. २८.

६ च्या पाळ्यानें सांखळ्या घ्या, सूईपासून ३ ऱ्या सांखळींत ६ पू. टां; पुढली १ सां. सोडून १ अ. टां; पुनः १ सांखळी सोडून ७ पू. टां; याप्रमाणें प्रत्येक ३ ऱ्या सांखळींत एकदा १ अ. टां, व पुनः ६ पू. टां असें शेवटपर्यंत विणा. १ सांखळी घेऊन फिरवा.

ओळ दुसरी——१ ल्या टांक्यांत सुई घालून धाग्याचा वेढा द्या व त्या सह ती बाहेर काढा, पुनः दुसऱ्या टांक्यांत सुई घालून दुसरा असाच वेढा देऊन बाहेर काढा. असे चार टांक्यांतून चार वेढे घेतल्यानंतर सुईला नुस्ता वेढा देऊन ४ हि टांक्यांतून सुई बाहेर काढा. हे टांके बरेच ढिले ठेवा. १ सांखळी विणून पुढल्या प्रत्येक टांक्यांतून असाच ढिला टांका घ्या. असे ९ टांके झाले म्हणजे सुईला वेढा देऊन त्या ९ टांक्यांतून सुई काढा. पुढें १ सांखळी. याप्रमाणें शेवटपर्यंत विणा. १ सांखळी घेऊन फिरवा.

तिसरी ओळ--मागल्या ओळींत ९ टांके एकत्र विणल्याचा जो टांका असतो त्यांत ७ पू. टां; पुढल्या सांखळींत १ अ टां. याप्रमाणें शेवटपर्यंत विणा. १ सांखळी घेऊन फिरवा.

चवथी ओळ--दुसऱ्या ओळी प्रमाणें. हा एक नमुना झाला. पुढें सर्व ओळी दुसऱ्या व तिसऱ्या ओ. प्र. विणा.

फुलीची विण, नं. २९

२ च्या पाढ्यानें सांखळ्या घ्या. सुईपासून ४ थ्या सांखळींत १ पू. टां. नंतर ३ ऱ्या सांखळींत १ पू. टां. विणा. ह्मणजे फुली सारखे तिरपे टांके पडतील. याप्रमाणें पहिला टांका पुढल्या सांखळींत व दुसरा टांका मागल्या सांखळींत विणा. शेवटीं १ सां. विणून फिरवा. मागल्या ओळीच्या जाळींत १ पू. टां, व जाळींच्या आधीच्या फुलींत १ पू. टा. असें शेवटपर्यंत विणा. शेवटीं १ सांखळी. विणून फिरवा.

लहरीची विण. नं. ३०

१६ च्या पाढ्यानें सांखळ्या घ्या. सुईपासून दुसऱ्या सांखळींत १ अ. टां; ३ ऱ्या सांखळींत १ अ. टां; चवथ्या सांखळींत १ अ. टां; ५ व्या सांखळींत ३ अ. टां. पुढें प्रत्येक सांखळींत १ टांका, असें ३ अ. टां. २ सांखळ्या सोडून पुढल्या प्रत्येक सांखळींत १, असे ३ अ टां. पुढल्या सांखळींत ३ अ. टां. याप्रमाणें सर्व ओळ विणा; शेवटीं १ सांखळी घेऊन फिरवा. २ टांके सोडून प्रत्येक सांखळींत १ अ. टां. विणा, या ओळी विणते वेळीं टांक्याच्या दोन्हीं धाग्यांतून सुई न घालतां, मागल्या सांखळींतून टांके विणा; म्हणजे पुढल्या सांखळींची ओळ उठून दिसते. प्रत्येक ओळींत वरच्या टोंकाला ३ अ. टां. एकत्र विणा; व खालच्या टोंकाला २ सांखळ्या सोडून विणा. या विणीच्या दोन्हीं बाजू सारख्या येतात.

स्कार्फ अथवा गळपट्टे.

दुरंगी गळपट्टा नं. ३१.

व्हिक्युना जातीची लोंकर पांढरी ३ औंस, कोणत्याही घेऱ्या रंगाची ३ औंस, जाड सुया नं. ४ एक जोड.

पांढऱ्या लोंकरींनें २५० टांके घाला. ८ ओळी साध्या. घेऱ्या लोंकरींनें ८ ओळी साध्या. पुनः पांढऱ्या लोंकरीनें ८ ओळी. असें ५ वेळां; शेवटीं पांढऱ्या लोंकरीनें ७ ओळी साध्या विणून टांके बुजवा. एकंदर पांढरे व घेरे १३ पट्टे येतात. चार इंच लांबीच्या दशा प्रत्येक २ ऱ्या ओळींतून घालून गांठीं द्या. हा गळपट्टा अगदीं साधा असून सुंदर दिसतो.

साधा गळपट्टा नं. ३२.

राखाडी किंग फिशर लस्टर वूल ३ औंस. सुया नं. ११. एक जोड ५० टांके घाला.

पहिली ओळ—सर्व साधी.

दुसरी ओळ—४ सा, १ उ.

तिसरी ओळ—सर्व साधी.

चवथी ओळ—२ ऱ्या ओ. प्र. या क्रमानें सर्व ओळी ६० इंच लांब होईपर्यंत विणा. शेवटीं १ ओळ सा. विणून टां. बुजवा. २ इंच लांबीच्या दशा कापून त्यांच्या दोन्हीं बाजूला गांठीं द्या. नंतर दोन्हीं बाजूच्या दशा एकावर एक ठेवून कातरींनें कापून सारख्या लांबीच्या करा.

दुहेरी विणीचा स्कार्फ नं. ३३

'किंग फिशर लस्टर वूल' या लोंकरीचे स्कार्फ फार सुंदर दिसतात. पांढरी लोंकर ५ औंस, रंगीत अर्धा औंस. आल्युमिनियमच्या १२ नंबरच्या सुया १ जोड. ही लोंकर व सुया नसल्यास साध्या लोंकरींनें व पोलादी सुयांनीं विणावें. ४५ टांके घाला.

पहिली ओळ—१ सा, *आ. १ सा, *पासून आरंभ. एकंदर ९० टांके होतात.

दुसरी ओळ—१ नु, १ सा; उलटा टांका विणतें वेळीं घेतों तसा धागा वरच्या बाजूला घ्या, १ नु; धागा सुईवरून न घेतां नुस्त्या काढलेला टांक्यांवरून खालीं घ्या. १ सा, पुनः धागा वर घेऊन १ नु. धागा खालीं घेऊन १ साधा. याप्रमाणें सर्व ओळी विणा. प्रत्येक ओळीच्या आरंभीं १ नुस्ता घ्या. याप्रमाणें पांढऱ्या लोंकरीनें २ इंच लांब विणून रंगीत २ ओळी, पांढऱ्या २ ओळी, पुनः रंगीत २ ओळीं; पांढऱ्या ८ ओळी; रंगीत २ ओळी; पांढऱ्या २ ओळी; रंगीत २ ओळी पुढें सर्व पांढऱ्या ओळी. ४६ इंच लांब झाल्यावर पुनः रंगीत ओळी पहिल्या सारख्या विणून टांके बुजविण्यास घ्या, या विणीचे टांके साधे विणून बुजवावयाचे नाहींत. पहिले २ टांके २ ए; पुढलें २ ए. विणून नंतर पहिला टांका पुढल्या टांक्यावरून उलटून घ्या. पुनः २ ए; शेवटीं १सा. विणा व त्यावरून मागला उलटून द्या. ही विण दुहेरी असल्यामुळें दोन्ही बाजू सारख्या येऊन गळपट्टा जाड व जास्त उबदार होतो.

हिरकणीची, डबल गोणपाटाची, परडीची, या विणी दोन्हीं बाजूंनीं सारख्या असल्यामुळें गळपट्ट्याला सुरेख दिसतात.

लहरीची एका सुईची विणहि दोन्ही बाजूंनीं सारखी येते. यापैकीं कोणत्याहि विणीनीं गळपट्टा विणावा.

टाय. नं. ३४.


२२ सां. घ्या. स्कार्फ सिल्क १ औंस. आंकड्याची सूई नं. ७.

पहिली ओळ—२१ अ. टां; १ सां. फिरवा.


दुसरी ओळ—१ ल्या टाक्यांत १ फुलीचा टां; पुनः १ सां. सोडून २ फु. टां; याप्रमाणें शेवटपर्यंत विणा. शेवटीं १ सां. घेऊन फिरवा. प्रत्येक ओळीच्या आरंभीं १ फु. टां. घ्या, पुढल्या सर्व टांक्यांत २ फु, टां, याप्रमाणें सर्व ओळी. असें १५ इंच लांब विणा. नंतर प्रत्येक ३ ऱ्या ओळीच्या आरंभीं व शेवटीं १ टां, सोडून विणा. असे ८ टांके राहीपर्यंत कमी करा, व अ. टां नें १५ इंच लाब विणा. (ही गळ्याभोंवतालची पट्टी झाली.) नंतर प्रत्येक ३ ऱ्या ओळीच्या आरंभीं व शेवटीं २ टां, अधिक विणून २२ टां, होईपर्यंत वाढवा, पुनः फु, टां, नें १० इंच लांब विणा.




नं. २८



नं. २९



नं. ३०



नं. ३१



नं. ३२



नं. ३३

शेवटीं गांठ देऊन १ इंच दोरा तोडून, तो दोरा बाजूच्या टांक्यांत गुंतवून घ्या.

टाय. नं. ३५.

स्कार्फ रेशमाचें १ बंडल, आंकड्यांची सुई नं ७, १७ सांखळ्या घ्या.

ओळ पहिली व दुसरी—१६ अ. टां. १ सां. फिरवा.

तिसरी ओळ----४ अ. टां, २ दु, टां, ४ अ. टां, २ दु. टां, ४ अ टां, १ सांखळी.

चवथी ओळ--६ अ. टां, ४ दु. टां, ६ अ. टां, १ सां, फिरवा. तिसऱ्या व चवथ्या ओळीप्रमाणें क्रमानें १५ इंच लांब विणा. नंतर माने भोंवतालचा पट्टा अरुंद करण्यास घ्या. प्रत्येक तिसऱ्या ओळीच्या आरंभीं व शेवटीं १ टांका कमी करा. असे ८ टांके राहीपर्यंत याच न, प्र. विणा. नंतर प्रत्येक टांक्यांत १ अ. टांका अशा सर्व ओळी १५ इंच लांब होईपर्यंत विणा. आतां प्रत्येक तिसऱ्या ओळीच्या आरंभीं व शेवटीं १ टांका याप्रमाणें टांके वाढवा. दोन्ही बाजू सारख्या रुंदीच्या घ्या. नमुन्या प्रमाणें १० इंच विणून टांके बुजवा.

टायची लांबी ताणली जाऊन ती वाढूं नये म्हणून ज्या रंगाच्या रेशमानें टाय विणला असेल त्याच रंगाच्या सुतानें किंवा रेशमानें दोन्ही कडा मशिनवर शिवाव्या.

चार सुयांवरचा टाय.

निटिंग सिल्क अडीच औंस. ४ पोलादी सुया नं. १८. पहिल्या सुईवर १२ टांके. दुसरीवर २४ टांके व तिसरीवर १२ टांके, असे तिन्ही सुया मिळून एकंदर ४८ टांके घाला.

सर्व टांके साधे विणून तिन्ही सुयांचें वर्तुळ करा.

पहिला फेरा—१ टांका सा, आ १ नु. १ सा; नुस्ता टांका पुढल्या टांक्या वरून उलटावा. याप्रमाणें सर्व टांके विणा.

दुसरा फेरा—सर्व टांके उलटे विणा.

या दोन फेऱ्यांप्रमाणें १३ इंच लांब होईपर्यंत विणा. नंतर गळ्याभोंवती येणारी अरुंद पट्टी विणावयास घ्या. पहिला फेरा नमुन्याप्रमाणें विणून प्रत्येक उलटा फेरा विणतेवेळीं पहिल्या सुईवरले शेवटले २ टांके २ ए; व तिसऱ्या सुईवरील पहिले २ टांके २ ए. विणा. मधल्या सुईवरील टांक्यांत कांहीं बदल न करतां नमुन्याची विण सारखी येऊं द्या.

याप्रमाणें ३० टांके राहीपर्यंत कमी करा. हा अरुंद भाग १३ इंच लांब विणून पुढीलप्रमाणें टांके वाढवा. ज्या बाजूचे टांके कमी केले होते, तेथेंच प्रत्येक उलट फेऱ्याला आ १ सा, दोन जागीं विणा. असे ४८ टांके होईपर्यंत वाढवून न. प्र. ११ इंच लांब विणा व टांके बुजवा. दोन्ही टोंकांच्या उघड्या बाजू शिवून घ्या. टांके वाढविलेली बाजू खालीं धरून टायची घडी करा व इस्त्री फिरवा म्हणजे पट्टी सारखी बसेल.

पायमोजे.

नं. ३६

गुडघ्यापर्यंत पायमोजा. प्रकार १.

तीपेडी किंवा दुपेडी स्याक्सनी लोंकर गुलाबी रंगाची १ औंस. पांढरी १ औंस. सुया नं १४, १ जोड. पांढऱ्या लोंकरीनें तीन टांके घालून ते साधे विणा. प्रत्येक ओळीच्या आरंभीं आटी घेऊन १ टांका वाढवा व सर्व ओळ साधी विणा. असे ५० टां. होईपर्यंत विणा. पुढें न वाढवितां ६० ओळी साध्या विणा. नंतर दोन्ही बाजूंचे १७ टांके बुजवा. मधले १६ टांके विणावयास घ्या. १६ ओळी साध्या विणा. पुढल्या प्रत्येक ओळीच्या आरंभीं २ ए. पुढले सर्व टांके साधे, अशा तीन ओळी विणून टांके बुजवा.

आतां गुलाबी लोंकरीनें पावलाच्या कडेचे दोन्ही बाजूंचे टांके उचलून घ्या.

२२ ओळी साध्या विणून टांके बुजवा.

गुडघ्याचा भाग गुलाबी लोंकरीनें विणावयास घ्या.

६० टांके उचलून घ्या. **पहिली ओळ**—सर्व साधी.

दुसरी ओळ--आरंभीं २ टांके २ ए; सर्व साधी; या २ ओळींप्रमाणें ८ ओळी गुलाबी; ८ ओळी पांढऱ्या; १० ओळी गुलाबी. अशा विणून टांके बुजवा. शेवटच्या ओळीला ५० टांके रहातात. आंकड्याच्या सुईनें १ शिंपीची विण वरच्या कडेनें विणा व बाजू शिवून घ्या.

गुडघ्यापर्यंत पायमोजा प्रकार. २ नं. ३७

(आकृति दिलेली नाहीं.)

तपकिरी रंगाची बर्लिन वुल २ बंडल. लोखंडी सुयांचा जोड नं. १४. १ वार त्याच रंगाची अरुंद फित.

६० टांके घाला. २ टां. सा; २ टां. उ; अशा २४ ओळी; पुढली एक ओळ सर्व साधी.

गुडघा-पहिली ओळ—१ नु. ५१ सा. फिरवा.

दुसरी ओळ---१ नु. ४३ सा; फिरवा. (दोन्ही बाजूला ८ टांके न विणतां तसेच रहातात.)

ओळ तिसरी---१ नु. ४२ सा; फिरवा.

ओळ चवथी—१ नु. ४१ सा, फिरवा,

ओळ पांचवी—१ नु. ४० सा; याप्रमाणें प्रत्येक ओळीला १ टांका न विणतां ठेवून विणलेले टांके ११ होईपर्यंत विणा. (दोन्ही बाजूला न विणलेले २४ टांके सुईवर रहातात.) पुढल्या ओळीला सर्व टांके विणा. त्यापुढें १० ओळी साध्या.

पोटरी—पहिली ओळ—२ सा, १ वा, ४ सा. १ वा, ४८ सा. १ वा. ४ सा. १ वा. २ सा. पुढल्या २४ ओळी सर्व साध्या.

सव्वीसावी ओळ—२ सा. २ ए; शेवटीं ४ टां. राहीपर्यंत सर्व सा; २ ए. २ सा ; ५ ओळी सर्व सा; पुनः २६ ते ३१ व्या ओळी प्रमाणें आणखी ५ वेळां विणा. म्ह० ५२ टां. रहातील. पुढें २० ओळी साध्या एकतीसावी ओळ जाळीची म्ह० आ. २ ए विणा, पुढल्या ६ ओळी साध्या.

पाऊल--पहिली ओळ—३३ सा; फिरवा.

दुसरी ओळ--१ नु. १३ सा; फिरवा.

तिसरी ओळ--१ नु. १३ सा; फिरवा. (दोन्ही बाजूला १९ टांके न विणतां ठेवा.) या १४ टांक्यावर ३२ ओळी विणा.

तेहतिसावी ओळ--१ नु. २ ए; ८ सा. २ ए. १ सा. पुढल्या तीन ओळी सर्व साध्या.

सदतीसावी ओळ-१ नु. २ ए. ६ सा, २ ए. १ सा; १ ओळ सर्व साधी.

एकूणचाळीसावी ओळ--१ नु. २ ए. ४ सा, २ ए, १ सा; १ ओळ सर्व सा.

आतां पूर्वीचे जे १९ टांके आहेत त्यांच्यापुढें पावलाच्या बाजूचे २० टांके उचलून घ्या. हे सर्व टांके पावलासह विणून दुसऱ्या बाजूचे असेच उचलून घ्या. (एकंदर ८६ टां. होतात.) सतरा ओळी सर्व साध्या.

खोंट—पहिली ओळ--१ नु. २ ए. ३५ सा, २ ए, ६ सा. २ ए. ३५ सा. २ ए. १ सा.

दुसरी ओळ--सर्व साधी.

तिसरी ओळ--१ नु. २ ए. ३४ सा, २ ए. ४ सा. २ ए. ३४ सा, २ ए. १ साधा.

चवथी ओळ--सर्व साधी.

पांचवी ओळ—१ नु. २ ए. ३३ सा, २ ए. २ सा, २ ए. ३३ सा, २ ए. १ साधा.

सहावी ओळ—सर्व साधी.


सातवी ओळ--१ नु. २ ए. ३२ सा. २ ए २ ए. ३२ सा, २ ए. १सा.

आठवी ओळ-साधी. टांके बुजवा. लोंकरीनें बाजू शिवा व जाळीच्या विणींतून फित घाला. किंवा त्याच लोंकरीची सांखळी विणून दोन गोंडे बांधा.


लहान मुलांचा पायमोजा नं. ३८

सिंगल बर्लिन वुल एक औंस. हस्तिदंती सुयांचा एक जोड. हा मोजा पावलाकडून विणावयाचा.


४० टांके घाला. १ ओळ साधी. १ ओळ उलटी अशा २० ओळी विणा. प्रत्येक तिसऱ्या ओळीच्या आरंभीं व शेवटीं आ. १ सा., आणि मध्यें आ. २, सा. असे एकंदर ४ टांके वाढवा. नंतर सुईवरल्या टांक्याचे तीन विभाग करून मधला भाग विणावयास घ्या. या सर्व ओळी साध्या विणा. प्रत्येक ओळीच्या शेवटचा १ टांका व न विणतां ठेवलेल्या टांक्यांतील १




नं. ३४



नं. ३५




नं. ३६



नं. ८




नं. ३९



नं. ४१



नं. ४२



नं. ४३

टांका, असे मिळून २ ए. विणा. याप्रमाणें दोन्ही बाजूला ठेवलेल्या टांक्यातून प्रत्येक बाजूला शेवटीं १२ टां. राहीपर्यंत विणा. हें पाऊल झालें. पुढली ओळ २ सा*आ, २सा;*पासून आरंभ. असे सर्व टांके विणा. याच्यावर जाळीची विण घ्या. किंवा दुसरी कोणतीहि आवडीप्रमाणें विण घेऊन २ इंच लांब विणा व टांके बुजवा. शिवणी शिवून घ्या.

जाळीची विण--१ नु. १ सा. * आ ३ सा, २ ए, आ, ३ ए. आ ३ ए. १ सा. *पासून आरंभ. शेवटीं २ टांके राहिल्यास साधे विणा.

दुसरी ओळ—सर्व उलटी. या दोन ओळींचा एक नमुना झाला.

चार सुयांवरचा जाळीदार पायमोजा नं. ३९

(२ ते ३ वर्षांच्या मुलाकरितां.)

२ औंस स्याक्सनी लोंकर. पोलादी सुया २ जोड, नं १४. १ ल्या सुईवर १९ टां; २ ऱ्या सुईवर २७ टां; ३ ऱ्या सुईवर १८ टां; मिळून एकंदर ६४ टां. घ्या. १ टां. सा, १ टां. उ, असे २२ फेरे विणा.

जाळीची विण फक्त पुढल्याच बाजूला येते. करितां प्रत्येक फेऱ्याला पहिली सुई साधी, मधली जाळीची व शेवटीं साधी या क्रमानें विणा.

पहिला फेरा–दुसऱ्या दोन सुया साध्या विणा. २७ टांके असलेली सुई फक्त पुढल्या न. प्र. घ्या.१ उ. ३ सा. २ ए; * आ. ४ सा; २ ए;* पासून २ वेळां; शेवटीं आ २ ए, १ उ.

दुसरा फेरा—१ उ, २ सा, २ ए; * आ. ४ सा. २ ए; * पासून २ वेळां. शेवटीं आ. ३ सा. १ उ.

तिसरा फेरा—१ उ, १ सा. २ ए; * आ. ४ सा. २ ए; * पासून; आरंभ. शेवटीं आ ४ सा. १ उ.

चवथा फेरा—१ उ. २ ए; * आ. ४ सा. २ ए; * पासून आरंभ; शेवटीं आ. ५ सा. १ उ.

पांचवा फेरा—१ उ. १ सा; * आ १ नु. १ सा; नुस्ता पुढल्या टांक्यावरून उलटून घ्या. ४ सा; * पासून आरंभ; शेवटीं १ उ.

सहावा फेरा—१ उ. १ सा; * आ. १ नु. १ सा; नुस्ता पुढल्या टांक्यावरून उलटून घ्या. ४ सा; * पासून आरंभ. शेवटीं आ. १ नु. १ सा; नुस्ता उलटून घ्या. ३ सा. १ उ.

सातवा फेरा--१ उ. ३ सा. * आ. १ नु. १ सा. नुस्ता उलटून घ्या. ४ सा. * पासून आरंभ. शेवटीं आ. १ नु. १ सा; नुस्ता. उलटून द्या; २ सा. १ उ,

आठवा फेरा--१ उ. ४ सा; * आ. १ नु. १ सा; नु. उ; ४ सा. शेवटीं आ. १ नु. १ सा; नु. उ; १ सा. १ उ.

या ८ ओळींचा १ नमुना झाला. असे आणखी ५ नमुने विणा. शेवटीं न.प्र सुई झाल्यावर पुढली तिसरी सुई साधी विणून शेवटले २ टां.२ ए. विणा. १ ल्या सुईच्या आरंभीं १ सा. १ नु, १ सा; नु. उलटून द्या. २ री सुई न. प्र;याप्रमाणें प्रत्येक ५ व्या ओळीला टांके कमी करा. असें आणखी ४ वेळां विणा. पुढले २० फेरे टांके कमी न करतां आरंभींच्या न. प्र. विणा.

खोंट—नमुन्याची विण असलेल्या सुईवरले टांके तसेच ठेवून, १ल्या व ३ ऱ्या सुईवरले टांके एका सुईवर घेऊन दोन सुयांनीं विणावयास घ्या. प्रत्येक ओळीच्या आरंभीं १ टां. न विणतां ठेवून १ साधी ओळ. १ उ, ओळ. अशा २२ ओळी विणा. न विणतां ठेवलेले ११ टां. रहातात.

तेवीसावी ओळ--१ नु. १४ उ, २ ए उलट बाजूनें; १उ.फिरवा.

चोवीसावी ओळ—१ नु, ६ सा, १नु.१सा. नु. उ. १ सा; फिरवा.

पंचवीसावी ओळ—१ नु. ७ उ, उलट बाजूनें २ ए. १ उ फिरवा.

सव्वीसावी ओळ—१ नु, ८ सा, १ नु. १ सा. नु. उ. १ सा; फिरवा.

सत्तावीसावी ओळ—१ नु. ९ उ. २ उ. ए; १ उ. फिरवा. या प्रमाणें प्रत्येक ओळीला दोहोंतून एकदम घेण्याच्या आधीं १ टां जास्त विणत जा. सुईवरले सर्व टांके संपेपर्यंत असें विणा. शेवटीं १६ टांके बाकी रहातात.

दुसऱ्या सुईनें खोंटेच्या डाव्या बाजूचे ११ टांके उचलून घ्या व साधे विणा. उजव्याबाजूचे ११ टां. उचलून तेहि साधे विणा. चार सुयांनीं पुनः विणावयास घ्या. सुईवर ठेवलेले टांके आतां न. प्र. विणा.

पहिला फेरा—टांके कमी न करतां विणा.

दुसरा फेरा—१ पहिल्या सूईवरले सर्व टांके सा. विणून शेवटीं २ए १ सा. २ री सुई न. प्र; ३ री सुई आरंभीं १ नु.१ सा नु. १ उ.

पुढले सर्व टांके साधे या २ फेऱ्याप्रमाणें आणखी ५ वेळां विणा. शेवटल्या ओळीला १४, २७, १३ या क्रमानें टांके रहातात. पुढले ४० फेरे २ साध्या सुया व १ सुई न. प्र. असें टांके कमी न करतां विणा.

आंगठ्याचा निमुळता भाग—पहिल्या सुईवरले टांके साधे विणून शेवटीं २ ए. १ सा; दुसऱ्या सुईवर आरंभीं १ सा. १ नु. १ सा. नु. उ, पुढले टां. सा. शेवटीं २ ए. १ सा; तिसऱ्या सुईवर १ सा, १ नु. १ सा; नु. उ. सर्व सा. याप्रमाणें प्रत्येक तिसऱ्या फेऱ्याला टांके कमी करा. असें आणखी चारदां विणून पुढें प्रत्येक फेऱ्याला याचप्रमाणें कमी करा. शेवटीं १४ टांके रहातात. त्यांचे २ भाग करून प्रत्येक सुईवर ७ टांके घ्या. नंतर तिसऱ्या सुईनें पहिल्या सुईवरला १ टांका, त्याच्यापुढें दुसऱ्या सुईवरला १. पुनः पहिल्या सुईवरला, याप्रमाणें ते सर्व टांके एका पुढें एक घ्या. असे सर्व टांके एका सुईवर घेऊन दुसऱ्या सुईनें बुजविण्यास आरंभ करा. २ ए, २ए, विणून पहिला टांका पुढल्यावरून उलटून घ्या. पुनः २ ए, असे सर्व टां बुजवा.

बुटासारखा पायमोजा नं. ४०

१ औंस लोंकर. हस्तीदंती आंकड्याची सुई. १

९ सांखळ्या घ्या. प्रत्येक सांखळींत १ अ. टां. मधल्या १ सांखळींत २ अ. टां, शेवटीं १ सां, विणून फिरवा. मागल्या ओळात जेथें २ अ, टां, विणलेले आहेत. त्यांवर एका टांक्यांत २ अ. टां. विणून बाकी सर्व प्रत्येक टांक्यांत १ अ. टां विणा. अशा १२ ओळी विणा. पाऊल मोठें हवें असल्यास जास्त ओळी घ्या. नंतर ८ अ. टां. विणून फिरवा, १ सां, ८ अ. टां. फिरवा. याप्रमाणें ६ इंच लांब विणून पावलाच्या दुसऱ्या बाजूच्या ८ टांक्यांना पा. टां. विणून जुळवा. हा खोंटे भोंवतालचा घेर झाला. आतां पावलाच्या दोन्हीबाजूला ४ टांके ठेवलेले असतात त्या प्रत्येक टांक्यावर १ अ. टां. विणून, विणलेल्या पट्टीवर प्रत्येक टांक्यांत १ अ. टां. विणा. नंतर प्रत्येक टांक्यांत १ अ. टां. असे १५ फेरे विणा. लांब हवें असल्यास जास्त फेरे घ्या. टांके बुजवा.

पावलाची खालची बाजू—दुसरा धागा घेऊन पावलाच्या पुढला ४ टांक्यांचा भाग जुळवून घ्या व अ. टां नें आडव्या ओळी विणा. लोंकरीचा तळवा न विणतां कापडाचा लावणें जास्त चांगलें. पावलाच्या आका-

राचा कार्डबोर्ड कापून दोन्ही बाजूनें जाड कापडानें शिवावा. त्याच्या कडेनें लोंकरीचा विणलेला भाग जोडला असतां चांगला बूट होतो.

टोप्या.

गंधर्व टोपी नं. ४१

तीन पेडी आभाळी रंगाची स्याक्सनी लोंकर २ औंस. सुया १ जोड नंबर ११.

१०८ टांके घाला. सर्व ओळी साध्या. १६ इंच लांब विणून टांके बुजवा. पिशवी प्रमाणें शिवून, खालच्या कडेचा २ इंचाचा पट्टा दुमडून घ्या. वरच्या टोंकापासून २ इंचावर फितीनें गांठ देऊन २ गोंडे बांधा. (आकृति नं. ४१ पहा.)

साधी टोपी नं. ४२.

पांढरी शेटलंड लोंकर २ औंस. पोलादी सुयांचा १ जोड. गुलाबी रंगाची १ वार अरुंद ' बेबी ' फित. अडीच इंच रुंदीची फित दीड वार. ३६ टांके घाला.

पहिली ओळ—सर्व साधी.

दुसरी ओळ—१ सा. १ उ.

या २ ओळींचा १ नमुना झाला. या न. प्र. ४ इंच लांब विणा. ९, १७, २५, ३३, ४१, ४९, ५७, ६५ या ओळींच्या आरंभीं व शेवटीं १ टांका वाढवा. याप्रमाणें प्रत्येक आठव्या ओळीला २ टांके वाढतील. सुईवर ५२ टांके झाले म्हणजे प्रत्येक ओळीच्या आरंभीं २ टांके बुजवा. याप्रमाणें १६ टांके राहीपर्यंत विणून सर्व टांके बुजवा.

३७ टांके नवीन घाला. प्रत्येक ओळीच्या आरंभींचा १ टांका नुस्ता काढून घ्या.

पहिली ओळ—२५ सा, आ २ ए, २ सा; * आ २ ए; * पासून ३ वेळां, आ, २ सा.

दुसरी ओळ—आ २ ए, ७ सा, १ उ. २ सा; पुढले सर्व टांके १ उ, १ सा, याप्रमाणें.

तिसरी ओळ—२५ सा, आ. २ ए, २ सा; * आ २ ए;*पासून तीन वेळां विणा. शेवटीं आ. २ सा.

चवथी ओळ—आ २ ए, ७ सा. फिरवा.

पांचवी ओळ—१ नु; * आ २ ए; * पासून तीन वेळां; शेवटीं आ २ सा.

सहावी ओळ--आ २ ए, ७ सा, ३ उ, २ सा; * १ उ, १ सा; * पासून आरंभ.

सातवी ओळ—२५ सा; आ २ ए; ४ सा; * आ २ ए; * पासून ३ वेळां; शेवटीं आ २ सा;

आठवी ओळ—आ २ ए; ७ सा; फिरवा.

नववी ओळ—१ नु; * आ २ ए; * पासून ३ वेळां; शेवटीं आ २ सा.

दहावी ओळ—आ २ ए; ७ सा; ५ उ; २ सा; * १ उ. १ सा; * पासून आरंभ.

अकरावी ओळ—२५ सा; आ २ ए; ३ सा, १ नु, १ सा; नुस्ता काढलेला टांका पुढल्या टांक्यावरून उलटावा. * आ. २ ए; * पासून ४ वेळां; शेवटीं १ सा.

बारावी ओळ—आ २ ए; ७ सा; उलट बाजूनें २ ए; फिरवा.

तेरावी ओळ—१ नु; * आ २ ए; * पासून ४ वेळां; शेवटीं १ सा.

चवदावी ओळ—आ. २ ए; ७ सा; ३ उ. २ सा; * १ उ, १ सा. * पासून आरंभ.

पंधरावी ओळ— २५ सा. आ २ ए, १ सा, १ नु, १ सा, नुस्ता काढलेला टांका पुढल्या टाक्यांवरून उलटावा.* आ. २ ए; * पासून ४ वेळां; शेवटीं १ सा.

सोळावी ओळ—आ २ ए, ७ सा, २ उ; फिरवा.

सतरावी ओळ—१ नु, * आ २ ए;* पासून ४ वेळां; १ साधा,

अठरावी ओळ—आ २ ए, ७ सा, १ उ, २ सा;* १ उ, १ सा. * पासून आरंभ.

एकोणीसावी ओळ--२५ सा, आ २ ए, १ सा; * आ २ ए;* पासून ४ वेळां; शेवटीं १ सा.

वीसावी ओळ–आ २ ए, ७ सा, १ उ, २ सा; * १ उ, १ सा; * पासून आरंभ. हा २० ओळींचा १ नमुना झाला. याप्रमाणें १० इंच लांब विणून टांके बुजवा.

माने भोंवतालची झालर अशीच विणावयाची.

१७ टांके घाला. व जेथें पूर्वी २५ टांके सांगितले आहेत, तेथें फक्त ५ टांके विणा. ही झालर टोपीच्या माने भोंवतालच्या भागाला लावून त्या मोजानें लांब विणा. पूर्वीचा विणलेला भाग मधोमध धरून त्याच्या भोंवतीं १० इंच विणलेला पट्टा धरा. कपाळा भोंवतीं चुण्या धरून दोन्ही बाजूला साधा पट्टा शिवून टाका. नंतर माने भोंवतीं झालर शिवा. जाळींतून अरूंद फित घाला. रूंद फितीचा बो मधोमध बांधा. (आकृति नं. ४२ पहा.)

गलोतें नं. ४३

(२ वर्षांच्या मुलांकरितां)

अडीच औंस गुलाबी रंगाची 'फ्लीसी वुल' सुयांचा १ जोड. नं. ८. १ आंकड्याची सुई; पेरीलस्टा रेशमाचें १ बंडल. शींपीची एक गुंडी.

८८ टांके घाला. २ सा, टां. २ उ, टां अशा ८ ओळी. पुढल्या ४० ओळी सर्व साध्या.

पहिली ओळ---साधी. आरंभीं, मध्यें व शेवटीं २ ए. विणा. (म्ह० ३ टांके कमी होतात.) दोन ओळी सर्व साध्या.

चवथी ओळ—२ए, १० सा; शेवटीं ११ टांके सा; पुढल्या २ ओळी सर्व साध्या.

सातवी ओळ—२ए, ९ सा; याप्रमाणें सर्व टांके. शेवटीं १० टां.सा. २ ओळी सर्व साध्या.

दहावी ओळ--२ ए, ८ सा; याप्रमाणें सर्व टांके शेवटीं ९ टां. सा. २ ओळी सर्व सा. याप्रमाणें प्रत्येक चवथ्या ओळीला टांके कमी करा. असे १५ टांके राहीपर्यंत विणा.

सुईवर राहिलेल्या १५ टांक्यांतून लोंकर ओंवून घट्ट ओढून मजबूत गांठ द्या. दोन बाजू बुजवून घ्या. टोपीच्या मानें भोंवतालचे ५४ टांके उचलून घ्या.

पडदा—२ सा, २ उ. अशा ८ ओळी विणा. ८ व्या ओळीच्या शेवटीं १० टांके नवीन घाला,

नववी ओळ—सर्व ओळ साधी विणून शेवटीं १० टांके नवीन घाला.

दहावी ओळ—१ जा. १७ सा, १ जा, १७ सा, २ जा, १७सा, १ जा, १७ सा; १ जा.

पुढल्या दोन ओळींत आरंभीं व शेवटीं १ टांका वाढवून सर्व साधे विणा. १३ वी ओळ १० व्या ओळी प्रमाणेंच विणा. पुढल्या २ ओळी ११ व १२ व्या ओळींप्रमाणें विणा.

सोळावी ओळ—सर्व साधी.

सतरावी ओळ—५ सा; ३ टांके बुजवा. पुढले सर्व साधे.

अठरावी ओळ—सर्व सा.सतराव्या ओळींत जेथें टांके बुजविले होते तेथें ३ टांके नवीन घाला. शेवटले २ सा.

एकोणिसावी ओळ—१० व्या ओळी प्रमाणें. शेवटले टांके सा. पुढल्या २ ओळी सर्व साध्या. पुढल्या २ ओळी १९ व्या ओ. प्र. त्याच्या पुढल्या दोन ओळी साध्या. याप्रमाणें आणखी ३ वेळां विणून सर्व टांके बुजवा. गुंडी लावा. आकृति नं. ४३ पहा.)

मुलाची रूमी टोपी. नं. ४४

तीन औंस दगडी रंगाची लोंकर (स्लेट कलर) सुयांचा १ जोड नं. ९, अस्तरासाठीं दीडवार कापड, १ वार रेशमी कॉर्ड. ७० टांके घाला.

पहिली ओळ-सर्व साधी,

दुसरी ओळ—५४ सा, फिरवा,

तिसरी ओळ—सर्व साधी.

चवथी ओळ—५६ सा, फिरवा,

पांचवी ओळ—सर्व साधी,

सहावी ओळ—५८ सा फिरवा. याप्रमाणें प्रत्येक सम ओळीला २ टांके जास्त विणून फिरवा व विषम ओळ साधी विणा. या क्रमानें १८ व्या ओळीला ७० टांके विणा. हा १ नमुना झाला. असे १२ नमुने विणा. (आकार जसा लहान मोठा हवा असेल त्या मानानें नमुने कमी जास्त घ्या.) सर्व टांके बुजवा, दोन्ही बाजू लोंकरीनें शिवा. वरच्या बाजूच्या टांक्यां-

तून लोंकर घालून ती ओढून गांठ द्या. ह्मणजे निमुळता आकार येईल. खालच्या बाजूला कडेनें ३ इंचाची पट्टी वरल्या बाजूला दुमडून ध्या व त्यावरून रेशमी कॉर्ड म्ह० आकृतींत दाखविल्याप्रमाणें बांधा. कापडाची याच आकाराची टोपी शिवून ती आंतून अस्तराप्रमाणें जोडा. मोठा गोंडा करून वर लावा. (आकृति नं. ४४ पहा.)

मुलांची गांधी टोपी नं. ४५

'लेडीशिप फिंगरिंग वुल'म्ह० पांढरी लोंकर २औंस.सुयांचा १जोड नं.११

[साधारण १ वर्षाच्या मुलाचें हें माप आहे. परंतु मोठा आकार हवा असल्यास मुलाच्या डोक्याचा सभोंवार मोज ध्या. जेवढे इंच भरतील त्याच्या निम्या लांबीचे टांके घाला. ही टोपी दोन भागांत विणावयाची आहे.]

४२ टांके घाला. ८ ओळी सर्व साध्या.

नववी ओळ—३ सा, ३ उ.

दहावी ओळ—३ उ, ३ सा,

अकरावी व बारावी ओळ—३ सा, ३उ. या ४ ओळी आणखी ३ वेळां विणा. नंतर १६ ओळी साध्या. पुढें प्रत्येक ओळीच्या दुसऱ्या टांक्यांत १ टांका वाढवा. अशा ८ ओळी. दोन्ही बाजूला निमुळतीं टोकें येतील.टां.बु. असाच दुसरा भाग विणा. दोन्ही भाग आंतल्या बाजूनें शिवा. किनारीसारखा विणलेला पट्टा वर दुमडून ध्या. वरच्या दोन्ही बाजूच्या निमूळत्या टोंकांना दोन मोठे गोंडे करून बांधा. टोपी मोठ्या मुलासाठीं असल्यास गोंड्या ऐवजीं पावली एवढाल्या ४ गुंड्या घेऊन त्यांवर आंकड्याच्या सुईनें लोंकरीनें विणून लावल्यास, त्या जास्त शोभिवंत दिसतात. (आकृति नं. ४५ पहा.)

दोन वर्षाच्या मुलाची साहेबी टोपी. नं.४६.

' लेडी बिटी फ्लीसी ' नांवांची करड्या, खाकी, किंवा चटणी रंगाची लोंकर तीन औंस. सुयांचे २ जोड नं. ११. प्रथम ५ पाकळ्या वेगळ्या विणून मग भोंवतालचा पट्टा विणावा.

पाकळी—२४ टांके घाला. एक ओळ साधी, एक ओळ उलटी अशा ६ ओळी.

सातवी ओळ–१ नु, २ सा, ३ उ, ३ सा, ३ उ, ३ सा, ३ उ, ६ सा.
आठवी ओळ–१ नु, ४ उ, ३ सा, ३ उ, ३ सा, ३ उ, ३ सा, ४उ.
नववी ओळ–१ नु, ४ सा, ३ उ, ३ सा, ३ उ, ३ सा, ३ उ. ४ सा.
दहावी ओळ–१ नु, २ उ, ३ सा, ३ उ, ३ सा, ३ उ, ३ सा६ उ.
अकरावी ओळ–साधी.

बारावी ओळ–उलटी, हा १ नमुना झाला. सातव्या ओळीपासून आरंभ करून आणखी ३ नमुने विणा. (म्ह० एकंदर ४ नमुने झाले.) पुढें एक ओळ साधी व एक ओळ उलटी अशा सर्व ओळी विणून प्रत्येक ओळीच्या शेवटीं १टांका कमी करा. याप्रमाणें २ टांके राहीपर्यंत विणून टांके बुजवा.

अशाच आणखी ४ पाकळ्या विणा. या ५ पाकळ्या कमळासारख्या जोडून टोपी तयार करा.

आतां टोपीच्या घेराचे टांके उचलून घेऊन ते तीन सुयांवर विभागून सर्व ओळ साधी विणा.

दुसरी ओळ–६ सा, १ जा, ६ सा, १ जा. याप्रमाणें सर्व ओळ.
पुढल्या ६ ओळी साध्या.

नववी ओळ—दुसऱ्या ओळीप्रमाणें पुढल्या ५ ओळी साध्या. याच्या पुढें १ साधी ओळ, १उलटी ओळ, अशा २१ ओळी. आठव्या व सोळाव्या ओळींत प्रत्येक ६ टांकांच्या अंतरानें १ टांका कमी करा.(म्ह० २ ए. विणा.)सर्व टांके बुजवा. पट्टी आंत दुमडून घ्या. वरून रुंद रेशमी कॉर्ड किंवा फित बांधा. (आकृति नं. ४६ पहा.)

तान्हया मुलाची कमळाची टोपी. नं ४७

गुलाबी लोंकर, १ औंस. हस्तिदंती सुया १ जोड. नं. २

पहिली ओळ—५ टांके घाला. १ सा, १ वा, १ सा, १ वा, याप्रमाणें सर्व ओळ.

दुसरी ओळ–१ सा, *आ २ सा; *पासून आरंभ. शेवटीं आ, १सा.
तिसरी ओळ—२ उ, *आ ३ उ; *पासून आरंभ. शेवटीं आ, १ उ.

चवथी ओळ–१ सा. *आ ४ सा; *पासून आरंभ. शेवटीं आ३सा.

पांचवी ओळ–४ उ, * आ ५ उ; * पासून आरंभ शेवटीं आ १ उ.

सहावी ओळ—१ सा, *आ ६ सा; *पासून आरंभ, शेवटीं राहीलेले टांके आ सा.

सातवी ओळ–५उ. *आ ७ उ; * पासून आरंभ. शेवटीं राहीलेला टांका आ १ उ.

आठवी ओळ––१ सा. *आ८सा; *पासून आरंभ. शेवटीं आ १ सा.

नववी ओळ--१उ, *आ९उ; *पासून आरंभ. शेंवटीं आ १ उ. एकंदर ५० टांके होतात.

दहावी ओळ—१ सा; *आ १ सा, आ १ नु. १ सा, नुस्ता काढलेला साध्या टांक्यावरून उलटून टाकावा. ७ सा; *पासून आरंभ. शेवटीं ६ साधे.

अकरावी ओळ–५ उ; * न विणलेल्या टांक्यातून मागला टांका पुढल्या टांक्यावरून उलटावा. १ उ, आ. ३ उ, आ ८ उ; *पासून आरंभ. शेवटीं आ १ उ.

बारावी ओळ----१ सा, *आ. ५ सा १ नु, १ सा, नुस्ता टांका पुढल्या टांक्यावरून उलटावा. ५ सा. *पासून आरंभ. शेवटीं ४ सा.

तेरावी ओळ----३ उ,*न विणलेल्या टांक्यातून मागला टांका पुढल्या टांक्यावरून उलटावा. १ उ, आ. ७ उ. आ ४ उ, *पासून आरंभ. शेवटीं आ. १ उ.

याचप्रमाणें कमळ पुरें होईपर्यंत विणा. शेवटीं प्रत्येक पाकळीचा १ टांका कमी करा. ओळींत एकंदर९१ टांके रहातात. पुढें५ओळी सर्व साध्या. नंतर ५ सा; * १ वा.९ सा. * पासून आरंभ. शेवटीं ५ सा. यापुढें १ ओळ साधी व १ ओळ उलट अशा २ ओळी. येथें १०० टांके होतात.

पहिली ओळ—१ सा; * १नु. १ सा, नुस्ता काढलेला टांका पुढल्या टांक्यावरून उलटावा. १ सा, आ. १ सा, आ १ सा. आ १ सा आ १ सा, आ १ सा. २ए* पासून आरंभ.

दुसरी ओळ––सर्व साधी.

तिसरी ओळ—१सा, * १ नु, १ सा. नुस्ता टांका पुढल्या टांक्यावरून उलटावा. ११ सा. २ ए,*पासून आरंभ.

चवथी ओळ––सर्व उलट.

पांचवी ओळ---१ सा,* नु. १ सा. नुस्ता टांका पुढल्या टांक्यावरून उलटावा. ९ सा. २ ए.*पासून आरंभ.

सहावी ओळ—उलट. या ६ ओळींचा १ नमूना झाला. आरंभींच्या ४ ओळी आणखी एकदां विणा. ५ व्या ओळीला १३ टांके बुजवा. पुढले टांके न. प्र. विणा. शेवटीं ११ टां. बुजवा. राहिलेल्या टांक्यांवर आणखी ४ नमुने विणा. नंतर आरंभींच्या ४ ओळी विणा. ५ व्या ओळीला ९ सा.* २ ए. ४ सा, * पासून आरंभ. शेवटीं२ ए. ९ सा. पुढल्या३ ओळी सर्व साध्या.(एकंदर ७९ टांके रहातात.)

फितीची जाळी—पाहिली ओळ—१सा,*आ २ ए*पासून आरंभ. २ ते ८ ओळी सर्व साध्या. टोपीच्या बाजूचे १९ टांके उचलून घ्या. कोंपऱ्यावर १ टां. जास्त उचला. याप्रमाणें दोन्ही बाजूचे मानेच्या भोंवतालचें टांके उचला. ३ ओळी सर्व साध्या. दोन्हीं कोंपऱ्यावर १ टांका वाढवा.

चवथी ओळ—आ २ ए. पुढल्या ३ ओळी सर्व साध्या; टांके बुजवा. जाळीच्या दोन ओळींतून फित घाला व अर्धा वार फितीचे दोन तुकडे दोन्ही टोंकांना बांधा.

प्रवासी टोपी (दोन सुयांची) नं. ४८

तपकिरी रंगाची बर्लिन वुल दीड औंस. फिक्की अस्मानी अर्धा औंस. हस्तिदंती सुया १ जोड. नं. १०

नमुन्याची विण—३ सा. ३ उ. तपकिरी रंगानें ९० टां. घाला ३ सा, ३ उ. अशा १२ ओळी विणा. नंतर याच न. प्र. अस्मानी रंगानें २ ओळी; तपकिरी २ ओळी; अस्मानी ६ ओळी; तपकिरी २ ओळी; अस्मानी २ ओळी; तपकिरी २४ ओळी विणा.

एकावन्नावी ओळ—३ सा, ३ उ असे ७२ टां. विणून फिरवा.

बावन्नावी ओळ—न. प्र. विणून शेवटीं १८ टांके न विणतां फिरवा दोन्ही बाजूचे १८ टां. निराळ्या सुईवर ठेवून मधले ५४ टांके विणा|वयास घ्या. ३६ ओळी न. प्र. विणा.

डोक्याचा भाग—पहिली ओळ—३ सा, ३ उ, असे ५१ टांके विणून फिरवा.

दुसरी ओळ—३ सा, ३ उ. असे ४८ टांके विणून फिरवा.

तिसरी ओळ—नमुन्यांप्रमाणें ४५ टांके विणून फिरवा.

चवथी ओळ—नमुन्यांप्रमाणें ४२ टांके विणून फिरवा.

पांचवी ओळ—नमुन्याप्रमाणें ३९ टांके विणून फिरवा.

सहावी ओळ—नमुन्याप्रमाणें ३६ टांके विणून फिरवा.

या क्रमानें प्रत्येक ओळीच्या शेवटीं ३ टांके न विणतां ठेवून शेवटल्या ओळीला फक्त १८ टांके विणा.

नंतर फिरवून सुईवरले सर्व टांके न. प्र. विणां. विणलेल्या भागाचे १८ टांके उचलून घ्या. असेच दुसऱ्या बाजूचे उचला, ह्मणजे सुईवर एकंदर ९० टांके होतात. या सर्व टांक्यांची १ ओळ न. प्र. विणा. पुनः पूर्वीप्रमाणें प्रत्येक ओळीच्या शेवटीं ३ टां. न विणतां ठेवा; असे ५४ टांके राहीपर्यंत विणून निराळ्या सुईवर जे दोन्ही बाजूचे १८ टांके ठेवलेले असतात ते सर्व विणावयास घ्या, सुईवर एकंदर १२६ टांके होतात. त्याच्या ७ओळी नमुन्या प्रमाणें विणा. नंतर २ ओळी अस्मानी, २ओळी तपकिरी; ६ ओळी अस्मानी; २ ओळी तपकिरी; २ ओळी अस्मानी; ७ ओळीं तपकिरी; न. प्र. विणून टांके बुजवा. हनुवटी खालचा भाग शिवून घ्या.

बॉनेट अथवा मुलांची कान टोपी. नं. ४९

राखाडी किंवा गवती रंगाची लोंकर १ औंस. हास्तिदंती सुयांचा १ जोड.

६० टांके घाला. साध्या १०० ओळी विणून टांके बुजवा. नंतर विणलेला पट्टा दुहेरी धरून कुंचड्यासारखी एक बाजु शिवून घ्या. खालीं २ इंचावर रिबन ओंवून हनुवटीखालीं बांधतां येईल अशी हातभर रिबन दोन्ही बाजूला मोकळी ठेवा. वरच्या बाजूला रुंद फितीचा बो बांधा.


(आकृती नं. ४९ पहा.)

थंडीची प्रवासी टोपी. नं. ५०.

'किंगफिशर्स लस्टरवुल' अस्मानी लोंकर एक औंस, सुयाचा १ जोड नं. ४ चा १ जोड. ३ नं.




નં. ૪૪



નં. ૪૫



નં. ૪૬




નં. ૪૭



नं. ४८



नं. ४९



नं. ५०



नं. ५१

नं. ४ च्या सुयांवर ३० टांके घाला.

३ इंच लांब होईपर्यंत साध्या ओळी विणा. नंतर आरंभीं व शेवटीं १७ टांके नवीन घाला. (पूर्वींचे ३ इंच सोडून) ४इंच होईपर्यंत साध्या ओळी. आरंभीं व शेवटीं ८ टांके नवीन घाला. (एकंदर ८० टांके होतात.) नं. ३ च्या सुयांनीं २ सा. टां, २ उ; अशा सर्व ओळी १ इंच लांब विणा. (ही गळ्याची पट्टी झाली.) नं. ४ च्या सुयांनीं अडीच इंच लांब होई-पर्यंत साध्या ओळी विणून टांके बुजवा. आरंभीं विणलेल्या तीन इंच भागाच्या कडा शिवून घ्या. गळपट्टीच्या वरच्या बाजूच्या कडेनें म्हणजे तोंडाच्या भोंवतालचे टांके उचलून घ्या. २ सा, टां, २ उ टां; अशा ओळी दीड इंच लांब विणून सर्व टांके बुजवा. हनुवटी खालची शिवण शिवून घ्या.

चार सुयांवरची प्रवासी टोपी. नं. ५१

या टोपीनें मानेपर्यंत डोकें झांकलें जाऊन एक पडदा पाठीवर व एक पडदा पुढें छातीवर येतो.

अस्मानी लोंकर ३ औंस, पोलादी सुया २ जोड. जाड सुया १ जोड. नं. ३.

नं. ३ च्या सुयांवर ५४ टांके घाला. १० इंच लांब साध्या ओळी विणून दुसऱ्या सुईवर ते सर्व टांके तसेच ठेवा. असाच ५४ टांक्यांचा दुसरा एक तुकडा ५ इंच लांब विणा. हे दोन सुयांवरले टांके ३ सुयांवर विभागून चवथ्या सुईनें विणावयास घ्या. प्रत्येक सुईवर ३६ टांके येतील.

२ सा. २ उ, असे पांच इंच लांब विणा ३० टांके बुजवा. (तोंडाचा उघडा भाग.) राहिलेले टांके २ सा, २ उ, असें १३ ओळींपर्यंत २ सुयांनीं विणा. जेथें ३० टांके बुजविले होते, तेथें नवीन ३० टांके घाला. पुनः तीन सुयांवर टांके घेऊन चौथ्या सुईनें २ सा. २ उ. असे अडीच इंच लांब विणा. एक ओळ सर्व साधी. नंतर प्रत्येक सुईच्या शेवटीं २ ए. विणा. शेवटीं प्रत्येक सुईवर ४ टांके राहीपर्यंत सर्व टांके २ ए विणा. राहिलेल्या १२ टांक्यांतून लोंकर ओंवून ती ओढून घट्ट गांठ द्या. (आकृति नं. ५१ पहा.)

झबलीं व गंजिफ्रॉक.

एक संधि झबलें. नं. ५२

(साधारण ३-४ वर्षांच्या मुलांकरितां.)

अस्मानी रंगाची 'शेटलंड फ्लॉस' लोंकर ३ औंस, पांढरी 'ऑंगोरा' लोंकर १ औंस. सुया १ जोड. नं, ४

पाठ—५० टांके घाला, १०४ ओळी सर्व साध्या विणा. नंतर आरंभीं व शेवटीं बाह्यां करितां ३५ टांके घाला. चौतीस ओळी सर्व साध्या विणा.

पसतीसावी ओळ—५२ साधे टांके विणून दुसऱ्या सुईवर ठेवा. १६टांके बुजवा. पुढले ५२ टांके विणावयास घ्या. एक ओळ सर्व साधी. मानेच्या बाजूला १७ टांके नवीन घाला. (एकंदर ६९ टांके होतात.)३४ओळी साध्या विणा. बाहीचे ३५ टांके बुजवा. राहिलेले ३४ टांके १० ओळी पर्यंत साधे विणून दुसऱ्या सुईवर ते टांके तसेच ठेवून द्या. पूर्वीचे ५२ टांके घेऊन ते या भागासारखेच विणा. दोन्ही भाग सारखे लांब विणून दोन्ही सुयांवरील ६८ टांके एकत्र विणावयास घ्या.

पुढला भाग—पाठी सारखाच व तितकाच लांब विणून टांके बुजवा.

कॉलर—पांढऱ्या लोंकरीनें गळ्या भोंवतालचे टांके उचलून घ्या. १८ ओळी साध्या विणा. सर्व टांके बुजवा.

कफ—(म्ह० बाहीच्या पुढली पट्टी.) बाहीच्या कडेचे ३४ टांके उचलून घ्या. पांढऱ्या लोंकरीनें १२ ओळी साध्या विणून टांके बुजवा. पुढें फित बांधा. (आकृति ५२ पहा.)

बिन बाह्यांचा गंजिफ्रॉक. नं. ५३

गवती रंगाची लोंकर ५ औंस. सुया १ जोड नं. ५; ८० टांके घाला.

पहिली ओळ—२ सा. २ उ, अशी सर्व ओळ. असें ४ इंच लांब विणा. पुढें सर्व ओळी साध्या. असें २३ इंच लांब होईपर्यंत विणा. नंतर २८ टांके विणून दुसऱ्या सुईवर ठेवा. पुढले २४ टांके बुजवा. (हा गळा झाला) त्या पुढले २८ टांके विणावयास घ्या. १० ओळी

सर्व साध्या. दुसऱ्या बाजूचे २८ टांकेहि याचप्रमाणें विणा. या २८ टांक्यांच्या पुढें मानें करितां २४ टांके नवीन घाला. त्या टांक्याच्या पुढें दुसऱ्या सुईवर २८ टांके विणावयास घ्या. १९ इंच लांब होईपर्यंत सर्व ओळी साध्या विणा. नंतर २ सा, २ उ, असें ४ इंच लांब विणून सर्व टांके बुजवा. बाहीची बाजू ९ इंच उघडी ठेवून दोन्ही कुशी शिवून घ्या. दोन्ही खांद्यांवरून व गळ्या भोंवतीं आंकड्याच्या सुईनें साध्या शिंपीच्या टांक्यांची किनार विणा. (आकृति नं ५३)

लहान मुलांचा गंजिफ्रॉक नं. ५४

(४ वर्षांच्या मुलांकरितां.)

अस्मानी लोंकर ७ औंस. सुया २ जोड, नं. ५.

पुढला भाग—८४ टांके घाला. २ सा, २ उ. असें २ इंच लांब विणा. नंतर १ ओळ साधी, १ ओळ उलटी असें १२ इंच लांब विणा.

छातीचा भाग—पहिली ओळ—१ सा, १ उ, १ सा, असे २३ टांके; २ सा; २उ, २सा; असे ३८ टांके; १ सा, १ उ; असे २३ टांके.

दुसरी ओळ—१ उ, १ सा. असे २३ टांके; २ सा, २ उ. असे ३८ टांके; १ उ, १ सा; असे २३ टांके.

या दोन ओळींप्रमाणें ३ इंच लांब विणा. मधले ३८ टांके वेगळ्या सुईवर काढून ठेवा. बाजूचे २३ टांके ४० ओळी पर्यंत साधे विणा. अशीच दुसरी बाजू विणा. आतां दोन्ही बाजूंचे २३ टांके एका सुईवर घेऊन मधें ३८ टांके नवीन घालून सर्व टांके एकदम विणा. पुढल्या भागासारखाच पाठीचा भाग विणून शेवटीं २ सा टांके, २ उ टांके; असें दोन इंच विणून टांके बुजवा.

गळा—वेगळ्या सुईवर ठेवलेले ३८ टांके विणावयास घ्या. प्रत्येक खांद्याच्या बाजूचे २० टांके व पाठीच्या बाजूचे ३८ टांके उचलून घ्या.

हे सर्व टांके ३ सुयांवर विभागून चौथ्या सुईनें १ ओळ साधी १ उलटी अशा १० ओळी विणा. प्रत्येक ओळीला खांद्याच्या टांक्यापैकीं पाठीच्या बाजूला२ ए, विणा. याप्रमाणें त्यां २० टांक्यापैकीं ४ टांके राहीपर्यंत विणा. पुढली व पाठीची बाजू दुमडून राहिलेल्या सर्व टांक्यांचा सारखा

विभाग करा व प्रत्येक भाग वेगळा विणावयास घ्या. प्रत्येक ओळीला मध्यें १ टांका वाढवून २४ ओळीं साध्या विणा टांके बुजवा.

बाही—बाहीच्या भोंवतालचे ६० टांके उचलून घ्या. ते ३ सुयां-वर सारखे विभागून चौथ्या सुईनें विणा. १ ओळ सर्व साधी; १ ओळ सर्व उ; असें ९ इंच लांब विणा.

कफ—२ सा, टांके, २ उ, टांके असें २ इंच लांब विणून टांके बुजवा. गळ्याभोंवतीं रेशमी वळीव दोरी किंवा फित बांधा.(आकृति नं. ५४)

अर्ध्या बाह्यांचा एकसंधि गंजिफ्रॉक नं. ५५

पांढरी लोंकर ३ औंस. कोणत्याहि घेऱ्या रंगाची लोंकर २ औंस. जाड हस्तीदंती किंवा सेलुलॉइडच्या सुया नं. ४

(५ टांके=१ इंच रुंद; १० ओळी=१ इंच लांब; या हिशेबानें पुढील टांके दिले आहेत.) सर्व नमुना साध्या टांक्यांनीं विणा.

पाठ—५० टांके घाला. पहिल्या २ ओळी पांढऱ्या लोंकरीनें सर्व साध्या.

तिसरी व चवथी ओळ—घेऱ्या रंगानें सर्व सा.

पांचवी व सहावी ओळ—पांढऱ्या लोंकरीनें सर्व सा.

सातवी व आठवी ओळ—घेऱ्या रंगानें सर्व साध्या. पुढें ९ते१५८ ओळी पांढऱ्या लोंकरीनें विणा. (१५ इंच लांब विणा. सुया व लोंकर जाड किंवा बारीक असल्यास ४, ५ ओळी कमी जास्त होण्याचा संभव आहे. जेवढी लांबी हवी असेल तेवढ्या ओळी विणा.)


पुढल्या ओळीच्या आरंभीं व शेवटीं १ जादा टांका, याप्रमाणें प्रत्येक तिसऱ्या ओळीला २ टांके वाढवा. असें ३ वेळां विणा. एकंदर ६ टांके वाढतात.

बाह्या—पूर्वींचे सर्व टांके साधे विणून शेवटीं १६ टांके नवीन घाला.

पहिली ओळ—सर्व साधी विणून शेवटीं १६ टांके नवीन घाला. ५ इंच म्ह० ५० ओळी साध्या विणा.

एकावन्नावी ओळ---३१ टांके साधे; २० टांके बुजवा, (हा माने-चा भाग) पुढले ३१ टांके साधे.

पहिले ३१ टांके सुईवर तसेच ठेवून शेवटले ३१ टांके विणावयास घ्या. दोन ओळी साध्या.



नं. ५२



नं. ५३




नं. ५४



नं. ५५




नं. ५७



नं. ५८



नं. ६०



नं. ६१

तिसरी ओळ—(मानेच्या बाजूला) शेवटीं २ ए. विणून बाकी सर्व टांके साधे.

चवथी ओळ—सर्व साधी.

पांचवी ओळ–सर्व साधी. शेवटीं २ ए; पुढल्या चार ओळी सर्व साध्या.

दहावी ओळ—सर्व साधी. (मानेच्या बाजूला) शेवटीं १ टांका वाढवा. पुढल्या चार ओळी साध्या. याप्रमाणें प्रत्येक पांचव्या ओळीला १ असे एकंदर ८ टांके वाढवा. अशीच दुसरी बाजू विणा. मध्यें (गळ्या साठीं) ८ टांके नवीन घालून सर्व टांके एका सुईवर विणावयास घ्या. एक ओळ साधी विणून दोन्ही बाह्यांच्या प्रत्येक बाजूचे १६ टांके बुजवा. पुढल्या ओळीच्या आरंभीं व शेवटीं २ ए; दुसरी ओळ सर्व साधी. तिसऱ्या ओळीच्या आरंभीं व शेवटीं २ ए. विणा. पुढल्या सर्व ओळी पाठी-प्रमाणें सारख्या विणून टांके बुजवा. बाह्यांचे टांके उचलून रंगीत २ ओळी. व पांढऱ्या ३ ओळी विणून टांके बुजवा. माने भोंवतालचे टांके उचलून रंगीत २ ओळी व पांढऱ्या ३ ओळी विणून टांके बुजवा. असेंच गळ्या भोंवतीं विणून टांके बुजवा. बाजू शिवून घ्या. मानेची व गळ्याची पट्टी जुळवून घ्या. (आकृति ५५ पहा.)

लांब बाह्यांचा साधा गंजिफ्रॉक नं. ५६

(हें ६ वर्षांच्या मुलाचें माप आहे,याहून मोठा आकार हवा असल्यास प्रत्येक इंचाला ५ टांके जास्त घाला. नं. ५८ प्रमाणेंच आकार असल्या-मुळें याची आकृति दिली नाहीं.)

लोंकर ८ औंस. सुया १ जोड. नं. ३

पाठ—६० टांके घाला, अडीच इंच लांब होईपर्यंत साध्या ओळी. १ टांका साधा, १ टांका उ, अशा पुढल्या ओळी १७ इंच लांब होई-पर्यंत विणा. (पूर्वींचे अडीच इंच सोडून.) यापुढें दीड इंच सर्व साध्या ओळी विणा. नंतर आरंभींचे २० टांके वेगळ्या सुईवर ठेवा. २० टांके बुजवा व शेवटले २० टांके विणावयास घ्या.

पहिली ओळ—सर्व साधी.

दुसरी ओळ—मानेच्या बाजूला एक टांका वाढवून सर्व साधी.

तिसरी ओळ—सर्व साधी.

चवथी ओळ—दुसऱ्या ओळीप्रमाणें.

पांचवी ओळ—सर्व साधी, असें १० व्या ओळीपर्यंत विणा.

अकरावी ओळ—१ सा, टांका. १ उ, टांका. याप्रमाणें साडेपांच इंच लांब होईपर्यंत विणा; हे टांके तसेच ठेवून दुसऱ्या बाजूचें २० टांके असेच विणा. दोन्ही बाजू सारख्या लांबीच्या झाल्यावर सर्व टांके एका सुईवर घेऊन १ सा. टां. १ उ; टां. याप्रमाणें पूर्वीची लांबी सोडून साडेअकरा इंच लांब होईपर्यंत विणा. नंतर अडीच इंचपर्यंत साध्या ओळी विणा. सर्व टांके बुजवा.

खिसे—३० टांके घाला, १ सा, टां, असें १ उ टां; असें चार इंच लांब विणा. टांके बुजवा.

बाही—बारीक सुयांनीं विणा. ३०टांके घाला, १ सा, टां १ उ,टां, अशा सर्व ओळी ३ इंच लांब होईपर्यंत विणा, पुढें जाड सुयांनीं सर्व साध्या ओळी. असें १ इंच लांब. पुनः १ सा, टां. १ उ, टां. असें १० इंच लांब होईपर्यंत विणा, सर्व टांके बुजवा. (बाहीची एकंदर लांबी १४ इंच.) अशीच दुसरी बाही विणा.

गळपट्टी व गुंड्यांची पट्टी—गळ्याचे सर्व टांके उचलून घ्या. त्याच्या पुढें गुंड्यांच्या पट्टीसाठीं १० टांके नवीन घाला. सर्व साधे. शेवटीं १० टांके नवीन घाला; सर्व ओळ साधी. अशा दोन इंच लांब साध्या ओळी विणून टांके बुजवा. डाव्या बाजूचे नवीन घातलेले १० टांके उचलून घेऊन ३ इंच लांब विणा. सर्व टांके बुजवा.

असेच उजव्या बाजूचे १० टांके उचलून घेऊन पहिली ओळ साधी.

दुसरी ओळ--३ टांके साधे, ३ टांका बुजवा. ४ टांके साधे.

तिसरी ओळ--४ सा, ३ जा. टां. ३ सा.

चवथी ओळ—सर्व साधी.

याप्रमाणें गुंडीचीं ३ घरें करून पुढें५ओळी साध्या विणून सर्व टांके बुजवा.

बाह्या, खिसे व कॉलर क्यानव्हसच्या सुईनें शिवून घ्या. पृ. ११ पहा. बाह्या जोडते वेळीं नेहमीं कुशींतल्या शिवणीपासून १ इंच अलिकडे बाहिची शिवण धरावी.

लांब बाहीचा गंजिफ्रॉक नं. ५७.

'लेटी बेटीफ्लिसी वुल' पांढरी लोंकर १० औंस. आल्युमिनियमच्या सुया १ जोड. नं. १२.

पाठ—९६ टांके घाला.

पहिली ओळ–४ सा, * २ उ, २ सा; * पासून आरंभ.

दुसरी ओळ–१ नु, ४ सा; * २ उ, २ सा; * पासून आरंभ. अशा आणखी २० ओळी विणा.

बावीसावी ओळ–सर्व साधी.

तेवीसावी ओळ–२ सा, सर्व उ; शेवटले २ सा.

आरंभापासून ३० इंच लांब होईपर्यंत २२ व २३ व्या ओळीं-प्रमाणें विणा.

प्रत्येक बाजूचे २६ टांके बुजवा, व मधले ४४ टांके तसेच सुईवर ठेवा.

पुढला भाग–असाच निराळा विणावयास घ्या. २२ इंच लांब झाल्या-वर १ ओळ सर्व उलटी.

पुढली ओळ–४५ टांके साधे. राहिलेले टांके तसेच दुसऱ्या सुईवर राहूं द्या. हे ४५ टांके २२ व २३ व्या ओळीप्रमाणें विणा. प्रत्येक तिसऱ्या ओळीला गळ्याच्या बाजूला १ टांका २ ए. विणून कमी करा. याप्रमाणें २६ टांके बाकी राहिले म्हणजे टांके बुजवा. सुईवर ठेवलेल्या टांक्यांतून गळ्याच्या बाजूचे ६ टांके तसेच ठेवून ४५ टांके पूर्वीप्रमाणेंच विणा. दोन्ही बाजू सारख्या होतांच टांके बुजवा.

बाही—७६ टांके घाला.

पहिली ओळ—४ सा; *२ उ, २ सा; *पासून आरंभ. अशा ३१ ओळी.

बत्तीसावी ओळ—साधी.

तेहतीसावी ओळ—२ सा; सर्व उ; शेवटले २ टां. सा. (कफ सोडून) १८ इंच लांब होईपर्यंत ३२ व ३३ व्या ओळींप्रमाणें विणा. प्रत्यके ७ व्या ओळीच्या आरंभीं व शेवटीं १ टांका वाढवा. प्रत्येक बाजूला ७ टांके जास्त होईपर्यंत वाढवा व सर्व टांके बुजवा.

कॉलर—पाठीच्या भागाचे सुईवर ठेवलेले ४४ टांके विणावयास घ्या. गळ्याच्या भोंवतालचे २९ टांके उचलून घेऊन दुसऱ्या सुईवर ठेव-

लेले ६ टांके त्यांत घालून पुढले आगखी २९ उचलून ध्या. (म्ह० गळयाचा गोल आकार येईल.) २ टां, उ, २ टां. सा; अशा १६ ओळी. शेवटल्या ओळीला ४ टांके वाढवा व सर्व टांके बुजवा. (आकृति नं. ५७ पहा.)

बाजूच्या गुंड्यांचा गंजिफ्रॉक नं. ५८

राखाडी किंवा चाकोलेट रंगाची लोंकर ४ औंस. ॲल्युमिनियमच्या सुया १ जोड नं. ११. पावली एवढ्या शिंपीच्या गुंड्या ४.

हा गंजिफ्रॉक विणावयास वेताच्या परडीची, फुलांच्या परडीची पृ.१५ किंवा खांबाची विण पृ. १७चांगली दिसते. आकृतींत साधी विण घेतलेली आहे. ज्या विणीचा नमुना घ्यावयाचा असेल त्या विणीच्या हिशेबानें टांके घाला. येथें ७५ टांक्यांचे माप धरलेलें आहे. जशी तऱ्हा घ्यावयाची असेल त्याप्रमाणें दोन चार टांके कमी किंवा जास्त घालावे. घातलेल्या नमुन्याप्रमाणें बारा इंच लांब विणून पुढीलप्रमाणें खांदा विणावयास घ्या.

डावा खांदा—एकंदर टांक्यांचे ३ हिस्से करून १ हिस्सा विणावयास घ्या. (७५ टां. असल्यास २५ टांके याप्रमाणें.)

पहिली ओळ—२५ सा. २ ए. फिरवा.

दुसरी ओळ–सर्व उलट.

तिसरी ओळ—२३ साधे २ ए. फिरवा.

चवथी ओळ–सर्व उलट. तिसऱ्या व चवथ्या ओळींप्रमाणें आणखी दोन वेळां विणा.

नववी ओळ—६ सा; आ. २ ए. ५ सा, आ. २ ए, ६ सा.

दहावी ओळ—सर्व उलटी.

अकरावी ओळ—सर्व साधी.

बारावी ओळ—उलटी.

तेरावी ओळ—साधी, टांके बुजवा. गळ्यासाठीं मधले २५ टांके सुईवर ठेवून दुसऱ्या बाजूचे २५ विणावयास घ्या.

पहिली ओळ—२ ए; सर्व साधी.

दुसरी ओळ–सर्व उलटी. या दोन ओळींप्रमाणें आणखी तीन वेळां विणून सर्व टांके बुजवा.

पाठ---पुढल्या भागाप्रमाणेंच विणा. फक्त गुंड्यांचीं घरें न विणतां डाव्या खांद्याच्या आठ ओळी विणून टांके बुजवा. उजव्या खांद्याचा सांधा शिवून घ्या.

कॉलर---दोन्ही सुयांवरचे टांके एकदम विणावयास घ्या. गुंड्यांची पट्टी विणलेली आहे तेथून आरंभ करा. १ सा, टां १ उ. टां. अशा दोन ओळी.

तिसरी ओळ---शेवटीं ४ टांके राहीपर्यंत १ सा, १ उ; आ २ ए; १ सा; (गुंडीचें घर) १ सा, टां १ उ; टां, अशा ८ ओळी.

नववी ओळ---तिसऱ्या ओळीप्रमाणें. पुढच्या ३ ओळी १ सा, १ उ, विणून सर्व टांके बुजवा.

बाह्या---६२ टांके घाला. १ सा. टां, १ उ, टां, असें ४ इंच विणा. (हे कफ झाले.) पुढल्या सम ओळी नमुन्याप्रमाणें विणा. ५,७, ९.११, १३, १५, या विषम ओळींच्या शेवटीं १ टांका वाढवा. पुढें प्रत्येक ओळीच्या शेवटीं १ टांका वाढवा. अशा १२ ओळी विणून पुढल्या सहा ओळी मुळींच न वाढवितां विणा. सर्व टांके बुजवा. कॉलरला दोन व खांद्यावर दोन गुंड्या लावा. बाह्या व कुशी शिवून घ्या. (आकृति ५८ पहा.)

बाजूच्या गुंड्यांचा गंजिफ्रॉक. नं. ५९

' निटिंग यार्न ' खाकी रंगाची लोंकर ७ औंस. हस्तिदंती किंवा आल्युमिनियमच्या सुया १ जोड, नं. ७. व एक जोड नं. ८. (याची आकृति दिली नाहीं.)

(५ टांके=१ इंच रुंद ६ ओळी=१ इंच लांब.)

पाठ---७८ टांके घाला. २ सा. टां. २ उ. टां. असें ४ इंच लांब विणा. पुढें १ सा. टां. १ उ. टां. असें ११½ इंच लांब विणा. पुढल्या २ ओळींच्या आरंभींचे दोन दोन टांके बुजवा. त्या पुढल्या २ ओळींच्या आरंभीं एकेक टांका बुजवा. नंतर नमुन्याप्रमाणें ७ इंच विणा. पुढें १ ओळ साधी १ ओळ उ; अशा १० ओळी विणा. पुढल्या ओळींत २५ टांके साधे विणून निराळ्या सुईवर काढून ठेवा. पुढले २८ टांके बुजवा. (मानेचा भाग) राहिलेल्या २५ टांक्यांच्या १ ओळ

सा, १ ओळ उ, अशा १४ ओळी विणा. शेवटली ओळ मानेच्या बाजूला पुरी करून ते टांके तसेच सुइवर राहू द्या.

पुढला भाग (डावी बाजू)—१६ टांके घाला. या १६ टांक्यांच्या ४ ओळी साध्या विणा.

पांचवी ओळ—दोन गुंड्यांचीं घरें घ्या. २ सा. ३ बुजवा. ६ सा. ३ बुजवा. राहिलेले टांके सर्व साधे.

सहावी ओळ—बुजविलेल्या जागीं ३ जादे टांके बाकी सर्व ओळ साधी.

सातवी ओळ—२२ टांके घाला. गळ्याची पुढली बाजू सर्व साधी विणून त्याच्यापुढें पूर्वीचे दुसऱ्या सुईवर ठेवलेले २५ टांके घ्या. एकंदर ६३ टांके होतात.

पहिली ओळ—१ नु, ८ उ, ७ सा, ५ उ, ३० सा, ५ उ, ७ सा. फिरवा. पुढली ओळ सर्व साधी विणा. या २ ओळींप्रमाणें आणखी ४ वेळां विणा. ६ व्या ओळींत १ गुंडीचें घर घ्या. पुढें प्रत्येक ९ व्या ओळींत १ घर घ्या. एकंदर ९ गुंड्या येतील.

अकरावी ओळ—१ नु, ८ उ. ७ सा, १० उ, २० सा, १० उ, ७ सा, फिरवा. पुढली सर्व ओळ साधी. या २ ओळींप्रमाणें आणखी ४ वेळां विणा.

एकविसावी ओळ—१ नु. ८ उ, ७ सा, १५ उ, १० सा, १५ उ, ७ सा. फिरवा १ ओळ सर्व साधी. या २ ओळी आणखी ४ वेळां विणा.

एकतीसावी ओळ—१ नु. ८ उ, ७ सा, शेवटीं ७ टांके राहीपर्यंत सर्व उ; शेवटले ७ टांके साधे. पुढली ओळ सर्व साधी. या २ ओळी आणखी १ वेळ विणा. (७ साध्या टांक्यांची पट्टी शेवटपर्यंत ठेवा.) १ ओळ साधी. खांकेच्या बाजूला २ ज्यादे टांके घ्या. हे ६६ टांके पाठीप्रमाणेच पुढे विणा. शेवटीं सुलट बाजूनें सा. टांके व उलट बाजूनें उ. टांकें विणून टांके बुजवा.

उजवी बाजू—पाठीच्या एका बाजूचे २५ टांके सुईवर तसेच ठेवलेले असतात ते २५ टांके विणावयास घ्या. १ ओळ सा, १ ओळ उ, अशा १४ ओळी. शेवटली ओळ गळ्याकडे पुरी करा. ६ टांके बुजवा.* १० सा, ९ उ, फिरवा. १ ओळ साधी. * पासूनच्या २ ओळींप्रमाणें ५½ इंच लांब (म्ह० ३४ ओळी) विणा. खांकेकडे १ टांका वाढवा,

१ ओळ साधी, पुढल्या ओळींत २ जादे टांके पुढें नमुन्याप्रमाणें विणा. दोन्ही भाग सारख्या लांबीचे करून सर्व टांके बुजवा.

बाह्या—नं, ८ च्या सुयांवर ५२ टांके घाला. २ सा, २ उ, असें ४ इंच विणा. पुढें नं. ७ च्या सुयांनीं १ ओळ सा, १ ओळ उ, असें ३ इंच लांब विणा प्रत्येक ७ व्या ओळीच्या आरंभीं व शेवटीं १ टांका वाढवा. याप्रमाणें १० वेळां (म्ह० ७२ ओळी) विणा. पुढें एकंदर बाहीची लांबी २१ इंच होईपर्यंत टांके न वाढवितां न. प्र. विणा. नंतर प्रत्येक ओळीच्या आरंभीं ३ टांके बुजवा. शेवटीं २ ए; याप्रमाणें सुईवर ३६ टांके राहीपर्यंत विणा व सर्व टांके बुजवा. बाह्या जोडते वेळीं शिवण कुर्शापासून अर्धा इंच अलीकडे धरून शिवा. गळ्याभोंवतीं आंकड्याच्या सुईनें १ अ टां, ३ पू. टां, १ अ. टां. अशी किनार विणा.

स्वेटर्स.

स्वेटर अथवा साधा कोट नं. ६०

' निटिंग यार्न ' पांढरी लोंकर १२ औंस, सेलुलॉइडच्या सुया एक जोड नं. ५. (स्वेटरचा आकार जसा लहान मोठा हवा असेल त्याप्रमाणें ५ टांके =१ इंच रुंद, व १० ओळी =१ इंच लांब. या हिशेबानें टांके घालावे.)

पाठ—८० टांके घाला. अडीच इंच लांब होईपर्यंत सर्व ओळी साध्या विणा. पुढें १ सा. टां. १ उ. टां, असें एकंदर पंधरा इंच लांब होईपर्यंत विणा. नंतर प्रत्येक चवथ्या ओळीच्या शेवटीं २ ए. विणून १ टांका कमी करा. याप्रमाणें २१ इंच लांब विणा.

मान—मधले २५ टांके बुजवा. एका बाजूचे टांके निराळ्या सुईवर ठेवून दुसऱ्या बाजूचे विणावयास घ्या.

चार ओळी साध्या. नंतर १ सा. टां. १ उ. टां. असें १ इंच लांब विणा. गळयाच्या बाजूला प्रत्येक ओळीला १ टांका व बाहीच्या बाजूला प्रत्येक चवथ्या ओळीला १ टांका वाढवा.

पुढें १ सा. टां, १ उ. टां, असें पाठीच्या बरोबर लांब विणा. शेवटीं अडीच इंच लांब सर्व साध्या ओळी विणून टांके बुजवा.

अशीच दुसरी बाजू विणून सर्व टांके बुजवा.

गुंड्यांची पट्टी—नवीन १२ टांके घालून एक ओळ साधी, एक ओळ उलटी, असें १५ इंच लांब विणा. दुसरी पट्टी अशीच विणून तिला प्रत्येक चार इंचांच्या अंतरानें गुंडीचें, घर घ्या. या दोन्ही पट्टया स्वेटरच्या पुढल्या भागाच्या कडेनें लोंकरीनें सारख्या शिवा. हीं घरें असलेली पट्टी डाव्या बाजूला लावा.

कॉलर—पुढल्या पट्टी पासून गळा व माने भोंवतलाचे टांके उचलून घ्या. १ सा. टां, १ उ. टां, असें १० इंच लांब विणा. सर्व टांके बुजवा. गळ्या भोंवतीं सुलट बाजूनें शिवा व कॉलर फिरवून दुमडून घ्या.

बाह्या—बाहीच्या भोंवतालचे टांके उचलून घा. १ सा. १ उ; असें ४ इंच लांब होईपर्यंत विणा. प्रत्येक इंचाला १ टांका कमी करा. बाहीच्या शेवटीं सुमारें ८ इंचाची रुंदी राहीपर्यंत टांके कमी करीत जावे. पोलादी बारीक सुयांचा जोड घेऊन त्यांवर कफ विणावें. १ सा. टा. १ उ. टां, असें ४ इंच लांब विणून टांके बुजवा.

खिसे—२० टांके घाला. १ सा. टां, १ उ, टां. असें ३ इंच लांब विणा. पुढें एका इंचापर्यंत सर्व ओळी साध्या. टांके बुजवा. असाच दुसरा खिसा विणून गुंड्यापासून एक १ इंच अंतरावर शिवावा. (आकृति नं. ६० पहा.)

स्वेटर नं. ६१.


पांढरी शेटलंड लोंकर ८ औंस, ग्रे रंगाची ३ औंस, सुया एक जोड नं. १२, एक जोड नं. १४, आंकड्याची सुई १.

आकार लहान मोठा करावयाचा असल्यास टांके चाराच्या पाढ्यानें घेऊन शेवटीं १ टांका जास्त घ्यावा. (८ ओळी=१ इंच.)


पाठ—१४ नंबरच्या सुयांवर ९३ टांके घाला.

नमुन्याची विण. पहिली ओळ—३ सा, १ उ, याप्रमाणें विणून शेवटीं १ सा. याप्रमाणें १८ इंच लांब विणा.

पुढली ओळ—४ टांके बुजवा. २ ए. * ३ सा. १ उ; * पासून




नं. ६२




नं. ६३




नं. ६४



नं. ६४ अ



नं. ६५



नं. ६६

आरंभ. शेवटीं २ ए, ४ टांके बुजवा.

याच्या पुढल्या आठ ओळी नमुन्याप्रमाणें विणा. प्रत्येक ओळीच्या आरंभीं २ ए, (याप्रमाणें प्रत्येक बाजूला एकंदर ८ टांके कमी होतात.) पुढें ३२ ओळी साध्या.

पुढला भाग—नं. १२ च्या सुयांनीं विणा.

पहिली ओळ—५ सा; २ ए. अशी सर्व ओळ; पुढल्या २४ ओळी सर्व साध्या.

सव्वीसावी ओळ—शेवटीं ६ टांके राहीपर्यंत सर्व साधे. फिरवा.

सत्ताविसावी ओळ—१ नु. सर्व साधे. शेवटीं ६ टांके न विणतां फिरवा.

अठ्ठावीसावी ओळ—१ नु, सर्व साधे. शेवटीं ६ टांके न विणतां फिरवा. [प्रत्येक ओळीला ६ टांके न विणतां सुईवर तसेच ठेवावे. याप्रमाणें प्रत्येक बाजूला २४ टांके राहीपर्यंत विणा.] मधले विणलेले १८ टांके विणून फिरवा, पुढले २४ टांके धरून सर्व ओळ साधी, पुनः दुसऱ्या बाजूचे २४ टांके घेऊन सर्व ओळ साधी.

पुढल्या ओळींत २४ टांके साधे विणून निराळ्या सुईवर काढून ठेवा. मधले १८ टांके बुजवा. (ही मानची बाजू झाली.) पुढले २४ टांके साधे. (हे २४ टांके विणावयास घ्या.) ४ ओळी साध्या.

पांचवी ओळ—मानेच्या बाजूला १ टांका वाढवा. सर्व साधी.

सहावी ओळ—सर्व साधी.

पांचव्या व सहाव्या ओळींप्रमाणें १६ वेळां विणा.

सदतीसावी ओळ—७ सा, १ वा; याप्रमाणें सर्व ओळ. (एकंदर ४५ टांके होतात.) हे टांके तसेच ठेवून पूर्वीचे २४ टांके विणावयास घ्या. उजवी प्रमाणेंच डावी बाजू विणा.

पुढला भाग—गळ्याच्या बाजूला १० टांके नवीन घाला. (गुंड्यांची पुढली पट्टी.) आतां जाड सुयांनीं विणावयास घ्या.

पहिली ओळ—९ सा; *१ उ, ३ सा; *पासून आरंभ. शेवटीं १ उ, १ साधा.

दुसरी ओळ—३ सा, १ उ; शेवटले ११ साधे. अशा २० ओळी विणा. पुढली पट्टी साधी.

एकविसावी ओळ--बाहीच्या बाजूला १ टांका वाढवा. पुढले टांके नमुन्याप्रमाणें विणा.

बावीसावी ओळ—नमुन्याप्रमाणें

या दोन ओळींप्रमाणें आणखी ८ वेळां विणा.

४ टांके नवीन घाला. नमुन्याप्रमाणें चार इंच लांब विणा. प्रत्येक १० व्या ओळीला (बाहीच्या बाजूला) एक टांका वाढवा. याप्रमाणें ८ वेळां विणा. पुढल्या सर्व ओळी नमुन्याप्रमाणें. पाठीच्या बरोबर लांब विणून टांके बुजवा.

डावी बाजू-- पूर्वी ठेवलेले ४५ टांके जाड सुयांवर विणावयास घ्या. गळयाच्या बाजूला १० टांके नवीन घाला. पहिल्या बाजूप्रमाणेंच ४ ओळी विणा.

पांचवी ओळ--(गुंडीचें घर) ३ सा, ३ बु, ३ सा पुढें न. प्र.

सहावी ओळ--नमुन्याप्रमाणें. जेथें टांके बुजाविलेले होते त्यांवर ३ नवीन टांके घाला. ३ सा; याप्रमाणें ३० ओळींच्या अंतरान एक, अशीं ६ घरें घ्या. बाकी सर्व उजव्या बाजूप्रमाणेंच विणून टांके बुजवा.

बाही--(मनगटापासून आरंभ)-४९ टांके घाला. नमुन्याप्रमाणें २ इंच लांब विणा. पुढें प्रत्येक ५ व्या ओळीच्या आरंभीं व शेवटीं १ टांका वाढवा. याप्रमाणें १८ वेळां विणा. (म्ह० ८५ टांके होतात.) १८ इंच लांब होईपर्यंत पुढल्या सर्व ओळी टांके न वाढवितां न. प्र. विणा. पुढल्या २ ओळींच्या आरंभीं ६ टांके बुजवा. बाकी सर्व टांके नमुन्याप्रमाणेंच विणा. पुढें प्रत्येक ओळींत शेवटीं २ ए, बाकी न. प्र. अशा १४ ओळी. (३१ टांके सुईवर उरतात.)

कॉलर—ब्राऊन रंगाच्या लोंकरीनें ६० टांके घाला.

पहिली ओळ —साधी.

दुसरी ओळ—उलट.

तिसरी ओळ—साधी, शेवटीं २ ए.

चवथी ओळ—सर्व उलट

पांचवी ओळ—साधी. शेवटीं २ ए.

सहावी व सातवी ओळ—सर्व उलट.

८ व्या ओळीपासून प्रत्येक तिसऱ्या ओळीच्या आरंभीं २ए, विणून १

टांका कमी करावा. बाकी सर्व टांके साधे, याप्रमाणें सुईवर ४० टांके राही-पयत (म्ह० आरंभापासून ७ इंच लांब) विणा. पुढल्या २ ओळी साध्या. हा कॉलरचा अर्धा भाग झाला. पूर्वीं ज्या क्रमानें टांके कमी केले होते त्याच क्रमानें टांके वाढवून पुढला निम्मा भाग विणावा.

(शेवटला निमुळता भाग) २ ओळी उलट विणा.

तिसरी ओळ--बाहेरच्या बाजूला १ टांका वाढवून सर्व साधी.

चवथी ओळ--सर्व उलट.

पांचवी ओळ--तिसरी प्रमाणें. टांके बुजवा. कॉलरच्या कडेनें उजवी कडून टांके उचलून घ्यावे. प्रत्येक दुसऱ्या ओळीचा १ टांका, याप्रमाणें सर्व टांके उचलून ते साधे विणावे. १ ओळ साधी, ४ ओळी उलट. २ऱ्या व ४ थ्या ओळींत प्रत्येक टोंकाला १ टांका वाढवा. सर्व टांके बुजवा.

बाहीचा कफ--१४ नं. च्या सुयांवर ब्राउन रंगाच्या लोंकरीनें ४५ टांके घाला. साडेतीन इंच लांब होईपर्यंत साध्या ओळी विणा. पुढे दोन ओळी उलट. १ ओळ सा; ४ ओळी, उ. टांके बुजवा.

खिसे-पांढऱ्या लोंकरीनें १४ नं. च्या सुयांवर २९ टांके घाला. न. प्र. ४इंच लांब विणा. नंतर ब्राऊन रंगाच्या लोंकरीनें ५ ओळी साध्या २ ओळी उ;१ ओळ सा; १ ओळ उ; विणून सर्व टांके बुजवा. कफ बाह्यांना शिवून मग बाह्या जोडाव्या. बाह्यांची शिवण कुशींतल्या शिवणीपासून एक इंच अलिकडे धरावी सर्व भाग शिवून गुंड्या लावाव्या. (आकृति. नं ६१ पहा).

स्वेटर नं ६२

हा स्वेटर स्त्रियांना पोलक्यासारखा वापरतां येतो. मुलांसाठीं असल्यास कमरेला पट्टा लावावा.

(५ टांके=१ इंच रुंद; ७ ओळी=१इंच लांब; या हिशेबानें कमी जास्त टांके घालावे.)

' लेडी बेटी फ्लिसी ' लोंकर ६ औंस. आल्युमिनियमच्या लांब सुयांचा १ जोड, नं ११. ६ शिंपांच्या गुंड्या. कमरेचा पट्टा असल्यास २ गुंड्या जास्त लागतील.

नमुन्याची विण--४ च्या पाढ्यानें टांके घेऊन शेवटीं १ टांका जास्त घ्या. २ सा, २ उ. शेवटीं १ सा, याप्रमाणें सर्व ओळी.

पुढला भाग (डावी बाजू)-६५ टांके घाला. १२ ओळी साध्या.

तेरावी ओळ—१ नु. ९ सा, (ही पुढल्या गुंड्यांची पट्टी झाली.) *२ उ. २ सा.*पासून आरंभ. शेवटीं १ साधा.

चवदावी ओळ—१नु. १ उ; * २ सा, २ उ; *पासून आरंभ. शेवटले १० टां. साधे. या २ ओळींचा १ नमुना झाला. याप्रमाणें एकंदर ११० ओळी विणा.

एकशें अकरावी ओळ—२सा.२ ए.६ सा. पुढले टांके नमुन्याप्रमाणें.

एकशें बारावी ओळ—न. प्र. शेवटले ९ टां. साधे.

एकशें तेरावी ओळ—२ सा. २ ए. ५ सा. पुढले न. प्र.

एकशें चवदावी ओळ—न. प्र. शेवटले ८ साधे.

एकशें पंधरावी ओळ—२ सा. २ ए. ४ सा; पुढले न. प्र.

एकशें सोळावी ओळ—न. प्र. शेवटले ७ साधे.

एकशें सतरावी ओळ—२ सा. २ ए. ३ सा; पुढले न. प्र.

एकशें अठरावी ओळ —नं. प्र. शेवटले ६ साधे.

एकशें एकोणिसावी ओळ—२ सा. २ ए. २ सा; पुढले न. प्र.

एकशें विसावी ओळ—३ बु. पुढें न. प्र. शेवटले ५ साधे.

एकशें एकवीसावी ओळ—२ सा. २ ए. १ सा. पुढें न. प्र.

एकशें बावीसावी ओळ— ३ बु. पुढें न. प्र. शेवटीं ४ साधे.

एकशें तेविसावी ओळ---२ सा. २ ए. पुढें न. प्र.

एकशें चार्वीसावी ओळ—३ बु. पुढें न. प्र; शेवटीं ३ साधे,

एकशें पंचवीसावी ओळ—२ सा. २ ए; पुढें न. प्र.

पुढल्या४ ओळी१२४ व १२५ व्या ओळींप्रमाणें विणा.

एकशें तिसावी ओळ—न. प्र; शेवटीं ३ साधे.

एकशें एकतिसावी ओळ—२ सा. २ ए. पुढें नमुन्या प्रमाणें.

एकशें बत्तिसावी ओळ--न. प्र; शेवटीं ३ साधे.

शेवटल्या (म्ह० १३१ व १३२ या दोन ओळी प्रमाणें) १७१ ओळींपर्यंत विणा. शेवटीं सुईवर २३ टांके रहातात.

एकशें बाहत्तरावी ओळ–१ टां. वाढवा.; पुढें न. प्र; शेवटीं ३ साधे. १७३ ते १८३ ओळींपर्यंत १३१ व १३२ ओळीप्रमाणें विणा. मात्र १७६ व १८० या २ ओळी १७२ व्या ओळीप्रमाणें विणा.

एकशें चवऱ्यांयशींवी ओळ——सर्व साधी. टांके बुजवा.

उजवी बाजू——आरंभींच्या १२ ओळी साध्या. १५ ओळी न. प्र. डाव्या बाजूसारखीच गुंड्यांची १० टांक्यांची पट्टी विणा.

अठ्ठावीसावी ओळ---(गुंडीचें घर) सर्व टांके न. प्र. विणून पट्टीचे ३ सा. ३ बु. ४ साधे.

एकोणतीसावी ओळ—४ सा. ३ जा. टां. (नवीन घ्या.) ३सा; पुढें न. प्र. याप्रमाणें प्रत्येक २० व्या ओळीला १ गुंडीचें घर घ्या. पावली एवढ्याल्या ५ गुंड्या पुरे आहेत. पण लहान गुंड्या वापरावयाच्या असल्यास ६ घरें घ्यावीं. डाव्या बाजूप्रमाणेंच हा भाग तयार करावा.

पाठ—७९ टांके घाला. १२ ओळी साध्या. पुढें १२० ओळींपर्यंत न. प्र. [याला गुंड्यांची १० टांक्यांची पट्टी नाहीं.]

एकशें एकवीसावी ओळ—२ टांके बुजवा. पुढें न. प्र. नमुन्याची विण न तुटतां एका रेषेंत ठेवण्याची काळजी घ्यावी. त्यासाठीं एखादा टांका उलट किंवा साधा विणावा लागल्यास हरकत नाहीं. अशा १२८ ओळी विणाव्या. प्रत्येक बाजूचे ८ टांके कमी होतात. पुढें १२९ ते १७६ ओळी नमुन्याप्रमाणें विणा.

एकशें सत्याहत्तरावी ओळ–न.प्र; शेवटले ७ टांके न विणतां, फिरवा

एकशें अठ्याहत्तरावी ओळ--न. प्र; शेवटले ७ टांके न विणतां फिरवा.

एकशें एकोणऐशींवी ओळ–न. प्र; शेवटीं १३ टांके न विणतां फिरवा. (पहिले ७ टांके धरून.)

एकशें एक्यांशींवी ओळ–पूर्वी सोडलेले सर्व टांके धरून शेवटीं १९ टांके. न विणतां न. प्र; पुढली ओळ अशीच विणा.

एकशें त्र्यांशींवी ओळ-४ सा. २ ए, ५सा. २ ए, ५ सा, २ ए; पुढले सर्व टांके साधे.

एकशें चवऱ्यांशींवी ओळ–सर्व साधी विणून टांके बुजवा.

बाही–आरंभीच्या १५ ओळी विणतेवेळीं नमुन्याची विण सारखी उभ्या रेषेंत ठेवावी. शेंवटला टांका सा. किंवा उ विणून वेणी न तुटण्याकडे लक्ष द्यावें. ९७ टांके घाला.

पहिली ओळ–४० सा; * २ उ, २ सा; * पासून एकंदर ४ वेळां विणा. १ उ. फिरवा.

दुसरी ओळ—१ नु. १ सा; *२ उ. २ सा; *पासून एकंदर ५ वेळां विणा. १ साधा. फिरवा.

तिसरी ओळ--१ नु. १ सा; *२ उ. २ सा; * पासून एकंदर ६ वेळां विणा; २ उ. १ सा.

चवथी ओळ–१ नु. १ उ; *२ सा, २ उ. *पासून ८ वेळां विणा; १ साधा. फिरवा.

पांचवी ओळ---१ नु, १ सा. *२ उ. २ सा; * पासून ९ वेळां विणा; ३ सा. फिरवा.

सहावी ओळ—१ नु १ सा *२ उ. २ सा; * पासून ११ वेळां विणा. ३ सा. फिरवा.

सातवी ओळ—१ नु. १ उ.* २ सा.२ उ. * पासून १२ वेळां; विणा. २ सा. १ उ. फिरवा.

आठवी ओळ–१ नु, १ उ; *२सा, २ उ;*पासून १४ वेळां, १ सा.फि.

नववी ओळ–१ नु, १ उ; * २ सा, २ उ; * पासून १५ वेळां,३ सा.

दहावी ओळ–१ नु,१ सा.* २ उ, २ सा*पासून १७ वेळां,१सा, फि.

अकरावी ओळ–१ नु. १ सा; * २ उ, २ सा; * पासून १८ वेळां. २ उ. १ सा, फिरवां.

बारावी ओळ—१ नु. १ उ. * २ सा, २ उ; * पासून शेवटले ७ टांके न विणतां फिरवा.

तेरावी ओळ—१ नु. १ उ; * २ सा, २ उ; * पासून शेवटले ४ टांके न विणतां फिरवा.

चवदावी ओळ–१ नु.१ सा; * २ उ, २ सा;*पासून. शेवटीं १ सा.

पंधरावी ओळ—१ नु. १ उ; * २ सा. २ उ; * पासून आरंभ. शेवटीं१ सा. पुढल्या १६ ते २२ ओळी न. प्र. विणा.

तेवीसावी ओळ—आरंभीं व शेवटीं २ ए; बाकी सर्व टांके न. प्र. पुढें प्रत्येक ८ वी ओळ २३ व्या ओळीप्रमाणें. बाकी सर्व ओळी न. प्र. अशा १२० ओळी विणा. (पहिल्या १५ ओळी सोडून मोजाव्या.) नंतर पोलादी नं. १२ च्या सुयांनीं विणावयास घ्या.

पहिली ओळ—१ नु; * २ ए. २ सा; * पासून ३ वेळां; २ ए. १ सा. असें १४ वेळां विणा; पुढले सर्व टांके २ ए. २ सा.

२ ते ३६ ओळी १ सा टां; १ उ. टां; अशा विणून सर्व टांके बुजवा.

कॉलर—२ टांके घाला व ते साधे विणा.

दुसरी ओळ—प्रत्येक टांक्यांत १ मागून व पुढून असे २ टांके विणा. (म्ह० ४ टांके होतात.)

तिसरी व चवथी ओळ—सर्व साध्या.

पांचवी ओळ—१ नु, १ सा, १ वा; १ सा, १ वा; १ सा.

सहावी व सातवी ओळ—साध्या.

आठवी ओळ—१ नु. १ वा; ४ सा, १ वा. १ सा.

नववी व दहावी ओळ—सर्व साध्या.

अकरावी ओळ—१ नु. १ वा. ६ सा. १ वा १ सा. पुढें १२ ते २० ओळी ९, १०व११ या ओळींप्रमाणें विणा. (म्ह० एकंदर १६ टांके होतात.

एकविसावी व बाविसावी ओळ—सर्व साध्या.

तेविसावी ओळ—१३ सा; फिरवा.

चोविसावी ओळ—१३ सा.

पंचविसावी व सव्विसावी ओळ—सर्व सा. (२३ व्या ओळींत सोडलेले ३ टांके विणा.)

सत्ताविसावी ओळ—८व्या ओळीप्रमाणें. (दोन्ही बाजूंना १ टांका वाढवा.)

अठ्ठाविसावी, एकोणतिसावी, व तिसावी ओळ—सर्व साध्या.

एकतिसावी ओळ—१५ सा. फिरवा.

बत्तिसावी ओळ—१५ सा.

तेहेतिसावी व चवतिसावी ओळ—सर्व साध्या.

पस्तिसावी ओळ—२७ व्या ओळीप्रमाणें.

छत्तीस ते चाळीस ओळी—सर्व साध्या.

एकेचाळीसावी ओळ—२७ व्या ओळीप्रमाणें.

बेचाळीस ते शेचाळीस ओळी—सर्व साध्या.

सत्तेचाळीसावी ओळ—४१ व्या ओळीप्रमाणें.

अठ्ठेचाळीस ते चौपन ओळी-- सर्व साध्या.

हे टांके एका सुईवर ठेवून असाच दुसरा भाग विणा. नंतर ५४ व्या ओळी पुढें ३० टांके नवीन घाला. दुसऱ्या विणलेल्या भागाचे टांके त्याच्यापुढें विणावयास घ्या.

पाठीमागची कॉलर—१ ओळ साधी.

दुसरी ओळ—१ नु;* २ ए. २ सा; *पासून आरंभ.

पुढल्या ४ ओळी साध्या.

सातवी ओळ—१ नु* २ ए. २ सा; *पासून आरंभ.

पुढल्या २ ओळी साध्या.

दहावी ओळ—७ व्या ओळींप्रमाणें. पुढल्या ४ ओळी साध्या विणा. या १० ओळींप्रमाणें आणखी २ वेळां विणा. एकंदर ३० ओळी झाल्यावर सर्व टांके बुजवा.

ही कॉलर स्वेटर जसा लहान मोठा असेल त्या मानानें वाढवावी. पाठीमागें फार रुंद नको असल्यास प्रत्येक २ ओळींच्या अंतरानें टांके कमी करावे. जास्त रुंद हवी असल्यास प्रत्येक ४ ओळींच्या अंतरानें टांके कमी करावें.

खिसा—नं. ११ च्या सुयांनीं विणावयास घ्या. २३ टांके घाला.

पहिली ओळ—१ सा; * २ सा. २ उ; * पासून आरंभ. शेवटीं २ सा.

दुसरी ओळ—१ नु; * २ उ. २ सा; * पासून आरंभ; शेवटीं १ उ, १ सा.

तिसरी ओळ—१ नु; * २ सा; २ उ; * पासून आरंभ. शेवटीं २ सा. शेवटल्या २ ओळींप्रमाणें ३२ ओळी विणा. पुढल्या १० ओळी सर्व साध्या विणून टांके बुजवा.

क्यानव्हसच्या सुईनें सर्व भाग जुळवून (पृ.११.) सारखे शिवा.(आकृति नं. ६२ पहा.)

दोन वर्षांच्या मुलाचा ओव्हरकोट नं. ६३

चटणी किंवा सुपारी रंगाची ' लेडी बेटी फ्रिसी ' लोंकर १० औंस. सुया १ जोड, नं. १०.

पाठ—८२ टांके घाला. २० ओळी सर्व साध्या विणा.

एकविसावी ओळ—१ नु, ४ सा; * ३ उ, ३ सा; * पासून ११ वेळां; ३ उ. २ सा.

बाविसावी ओळ—१ नु, १ उ, २ सा, * ३ उ. ३ सा, * पासून ११ वेळां; १ सा २ उ.

तेविसावी ओळ—१ नु, १ सा, २ उ, * ३ सा, ३ उ. * पासून ११ वेळां; ३ सा, १ उ. २ सा.

चोविसावी ओळ—१ नु, ४ उ; * ३ सा, ३ उ; * पासून ११ वेळां; ३ सा, २ उ.

पंचविसावी ओळ—सर्व साधी.

सव्विसावी ओळ—सर्व उलटी.

या सहा ओळींचा एक नमुना झाला. असे आणखी १८ नमुने विणा. त्यापुढें प्रत्येक ओळीच्या आरंभीं १ टांका कमी करा. असे दोन नमुने विणा. २१ ते २५ नमुन्याच्या प्रत्येक ओळीच्या आरंभीं ३ टांके बुजवा. २६ ते २८ नमुन्याच्या प्रत्येक ओळीच्या आरंभीं २ टांके बुजवा; शेवटली ओळ सर्व साधी विणून टांके बुजवा.

पुढला भाग. डावी बाजू--७४ टांके घाला. २० ओळी सर्व साध्या.

एकविसावी ओळ--१ नु. ४ सा; ३ उ, ३ सा, ३ उ, ३ सा. ३ उ. ९ सा. (९ साध्या टांक्यांची ही पट्टी डबल गुंड्यांसाठीं आहे.) * ३ सा, ३ उ, * पासून ५ वेळां; शेवटले ९ टांके साधे.

पुढल्या सर्व ओळींत दोन ठिकाणीं गुंड्यांच्या पट्टीसाठीं ९ साधे टांके विणून बाकी सर्व पाठीच्या नमुन्याप्रमाणेंच विणा. असे १८ नमुने विणा.

१९ व २० नमुन्यांत पहिल्या. तिसऱ्या व पांचव्या, अशा प्रत्येक ३ ओळीच्या आरंभीं २ टांके साधे, २ ए, असें विणा. २१ व्या नमुन्याच्या १ ल्या ओळीला आरंभीं ६ टांके बुजवा. ३ ऱ्या व ५ व्या ओळींच्या आरंभीं ३ टांके बुजवा. याच्यापुढें ५ नमुने टांके कमीजास्त न करतां विणा. आतां कडेची व मधली गुंड्यांची पट्टी सोडून दोहींच्या मधलाच भाग पाठीच्या बरोबर विणून डाव्या खांद्याचा आकार येण्यासाठीं प्रत्येक ओळीला खांद्यांच्या बाजूचे २ टांके बुजवा. व गळ्याच्या बाजूनें विणते वेळीं १ टांका

सुईवर न विणतां ठेवा. याप्रमाणें खांद्याचे सर्व टांके बुजवा. गळ्याची १ ओळ विणून दुसरा खांदाहि असाच विणा. नंतर गळ्याचे सर्व टांके बुजवा.

उजवी बाजू—६२ टांके घाला. २० ओळी साध्या. पुढला नमुना डाव्या बाजूप्रमाणेंच विणा. फक्त कडेनें गुंड्यांची ९ टांक्यांची एकच पट्टी विणावयाची, मध्यें दुसरी पट्टी घ्यावयाची नाहीं. या भागाला एकच खांदा येईल. दोन्ही भाग सारख्या लांबीचे करून सर्व टांके बुजवा.

बाह्या—३६ टांके घाला. १ ओळ सा. १ ओळ उ. अशा २५ ओळी विणा.

सव्विसावी ओळ–३६ चे ६४ टांके करा. (म्हणजे) ४ टांके साधे, पुढल्या प्रत्येक टांक्यांत २ टांके विणून २८ चे ५६ टांके करा. शेवटले ४ साधे. पुढें प्रत्येक ओळीच्या शेवटीं २ टांके साधे विणा. अशी नमुन्याची विण अकरा वेळां विणा. पुढल्या ओळीच्या आरंभीं १६ टांके बुजवा. आणखी ३ नमुने विणून प्रत्येक ओळीच्या आरंभीं २ टांके बुजवा. शेवटीं एक ओळ उलट विणून सर्व टांके बुजवा. दुसरी बाही अशीच विणा. मात्र पहिल्या बाहीहून उलट दिशेचे १६ टांके बुजवा. म्हणजे बाही जोडते वेळीं दोन्हींचा आकार सारखा येईल.

कॉलर—४२ टांके घाला. सर्व ओळी साध्या.

प्रत्येक ओळीच्या आरंभीं दुसऱ्या टांक्यांत १ जादा टांका याप्रमाणें १८ ओळी विणा. एकंदर ६० टांके होतात. पुढल्या ६ ओळी साध्या विणून सर्व टांके बुजवा.

कफ—४५ टांके घाला. ३० ओळी साध्या. एक टोंक निमुळतें घ्या. (१५ ओळींपर्यंत प्रत्येक ओळीच्या आरंभाला १ टांका वाढवा. पुढें प्रत्येक ओळीला कमी करा.) असाच दुसरा कफ विणा.

मागचा कमर पट्टा—३० टांके घाला. ३० ओळी साध्या विणून टांके बुजवा. या पट्ट्याचेहि एक टोंक सारखें व एक निमुळतें विणा. असाच दुसरा पट्टा विणून दोन निमुळतीं टोंकें एकावर एक ठेवून त्यांवर एक शिंपीची गुंडी लावा. कोट शिवते वेळेस हा पट्टा कमरेवर येईल अशा बेतानें पाठीच्या भागावर धरून दोन्ही कुशींतल्या शिवणींत दोन टोंकें

शिवा. बाह्या, कॉलर, कफ, आकृतींत दाखविल्याप्रमाणें जोडा. (आकृति नं. ६३ पहा.)

(विणलेले भाग जोडण्याची माहिती पृष्ट ११ वर पहा.)

झुली व शॉली.

क्याप उइथ क्लोक. अथवा टोपीसह झुल. नं. ६४.

स्याक्सनी लोंकर ४ औंस. रंगीत क्रोशे सिल्क १ औंस. रेशमी फित ५ वार. सेल्युलॉईड किंवा हस्तिदंती आंकड्याची सुई नं. ४

नमुन्याची विण--३ पू. टां, २ सां. ३ पू. टां; असें प्रत्येक टांक्यांत विणणें. ही एक शिंपी झाली. २ शिंप्याच्या मधली जाळी समजावी.

६८ सांखळ्या घ्या. ५ सां. सोडून ६ व्या सांखळींत १ अ. टां;* १ सां, पुनः १ सां. सोडून पुढल्या सांखळींत १ अ. टां;* पासून आरंभ. शेवटीं ४ सांखळ्या विणून फिरवा.

दुसरी ओळ—प्रत्येक जाळींत १ शिंपी विणून शेवटल्या चवथ्या सांखळींत १ पू. टां; ४ सां. घेऊन फिरवा.

तिसरी ओळ—मागल्या ओळींतल्या प्रत्येक शिंपीवर १ शिंपी, शेवटल्या चवथ्या सांखळीवर १ पू. टां. विणून फिरवा.

तिसऱ्या ओळीप्रमाणें एकंदर १० ओळी विणा. पुढल्या ओळीपासून ८ पू. टांक्यांची १ शिंपी घ्या. अशा २० ओळी विणा. एकंदर ३० ओळी झाल्यावर धागा तोडा.

टोपी—गळ्याकडल्या आरंभींच्या ५ शिंप्या सोडून १ सां. ६ पू. टां, असें प्रत्येक जाळींत विणा. शेवटल्या ५ शिंप्या सोडून फिरवा. एकंदर २२ शिंप्या येतील.

दुसरी ओळ—४ सां; मागल्या ओळीच्या प्रत्येक शिंपीवर ६ पू. टांक्यांची १ शिंपी विणून शेवटीं १ पू. टां. घेऊन फिरवा. या ओळीप्रमाणें १४ ओळी विणा. नंतर खालच्या दोन्ही टोंकांच्या शिंप्या सारख्या धरून पाव

टांक्यानें ८ शिंप्या जोडा. दोन्ही बाजूच्या ३ शिंप्या न जोडतां ठेवा. म्हणजे टोपीचा कुंचड्याप्रमाणें आकार येईल.

किनार—डाव्या बाजूकडून आरंभ करा. रंगीत रेशमानें १ सां; * शिंपीच्या टांक्यांत १ अ. टां; जाळींत ६ पू. टां; * पासून आरंभ. याप्रमाणें मानेभोंवतीं व दोन्ही पुढल्या बाजू भोंवतीं विणा. नंतर खालच्या घेराच्या प्रत्येक शिंपीवर १ अ. टां; * ४ सां, १ अ. टां. * पासून आरंभ. असा सर्व घेर विणून धागा तोडा.

कुंचड्याभोंवतीं किनार—रंगीत धाग्यानें १ सांखळी १ अ. टां; *एक सांखळी सोडून पुढल्या टांक्यांत ४ सां. १ अ. टां, * पासून आरंभ. अशी सर्व ओळ विणा. पुढल्या ओळींत ४ सांखळ्यांच्या जाळींत ६ पू. टांके. त्याच्या पुढल्या टांक्यांत १ अ, टां; ४ सांखळ्या; १ टांका सोडून पुढल्या टांक्यांत ६ पू. टां; याप्रमाणें सभोंवार विणा. गळ्याभोंवतालच्या जाळींतून रेशमी फित घालून दोन्हीं टोंकांना २ सुंदर बो बांधा. १ बो टोपीच्या पुढें बांधा. (आकृति नं. ६४ पहा.)

लहान मुलांची शॉल.

ही शॉल चौकोनी असल्यामुळें मुलांना झुलीप्रमाणें वापरतां येते. कोणत्याहि नाजुक विणीची चौकोनी शॉल फार सुंदर दिसते. तिचा फक्त साधा चौकोनी नमुना असल्यामुळें आकृति दिली नाहीं. फक्त पुढील विणीची आकृति दिली आहे.

शेटलंड फ्लॉस लोंकर ६ औंस. सेल्युलॉईड सुयांचा एक जोड. नं. ११.

१५६ टांके घाला. आरंभींच्या सहा ओळी सर्व साध्या. पुढें प्रत्येक ओळीच्या आरंभीं व शेवटीं ६ टांके साधे विणा म्हणजे दोन्ही बाजूंनीं उभी किनार येईल.


नमुन्याची विण—**पहिली ओळ**—६ सा; * आ १ नु. १ सा, नु, उ; १ सा, २ ए; आ. १ सा;* पासून आरंभ. शेवटीं आ. २ए.४ सा.

दुसरी ओळ—६ सा; पुढलें सर्व टांके उलट, शेवटीं ६ सा.


तिसरी ओळ–६ सा; * आ ३ सा, आ, नु, २ ए, नु. उ;* पासून आरंभ. शेवटीं आ. २ ए. ४ सा.



नं. ६८



नं. ६९



नं. ६७

BLOCKS PRINTED AT

SHRI GANESH PRINTING WORKS, POONA CITY.

चवथी ओळ---६सा, पुढले सर्व टांके उलट, शेवटीं ६ साधे.

पांचवी ओळ--६ सा; * आ. १ सा. आ. १ नु, १ सा; नु. उ; १ सा, २ ए; * पासून आरंभ. शेवटीं आ २ ए. ४सा.

सहावी ओळ---चवथ्या ओळीप्रमाणें.

सातवी ओळ--६ सा; * आ. ३ सा; आ १ नु, २ ए; नु. उ; * पासून आरंभ.

आठवी ओळ--सहाव्या ओळीप्रमाणें.

या आठ ओळींचा एक नमुना झाला. पुनः पहिल्या ओळीपासून विणा. याप्रमाणें चौकोनी होईपर्यंत विणून शेवटीं ६ ओळी साध्या विणून सर्व टांके बुजवा. (आ·नं· ध्य अ·पहा)

लाळेरीं.

लाळेरें. नं. ६५.

लाळेरें नेहमीं रेशमानें किंवा सुतानें विणावें. लोंकरचिं लवकर खराब होतें. सुताचें जास्त चांगलें.

' पेरिलस्टा सिल्क ' किंवा ' क्रोशे ' कॉटन १ बंडल. नं. १६. जशी विण जाड किंवा बारीक हवी असेल त्या मानानें धागा जाड किंवा बारीक घ्यावा. आंकड्याची सुई नं. ४. १ इंच रुंदीची रेशमी फित १ वार.

५६ सांखळ्या घ्या.

पहिली ओळ---पहिल्या २ सांखळ्या सोडून प्रत्येक सांखळींत १ याप्रमाणें २६ पू. टां; पुढल्या १ सांखळींत ४ पू. टां. पुनः प्रत्येक सांखळींत १ याप्रमाणें २६ पू. टां; २ सांखळ्या विणून फिरवा.

दुसरी ओळ---मागल्या ओळीच्या टांक्याची जी सांखळी पडते त्यांत पुढल्या बाजूनें टाके न विणतां मागल्या बाजूनें विणा, म्हणजे ओळींची रांग उठून दिसेल. प्रत्येक टांक्यांत १ पू. टां. असे २७ पू. टां, पुढल्या टांक्यांत४ पू. टां, पुनः प्रत्येकांत१असे२७पू. टां.विणा. शेवटीं २सां. घेऊन

फिरवा. याप्रमाणें प्रत्येक टांक्यांत१पू. टां. व मध्यें एका टांक्यांत ४पू. टां. विणून ओळीच्या शेवटीं२सांखळ्या घेऊन फिरवा. अशा एकंदर २२ ओळी विणा. नंतर प्रत्येकांत १ असे १० पू. टां. विणून फिरवा. २ सां. पुनः प्रत्येकांत १ असे १० पू. टां. अशा १० ओळी विणून टांके बुजवा. १२ टांके सोडून पुढल्या १० टांक्यांवर असेच पू. टांके विणा. अशीच दुसरी बाजू विणा. हे दोन्ही बाह्यांचे भाग झाले. आतां मधला आकार येण्यासाठीं १० टांक्यांच्या पुढल्या टांक्यांवर प्रत्येकांत १ असे २८ पू. टां; मध्यें १ टांक्यांत ४ पू. टां; पुनः प्रत्येकांत १ असे २८ पू. टां. विणून सर्व टांके बुजवा.

किनार—उजव्या हाताच्या खालच्या कोंपऱ्यापासून आरंभ करा. १ अ. टां,* ३सां; पुढले २ टांके सोडून १ अ. टां; * पासून आरंभ. असा १ फेरा. नतर ३ सांखळ्यांच्या जाळींत १ अ. टां. २ पू. टां, ३ सां. २ पू. टां, याप्रमाणें प्रत्येक जाळींत विणा. असें सभोंवार विणून टांके बुजवा. दोन्ही खांद्यावरल्या पट्टयांना १ गुंडी लावा. रेशमी फितीचा बो बांधा. म्हणजे लाळेरें सुंदर दिसेल. (आकृति नं ६५ पहा.)

दुरंगी लाळेरें नं ६६.

क्रोशे सिल्क किंवा कॉटन पांढरें सव्वा औंसाचें बंडल१. फिक्की गुलाबी१ लड, ३ वार अरुंद रेशमी फीत. आंकड्याची सुई नं. ९

उजवी बाजू—२३ सां. घ्या. १ सां. सोडून पुढल्या प्रत्येक सांखळींत १ अ. टां; असे २२ टांके विणून फिरवा.

दुसरी ओळ—१ सां. १ टांक्यांत २ अ. टां; पुढें प्रत्येक टांक्यांत १ अ. टां; शेवटीं २ टांके सोडून शेवटल्या टांक्यांत १ अ. टां. व १ सांखळी विणून फिरवा.

तिसरी ओळ—१ अ. टां, १ टांका सोडून पुढल्या प्रत्येक टांक्यांत १ अ. टां. शेवटल्या टांक्यांत २ अ. टां, फिरवा. १ सां. २ ऱ्या व ३ ऱ्या ओळींप्रमाणें ४४ ओळी विणा.

डावी बाजू—२३ सांखळ्या घेऊन मागल्याप्रमाणेंच४२ ओळी विणा. ५३ सां. घ्या. उजव्या भागाच्या शेवटल्या ओळीच्या १ ल्या टांक्यांत १

पा. टांका विणून दोन्ही भाग जोडून घ्या. १ सांखळी विणून धागा तोडा.

उजव्या बाजूच्या बाहेरच्या कडेनें विणण्यास आरंभ करा.

पहिली ओळ—प्रत्येक टांक्यांत १ अ. टां. असे ४८ टां; पुढल्या १ टांक्यांत ३ अ. टां. पुनः प्रत्येक टांक्यांत १ अ. टां. असे ४८ टांके विणा. १ सांखळी घेऊन फिरवा.

दुसरी ओळ—प्रत्येक टांक्यांत १ अ. टां; शेवटीं १ सां. फिरवा. या दोन ओळींप्रमाणें ३२ ओळी विणा.

किनार—गुलाबी रंगानें विणावयास घ्या.

पहिली ओळ—१ सां, एका टांक्यांत ५ पू. टां.*३ टांके सोडून पुढल्या टांक्यांत ४ पू. टां; *पासून आरंभ. याप्रमाणें सभोंवतीं विणून धागा तोडा.

पांढऱ्या धाग्यानें विणा. १ सां; १ पू. टां; * १ सां, पुढला १ टां. सोडून १ पू. टां;* पासून आरंभ. याप्रमाणें गळ्याभोंवतीं विणून धागा तोडा.

आतां पांढऱ्या धाग्यानें दुसरा फेरा विणा. १ सां; *मागल्या ओळीच्या शिंपीमध्यें ६ पू. टां; जाळींत १ अ. टां; *पासून आरंभ. याप्रमाणें सभोंवतीं १ फेरा विणा.

गळ्याभोंवतीं असलेल्या जाळींतून फित घाला व बो बांधा. (आकृति नं. ६६ पहा.)

लहान मुलांची चड्डी.

पांढरी किंवा गवती रंगाची २ औंस लोंकर. पोलादी सुयांचा १ जोड. रेशमी फित अर्धा वार.

७० टांके घाला. २ सा. टां, २ उ. टां, अशा ६ ओळी विणा.

सातवी ओळ—२ सा; * आ २ ए; * पासून आरंभ.

आठवी, नववी व दहावी ओळ—२ सा. टां, २ उ. टां; अशा सर्व ओळी. नंतर १ ओळ सा; १ ओळ उ; असें एकंदर ६६ ओळी होईपर्यंत विणा.

सदुसष्टावी ओळ—५ टांके बुजवा. पुढले सर्व टांके साधे.

अडुसष्टावी ओळ—५ टांके बुजवा. पुढले सर्व उ; या २ ओळी आणखी एक वेळ विणा.

एकाहत्तरावी ओळ—२ टांके बुजवा. सर्व साधी.

बाहत्तरावी ओळ—२ टां. बुजवा.सर्व उ; या २ ओळी आणखी ३ वेळां विणा. १ ओळ सा; १ ओळ उ; अशा १० ओळी विणा. नंतर प्रत्येक ओळीच्या आरंभीं २ टांके नवीन घाला. अशा ८ ओळी, पुढल्या ४ ओळींत प्रत्येक ओळीच्या आरंभीं ५ टांके नवीन घाला. आतां १ओळ सा; १ ओळ उ, असें पहिल्या भागाइतकेंच लांब विणा. त्यानंतर आ. २ए; अशी एक ओळ विणा. शेवटीं २ सा. टांके; २ उ. टां; अशा ६ ओळी विणून टांके बुजवा. दोन्ही बाजू शिवून घ्या. जाळींतून फित घाला. [ही चड्डी अगदीं साधी असल्यामुळें तिची आकृति दिली नाहीं.]

पिशव्या.

विणकामाची पिशवी. नं. ६७

' शेटलंड फ्लॉस ' रेशमाचें मोरपिशी रंगाचीं बंडलें ३ औंस. पोलादी सुया १ जोड. पितळेच्या चवली एवढ्याल्या कड्या ६; रेशमी कॉर्ड एक वार.

५० टांके घाला. १२ ओळी साध्या विणा.

तेरावी ओळ—सर्व टांके २ ए;

चवदावी ओळ—आ. १ सा;

पंधरा ते एकोणीस ओळी—सर्व साध्या.

विसावी ओळ—९ सा, १ उ.

एकविसावी ओळ—सर्व साधी.

शेवटल्या २ ओळींप्रमाणें आणखी ४ वेळां विणा.

पुढली ओळ सर्व साधी.

एकतिसावी ओळ—४ सा, १ उ; *९सा. १ उ; *पासून आरंभ. शेवटीं ४ सा. १ उ. पुढली ओळ सर्व साधी.

या २ ओळींप्रमाणें आणखी ६ वेळां विणा.

२० ते ३८ ओळीपर्यंतचा नमुना ८ इंच लांब होईपर्यंत विणा. पुढली ओळ-सर्व टांके २ ए. त्याच्या पुढली ओळ. आ. १ सा; शेवटल्या १२ ओळी सर्व साध्या. सर्व टांके बुजवा. बाजू सारखी शिवून खालीं

निमुळती शिवा. रेशमी किंवा साध्या कापडाची याच आकाराची पिशवी शिवून त्यावरून ही विणलेली पिशवी टांचून घ्या. वरच्या कडेनें ६ पितळी कड्या लावून त्यांतून रेशमी कॉर्ड घाला. खालीं १ गोंडा लावा. (आकृति नं. ६७ पहा.)

पिशवी नं. ६८.

क्रोशे सिल्क किंवा पेरिलस्टा १ औंस. त्याच रंगाची रेशमी रिबन १ वार.

६ सांखळीचें वर्तुळ करा. त्यांत १ पू. टां. २ सां; असें ५ वेळां विणा.

दुसरा फेरा–प्रत्येक जाळींत २ पू. टां, २ सां. २ पू. टां; अशी १ शिंपी विणा. एकंदर ५ शिंप्या येतील.

फेरा तिसरा–१ ल्या शिंपीवर १ शिंपी; त्याच्या पुढल्या शिंपीवर १ शिंपी; २ सां; २ शिंप्याच्या मधल्या जाळींत १ पू. टां, २ सां, पुनः पुढल्या २ शिंप्यावर २ शिंप्या. २ सां. मधल्या जाळींत १ पू. टां. २ सां.

चौथा फेरा–२ शिंप्यावर २ शिंप्या. ३ सां; मधल्या प्रत्येक जाळींत १ पू. टां. २ सां; शिंपीच्या आरंभीं ३ सां, व २ शिंप्या. असें शेवटपर्यंत विणा. या पुढल्या सर्व फेऱ्यांत दोन बाजूला २ शिंप्या जोडीनें विणा. प्रत्येक फेऱ्याला १ पू. टांका जास्त येऊन मधली जाळी वाढत जाते. शिंपीच्या आरंभीं व शेवटीं ५ सांखळ्या विणा. मधल्या जाळ्यांमध्यें १२ पू. टां. होईपर्यंत याप्रमाणें विणा. पुढल्या प्रत्येक ओळीला शेवटीं जाळींतला १ टांका कमी करा. असें ७ टांके राहीपर्यंत विणा. नंतर प्रत्येक जाळींत २ पू. टां. २ सां. असा १ फेरा. बाजूच्या शिंप्यांची जोडी शेवटपर्यंत कायम ठेवा. पुढल्या फेऱ्याला प्रत्येक जाळींत १ शिंपी असे ५ फेरे विणून टांका बुजवा. सहा इंच लांब सांखळी विणून ती २ पू. टांके विणलेल्या जाळीं-तून दुहेरी घालून गोंडे बांधा. जोडीच्या शिंपीजवळच्या जाळींतून रेशमी फित घालून तिचा सुंदरसा बो बांधा. (आकृति नं. ६८ पहा.)

डॉयली नं. ६९

ही डॉयली ३६ नंबरच्या सुतानें विणल्यास फारच नाजूक दिसते. पण

१६ नंबरच्या जाड सुतानें विणल्यास ती दौतीच्या किंवा दिव्याच्या बैठकीसारखी उपयोगी पडून सुंदरहि दिसते.

'क्रोशे कॉटन' सुताचें पांढरें बंडल नं. ३०, आंकड्याची सुई नं. ९.

प्रथम मधलें चक्र विणा. १८ सांखळ्या घ्या. पहिल्या सांखळींत १ पा. टां. विणून वर्तुळ करा. २१ सांखळ्या घेऊन फिरवा.

पहिली ओळ-आंकड्यापासून चवथ्या सांखळींत १ पू. टां, नंतर विणलेली सांखळी मध्यें धरून त्या सांखळीवरून २९ पू. टां. विणा. शेवटीं १ सांखळी विणून फिरवा.

दुसरी ओळ—प्रत्येक टांक्यावर १, असे ३० अ. टां; शेवटीं ५ सांखळ्या घेऊन फिरवा.

तिसरी ओळ—प्रत्येक टांक्यावर १, असे ६ पा. टां, ५ सां, ६ पा. टां, ५ सां, ६ पा. टां, ५ सां. ६ पा. टां, ५ सां ६ पा. टांके (हे पाव टांके सांखळीच्या दोन्ही टांक्यांतून न विणतां मागल्याच टांक्यांतून विणा.) वर्तुळ केलेल्या सांखळ्यांतील तिसऱ्या सांखळींत १ पा. टांका विणून हें अर्ध वर्तुळ त्याला जुळवा.

दुसरें अर्धवर्तुळ--१८ सांखळ्या घ्या. पहिल्या अर्धवर्तुळाच्या दुसऱ्या जाळींत १ अ. टांका विणून त्याला जुळवा. ३ सांखळ्या घेऊन फिरवा.

पहिली ओळ—सांखळीवरून ३० पू. टांके विणा. १ सांखळी घेऊन फिरवा.

दुसरी ओळ—प्रत्येक टांक्यांत १, याप्रमाणें ३० अ. टां; शेवटीं ५ सांखळ्या विणून फिरवा.

तिसरी ओळ---प्रत्येक टांक्यांत १ असे ६ पा. टां, ५ सां. ६ पा. टां, ५ सां, ६ पा, टां, ५ सां, ६ पा. टां, ५ सां, ६ पा, टां.

मधल्या वर्तुळाच्या सहाव्या टांक्यांत, १ पा. टां. विणून त्याला हें जुळवा.

दुसऱ्या अर्धवर्तुळाप्रमाणें आणखी चारदा विणा, म्ह० एकंदर सहा अर्धवर्तुळाचें एक चक्र होईल. शेवटलें अर्धवर्तुळ विणतेवेळीं तिसऱ्या ओळीच्या ५ सांखळीच्या दुसऱ्या जाळींत पहिल्या अर्धवर्तुळाचें टोंक पुढीलप्रमाणें जुळवा. पहिली जाळी व ६ पा. टां. विणून ३ सांखळ्या. नंतर आंकडा पहिल्या अर्धवर्तुळाच्या खालच्या टांक्यांत घालून एक पा. टांका विणा. २ सांखळ्या, ६ पा. टां; शेवटीं ६ पा. टां. विणून मधल्या वर्तुळाच्या राहि-

लेल्या शेवटल्या टांक्यांत १ पा. टां. विणा. पुढल्या दोन टांक्यांतून धागा गुंतवून तोडा. येथें चक्र पूर्ण झालें.

पहिला फेरा—चक्राच्या शेवटच्या टोंकाच्या जाळींत धागा गुंतवून ९ सांखळ्या विणा. दुसऱ्या जाळींत १ अ. टां. ९ सां; तिसऱ्या जाळींत १ अ टां, ९ सांखळया; याप्रमाणें प्रत्येक जाळींत १ अ. टां. व ९ सांखळ्या असें चक्राभोंवतीं विणा.

दुसरा फेरा—२ सां; प्रत्येक टांक्यावर १ अ. टां; शेवटीं १ पा. टां. विणून पहिल्या टांक्याला जुळवा.

तिसरा फेरा–प्रत्येक सातव्या टांक्यांत २ अ. टां, बाकी सर्व प्रत्येक टांक्यांत १ अ. टां. शेवटीं पहिल्या टांक्यांत १ पा. टां. विणून जुळवा.

चौथा व पांचवा फेरा—दुसऱ्या फेऱ्याप्रमाणें.

सहावा फेरा–४ सांखळ्या, २ मो. टां, ५ सांखळया; * ४ टांके सोडून पुढल्या प्रत्येक टांक्यांत १ असे ३ मो. टां; ५ सांखळ्या,*पासून आरंभ. शेवटीं १ पां. टां. विणून पहिल्या टांक्यांला जोडून घ्या.

सातवा फेरा—दुसऱ्या फेऱ्याप्रमाणें.

आठवा फेरा—तिसऱ्या फेऱ्याप्रमाणें.

नववा व दहावा फेरा—दुसऱ्या फेऱ्याप्रमाणें.

अकरावा फेरा—२ सां; * प्रत्येक टांक्यांत १ असे ९ अ. टां; ५ सां, ४ टांके सोडून पुढल्या एका टांक्यांत ३ पू. टां, २ सां. ३ पू. टां; ५ सां, पुढले ४ टांके सोडून *पासून आरंभ. शेवटीं पहिल्या टांक्यांला जोडून घ्या.

बारावा फेरा—२ पा. टां, २ सां,*पुढल्या प्रत्येक टांक्यांत १ असें ७ अ. टां; ५ सांखळ्या; मागल्या फेऱ्याच्या २ सांखळींत ३ मो. टां, ३ सां, ३ मो. टां, ५ सां; *पासून आरंभ. शेवटीं पहिल्या टांक्यांत पा. टां. विणून जुळवा.

तेरावा फेरा—२ पां. टां; २ साखळ्या; पुढल्या प्रत्येक टांक्यांत १, असे ५ अ. टां, शिंपीच्या ३ सांखळीच्या जाळींत ११ मो. टां, ५ सां. * पासून आरंभ. शेवटीं १ पां. टांक्यानें जुळवा.

चौदावा फेरा—२पां. टां, २ सां* पुढल्या प्रत्येक टांक्यांत १ असे ३ अ. टां; ५ सांखळ्या; पूर्वीच्या प्रत्येक मोठ्या टांक्यावर १ मो. टां, १

सां, असे १० टांके. ५ सांखळया. *पासून आरंभ. शेवटीं १ पा. टां. विणून जुळवा.

पंधरावा फेरा—प्रत्येक टांक्यांत १ असे तीन पा. टां, *५ सांखळ्या; मागल्या फेऱ्यांतील मोठ्या टांक्यांच्या पुढल्या जाळींत २ मोठे टां. २ सां, याप्रमाणे प्रत्येक जाळींत २ मो. टां. २ सां. अशा मोठ्या टांक्यांच्या ९ जोड्या घेऊन ५ सांखळ्या १ अ. टां. विणा. पुनः * पासून आरंभ. सभोंवर याप्रमाणें विणून शेवटीं १ पा. टां. घेऊन जुळवा.

सोळावा फेरा—प्रत्येक सांखळींत १ याप्रमाणें ५ सांखळ्यांत पा. टां. विणून पंधराव्या फेऱ्यातील २ मोठ्या टांक्यांच्या जोडीवर शेवटला पा. टांका घ्या.* ७ सांखळया, दुसऱ्या सांखळींत सुई घालून ५ सांखळयांचें १ वर्तुळ करा.*२ सांखळया, २ मो. टांक्यांच्या खांबाच्या मधल्या जाळींत १ अ. टां. पासून आरंभ. असें आणखीं ८ वेळां विणा. शेवटीं २ सांखळया विणून पुढल्या आर्काच्या आरंभींच्या मोठ्या टांक्यावर १ अ. टां. विणून त्याला जोडून घ्या व त्यांवरहि अशीच कंगरी विणा. याप्रमाणें सभोंवर विणून शेवटीं धागा एका इंचावर तोडून तो बाजूच्या टांक्यांत गुंतवा. (आकृति नं. ६९ पहा.)

चुकीची दुरुस्ती—पृ. २३. जाळीच्या लेरयाची विण नं. २६. यांत आठव्या ओळींत '९ उ.' असें छापलें आहे तेथें '३ उ.' असें वाचावें.

समाप्त.

विणकला

भाग दुसरा

छापत आहे.

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण—

२७० सदाशिव पेठ पुणें शहर.